


हा पुण्यातील चौथा मानाचा गणपती आहे. याची स्थापना १९०१ मध्ये झाली. मुर्ती १३ फूट उंच आहे आणि ८० किलोपेक्षा जास्त वजनाचे दागिने घालतात.

• पुणे, बुधवार, ११ सप्टेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 273 • वर्ष ३ रे, अंक २७३ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

## 'लोक पोल': मविआचा वरचष्मा; महायुतीला दे धक्का

# महाराष्ट्रात सत्तापालट?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** जम्मू-काश्मीर व हरियाणा विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरूअसूनहीप्रक्रियासंपताचमहाराष्ट्रात निवडणुकीचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर निवडणुकीशी संबंधित ओपिनियन पोल आणि फोरकास्टर'लोक पोल' या संस्थेनं महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये ताजं सर्वेक्षण केलं असून याचे आकडे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रात सत्तापालट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाविकास आघाडी सत्ताधारी महायुतीला पराभूत करू शकते, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

लोक पोलच्या ताज्या सर्वेक्षणातील निष्कर्षानुसार, आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील सत्ताधारी महायुतीला ११५ ते १२८ जागा मिळू शकतात तसेच त्यांची मतांची टक्केवारी ३८ ते ४१ इतकी राहू शकते. तसेचविरोधात असलेल्या महाविकास आघाडीला स्पष्ट बहुमत म्हणजे १४१ ते १५४ जागा मिळण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यांच्या मतांची टक्केवारी ४१ ते ४४ टक्के राहण्याची शक्यता आहे. राज्यात अपक्ष व अन्य पक्षांना ५ ते १८ जागा आणि १५ ते १८ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे.महाराष्ट्रात एकूण २८८विधानसभा जागा अजून कोणत्याही पक्षाला किंवा आघाडीला सरकार स्थापन करण्यासाठी १४५ जागांचा आकडा पार करावा लागणार आहे.

निवडणुकीशी संबंधित ओपिनियन पोल आणि भविष्यवाणी करणाऱ्या 'लोक पोल' ने महाराष्ट्राशी संबंधित ग्राउंड सर्वे जवळपास एक महिने केला आहे. त्याचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. सर्वेक्षणात प्रत्येक विधानसभा मतदारसंघात जवळपास ५०० सॅम्पल जमा करण्यात आले. अशा प्रकार संपूर्ण सर्वेक्षणात एकूण दीड लाख सॅम्पल गोळा केले गेले.

### शिंदेंची लोकप्रियता वाढली तर फडणवीसांची घटली



• सर्वेक्षणात अंदाज वर्तवण्यात आला आहे की, महायुतीला मुंबई,उत्तर महाराष्ट्र आणि कोकणात चांगल्या जागा मिळू शकतात. सर्वेक्षणात समोर आले आहे की, राज्यात काँग्रेस एक नंबरचा पक्ष बनून समोर येऊ शकतो, मात्र त्यांना जोरदार प्रचार करावा लागणार आहे. सर्वेक्षणात म्हणले आहे की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लोकप्रियता वाढली असून फडणवीस यांची लोकप्रियता घटली आहे.

### आठ विभागानुसार सर्वेक्षण

लोक पोलने महाराष्ट्रात ६ झोननिहाय सर्वेक्षण केले आहे.पहिला झोन विदर्भ आहे. विदर्भात विधानसभा निवडणुकीच्या ६२ जागा आहेत. येथे महायुतीला केवळ१५ ते२० जागा मिळू शकतात तर महाविकास आघाडी ४० ते ४५ जागांपर्यंत मुसंडी मारू शकते. अन्य पक्षांच्या खात्यात १ ते ५ जागा जाण्याची शक्यता आहे. येथे काँग्रेस जोरदार कामगिरी करू

» पान ७ वर

### ऑडीने पाच वाहनांना उडवले

## भाजपाध्यक्षांच्या पुत्राचा 'कार'नामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** महाराष्ट्र भाजपचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे याच्या आलिशान ऑडी कारने नागपूरच्या रामदासपेठ परिसरात तब्बल पाच वाहनांना धडक दिली. या प्रकरणी नागपूर सिताबर्डी पोलिसांनी चालकासह दोघांना अटक केली आहे. या कारमधील दोन जणांनी मद्यपान केल्याचे केल्याची माहिती पोलिसांनी दिली. सीताबर्डी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री एक वाजता ऑडी कारने तक्रारदार जितेंद्र सोनकांबळे यांच्या कारला आधी धडक दिली आणि नंतर दुचकीला धडक दिली, या घटनेत दुचाकीवरील दोन तरुण जखमी झाले.

पोलिसांच्या माहितीनुसार, संकेत यांची मोटार चालक अर्जुन हावरे (वय २४) व रोनित चिंतमवार (वय २७) यांच्याकडे चालवण्यासाठी दिली होती. ही मोटर संकेत यांच्या नावावर असून या मोटारीने रविवारी मध्यरात्री पाच वाहनांना धडक दिली. पोलिसांनी चालक हावरे आणि चिंतमवार यांना अटक केली आहे. ही मोटार जप्त करण्यात आली आहे. यावेळी गाडीवरील नंबर प्लेट गायब करण्यात आल्याचे देखील उघड झाले आहे. कार नेमिकी कुणाच्या नावावर आहे ? याची माहिती घेतली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार 'ऑडी कारने मानकापूर भागाकडे जाणाऱ्या पाच वहनाना धडक दिली. येथील टी-पॉइंटवर वाहनाने पोलो कारला धडक दिली. इतर कारचालकांनी ऑडी कारचा पाठलाग करून मानकापूर पुलाजवळ

» पान ७ वर



### संकेतवर गुन्हा का दाखल नाही?

• नागपूरमध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाच्या गाडीने पाच दुचाकी आणि चारचाकी गाड्यांना धडक दिल्याची घटना घडली होती. रविवारी घडलेल्या घटने प्रकरणी पोलिसांनी एका वर गुन्हा दाखल केला आहे. तर संकेत बावनकुळे यांच्या दोन्ही मित्रांना या प्रकरणी जामीनसुद्धा देण्यात आला आहे. पोलिसांनी पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली. या अपघातावरून राज्यात विरोधकांनी भाजपसह महायुती सरकारवर आरोपही केले आहेत. या प्रकरणात संकेतला वाचवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

## पूर्वपरीक्षा तारखा लवकर जाहीर करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एमपीएससी राज्यसेवा पूर्वपरीक्षा



आतापर्यंत चार वेळा पुढे ढकलली आहे. त्यामुळे आता कृषीची पदे समाविष्ट करण्याचा निर्णय घ्यावा आणि उमेदवारांच्या मानसिकतेसोबत न खेळता तात्काळ पूर्वपरीक्षेची तारीख लवकरात लवकर जाहीर करावी, अशी मागणी आमदार बच्चू कडू यांनी लोकसेवा आयोगाकडे केली आहे. एमपीएससीने २५ ऑगस्टला होणारी राज्यसेवा पूर्वपरीक्षा रद्द करून पंधरा दिवस उलटले आहेत, तरीदेखील परीक्षेची तारीख जाहीर न झाल्याने विद्यार्थी आता आक्रमक झाले आहेत.

» पान ७ वर

### पूजा खेडकर बनावट प्रमाणपत्र

# नगरच्या रुग्णालयातील मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** पूजा खेडकरला दिव्यंगत्वाची खोटी प्रमाणपत्रे देणाऱ्या अहमदनगर जिल्हा रुग्णालयात अशी खोटी प्रमाणपत्रे देणारे रॅकेट चालत असल्याचं समोर आलंय. अहमदनगर जिल्हा रुग्णालयाकडून याबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आल्यानंतर सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय. यापैकी दोन जण रुग्णालयात काम करणारे कर्मचारी आहेत तर चौघांनी अपंगांना मिळणाऱ्या योजनांचा लाभ घेता यावा यासाठी खोटी प्रमाणपत्रे बनवल्याच समोर आलंय. यामुळे अहमदनगरमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

» पान ७ वर

### वैद्यकीय तपासणी न करताच दिली प्रमाणपत्र

• दरम्यान, शहरातील सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांनी जिल्हा रुग्णालयातून बनावट दिव्यांग प्रमाणपत्र वितरित केले जात असल्याची तक्रार जिल्हा शल्य चिकित्सकांकडे केली होती. त्यांनी वरील चौघांची नावेही संशयित म्हणून तसेच त्यांनी कर्णबधिर असल्याचे दिव्यांगत्वाचे बनावट प्रमाणपत्र घेतल्याचेही नमूद केले होते. त्यानुसार जिल्हा रुग्णालयाने अंतर्गत चौकशी केली. त्यामध्ये दिव्यांग प्रमाणपत्र दिलेल्या दिवशी रजिस्टरला कोणतेही संबंधित व्यक्तींना प्रमाणपत्र दिले नसल्याचे तसेच त्यांची वैद्यकीय तपासणी अहवाल कागदपत्रेही उपलब्ध नसल्याचे, वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही तपासणी केली नसल्याचे उघड झाले. मात्र पोर्टलवर या चौघांच्याही दिव्यांग प्रमाणपत्राची नोंद आढळली. त्यामुळे राज्य सरकार व जिल्हा रुग्णालय प्रशासनाची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## जरांगे पाटलांनी उपोषणाची तारीख बदलली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी मोठा लढा उभारला. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली, मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या आपल्या मागणीवर मनोज जरांगे पाटील हे अजूनही ठाम आहेत. त्यांनी आपल्या मागण्यांसाठी अनेक उपोषणं केली. दरम्यान त्यांनी सरकारला 29 ऑगस्टची डेडलाई दिली होती. आपण पुन्हा एकदा 29 सप्टेंबरपासून उपोषणाला सुरुवात करणार असल्याची घोषणा त्यांनी 29 ऑगस्टला केली होती. आता मनोज जरांगे पाटील हे 29

» पान ७ वर

### जीवघेणी चेष्ठा जीवावर बेतली !

## तरुणाच्या डोक्यात कोयता मारून हत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उत्तमनगर येथे चेष्टा मस्करीतून झालेल्या वादातून एकाने एका तरुणाच्या डोक्यावर कोयत्याने वार करून त्यांची हत्या केली. तरुणाला मदत करण्याच्या बहाण्याने घरातून बाहेर बोलावून ही हत्या करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.जयदीप ज्ञानेश्वर भोंडेकर (वय २२, रा. गुजर कॉम्प्लेक्स, मासे आळी, उत्तमनगर, एनडीए रस्ता) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर अमित सुदाम गुजर (वय २१, रा. मासे आळी, उत्तमनगर, एनडीए रस्ता) असे खून करणाऱ्या आरोपीचे नाव असून त्याला उत्तम नगर पोलिसांनी अटक केली आहे.

### काय आहे घटना ?

• पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जयदीप हा रविवारी दुपारी घरी झोपला होता. यावेळी त्याचा मित्र व आरोपी अमित हा जयदीपच्या घरी आला. यावेळी त्याने 'दादा पोतं उचलायला जायचे आहे. माझ्यासोबत चल', असे म्हणत त्याने जयदीपला बाहेर बोलावले. जयदीप देखील मदत करण्याच्या हेतूने घराबाहेर गेला. मात्र, अमितने जयदीपच्या डोक्यात कोयत्याने वार केले. जयदीपच्या ओरडण्याचा आवाज आल्याने घरचे बाहेर गेले. तो पर्यन्त आरोपी फरार झाला होता. जयदीपला तातडीने दवाखान्यात भरती करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतांना, सोमवारी त्याचा मृत्यू झाला.

## टीईटी राज्यपरीक्षा १० नोव्हेंबर रोजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजय राठोड यांनी टीईटी परिक्षेत संदर्भात माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. राज्यातील पहिली ते आठवीच्या वर्गांना शिक्षक होण्यासाठी अनिवार्य असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) राज्य परीक्षा परिषदेतर्फे १० नोव्हेंबर रोजी घेतली जाणार आहे.त्यासाठी ९ ते ३० सप्टेंबर या कालावधीत अर्ज भरता येणार आहे.

राज्यातील पहिली ते आठवीच्या सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनांच्या अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण सेवक, शिक्षक या पदांसाठी उमेदवार टीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. राज्यात पवित्र संकेतस्थळाद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पहिल्या टप्प्याची भरती अंतिम टप्प्यात आहे, तर दुसऱ्या टप्प्यात काही हजार पदे भरली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे टीईटी कधी होणार याकडे उमेदवारांचे लक्ष लागले होते.

परीक्षा परिषदेने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, १० नोव्हेंबर रोजी टीईटी होणार आहे. २८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत प्रवेशपत्राची मुद्रित प्रत काढून घेता येणार आहे. १० नोव्हेंबर रोजी परीक्षेतील पेपर १ सकाळी साडेदहा ते एक या वेळेत, तर दुपारी दोन ते साडेचार या वेळेत पेपर २ होणार आहे. परीक्षेचे अर्ज केवळ ऑनलाइन भरणे आवश्यक आहे.

» पान ७ वर

## मुंबईचे डबेवाले शालेय पुस्तकात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईच्या प्रसिद्ध डबेवाल्याची कहाणी लवकरच घराघरात पोहोचणार आहे. केरळ सरकारने त्यांना शालेय अभ्यासक्रमाचा भाग करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या पाठ्यपुस्तकातील पाच पानांच्या अध्यायात नववीच्या इंग्रजी अभ्यासक्रमात डबेवाल्यांची कहाणी समाविष्ट करण्यात आली आहे. 'टिफिन वाहतुकीची गाथा' असे या अध्यायाचे नाव असून याचे लेखक ह्यू आणि कोलीन गँटझर त्यांच्या प्रवास कथा लिहितात. केरळ राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) २०२४ च्या नव्या अभ्यासक्रमात डबेवाल्यांच्या प्रेरणादायी कथेचा समावेश केला आहे. मुंबईची डबेवाला सेवा कशी सुरू झाली याची चर्चा या अध्यायात करण्यात आली आहे.

### आली गौराई आली.. सोनपावली आली...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**गौरी आवाहन! :** भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील षष्ठीला अनुराधा नक्षत्रावर गौरीचे आवाहन करण्यात आले. गौरीला आदीशक्तीचे रुप मानले जाते. गौरी-गणपतीचा सण हा महाराष्ट्रात मोठ्या भक्तीभावाने आणि उत्साहात साजरा केला जातो.

## १९ हजाराहून अधिक प्रवाशांनी केला फुकट प्रवास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे रेल्वे विभागात ऑगस्ट दरम्यान १९ हजार ९५० प्रवासी विनातिकीट प्रवास करणाऱ्यांवर कारवाई करून दंड वसूल केला आहे.मध्य रेल्वेच्या पुणे विभागाने फुकट्या प्रवाशांवर वचक बसण्यासाठी कारवाई मोहीम हाती घेतली आहे. मागील पाच महिन्यांत (१ एप्रिल ते ३१ ऑगस्ट) विनातिकीट प्रवासी/ अनियमित प्रवासी आणि बुक न केलेले साहित्य यांच्या १ लाख ४६ हजार ९४६ प्रकरणांमधून ९ कोटी ७५ लाख रुपये वसुल केले आहेत.तसेच अनियमितपणे आणि विनातिकीट प्रवास करणाऱ्या २ हजार २९९ प्रवाशांकडून ८७ लाख ८ हजार २२० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच साहित्य बुक न करता घेऊन जाणाऱ्या ३३६ प्रवाशांकडून ४२ हजार ९३० रुपये दंड वसूल करण्यात आला.

### १०० टन कचऱ्याचे बायोमानिंग

## तब्बल 13 कोटी 50 लाख रुपये मोजावे लागणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फुरसुंगी उरुळी देवाची डेपोतील कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यासाठी महापालिका प्रशासनाने काढलेले टेंडर चांगलेच महागात पडत असल्याचे समोर आले आहे. महापालिकेने टीपिंग शुल्कासाठी (कचरा वाहतुकीचा खर्च) निश्चित केलेल्या दरापेक्षा पात्र ठेकेदाराने १३५ रुपये जादा दर लावला आहे. त्यामुळे १०० टन कचऱ्याचे बायोमानिंग करताना तब्बल १३ कोटी ५० लाख रुपये महापालिकेला मोजावे लागणार आहेत. हा दर अव्वाचा सव्वा असल्याने महापालिकेने ठेकेदाराला दर कमी करण्यासाठी पत्र पाठवले आहे.



महापालिकेने राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार फुरसुंगी-उरुळी देवाची येथील कचरा डेपोतील ५३ लाख मेट्रीक टन कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यास सुरुवात केली आहे. २०१६, २०२१ मध्ये टेंडर काढून आत्तापर्यंत २१ लाख मेट्रीक टनाचे बायोमायनिंग झाले आहे. त्यानंतर आता १० लाख मेट्रीक टन कचऱ्याच्या बायोमायनिंगसाठी टेंडर काढले आहे, त्यासाठी टीपिंग शुल्काची रक्कम ८४४ रुपये प्रतिटन इतकी निश्चित केली आहे. हे टेंडर काढताना दोन लाख टन 'आरडीएफ'ची विल्हेवाट लावण्याचा अनुभव अनिवार्य करण्याची अट प्रशासनाने टाकली. त्यामुळे ठराविक ठेकेदारच पात्र ठरतील, महापालिकेचे नुकसान होईल, त्यामुळे ही अट रद्द करा, जास्त स्पर्धा झाल्यास महापालिकेचा आर्थिक फायदा होईल, अशी तक्रार प्रशासनाकडे करण्यात आली होती. पण या तक्रारींना बेदखल करत अट कायम ठेवली. त्यामुळे अवघे दोनच ठेकेदार पात्र झाले.

» पान ७ वर

#रा

## संगणक अभियंत्याकडून पोलिसांना मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे पुण्यात गेल्या काही दिवसापासून गुन्हेगारीमध्ये चांगलीच वाढ होताना दिसत आहे. यामध्ये सामान्य नागरिकांसह पोलीस देखील असुरक्षित आहेत. अशातच आता दारू पिऊन रस्त्यात गोंधळ घालणाऱ्या संगणक अभियंत्याला समज देण्यासाठी गेलेल्या पोलिसांना मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही घटना शहरातील घोरपडीतील बी. टी. कवडे रस्त्यावर घडली आहे. याप्रकरणी संगणक अभियंत्यासह त्याच्या भावाला वानवडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

## योग्य प्रतिनिधित्व मिळाल्यास तीनही पक्षांना फायदा: आठवले

**पुणे :** लोकसभा निवडणुकीत एनडीएला



अपेक्षित यश मिळाले नसले, तरी आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे. जर आम्हाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळाल्यास त्याचा फायदा महायुतीमधील तीनही पक्षांना निश्चित होईल, असा विश्वास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

» पान ७ वर

### प्रमाणपत्र तात्काळ मिळावेत

• जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रकरणे लवकर निकाली लागत नसल्याच्या तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. मी त्यावर गांभीर्याने विचार करतो आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र न मिळाल्याने मेडिकलसह विविध ठिकाणांहून एससी-एसटीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होत असल्याच्याही तक्रारी येत आहेत. त्यामुळे यासंदर्भात मी लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करेन व यासंदर्भात अधिकाऱ्यांची एक बैठक घेईल. कुणाही विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही, या दृष्टीने कटाक्षाने प्रयत्न केले जातील.

## प्रमुख रस्ते वाहतुकीस बंद

# शहराच्या मध्यभागातील वाहतुकीत बदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवाजी रस्त्यावरील जिजामाता चौक ते मंडई, मंडई ते शनिपार, शनिपार ते फुटका बुरूज, अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक या भागात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे.देखावे पाहण्यासाठी होणारी गर्दी विचारात घेऊन आज बुधवारपासून (११ सप्टेंबर) शहराच्या मध्यभागातील प्रमुख रस्ते सायंकाळी पाचनंतर वाहतुकीस बंद करण्यात येणार आहेत. लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, टिळक रस्ता वाहतुकीस बंद केले जाणार आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

घरगुती गणपती आणि गौरी विसर्जनानंतर सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणपतींच्या दर्शनासाठी आणि देखावे पाहण्यास गर्दी होते. गुरुवारपासून (११ सप्टेंबर) शहराच्या मध्यभागात गर्दी होण्याच्या शक्यता असल्याने वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. विसर्जन मिरवणुकीपर्यंत शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता अन्य सर्व वाहनांसाठी सायंकाळी पाचनंतर मध्यभागातील प्रमुख रस्ते बंद ठेवण्यात येणार आहेत. गर्दी ओसरेपर्यंत मुख्य रस्ते बंद असतील. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे.





### वाहतुकीस बंद असणारे अंतर्गत रस्ते पुढीलप्रमाणे-

- सिंहगड गॅरेज (घोरपडे पेठ ते राष्ट्रभूषण चौक ते हिराबाग चौक), दिनकरराव जवळकर चौक ते पायगुडे चौक ते हिराबाग चौक, कै. अनंत बाळकृष्ण नाईक पथ ते टिळक रस्ता, सणस रस्ता (गोटीराम भैय्या चौक, मंडई ते गोविंद हलवाई चौक), पानघंटी चौक ते गंज पेठ पोलीस चौकी, गंज पेठ ते वीर लहुजी वस्ताद तालीम चौक, गायकसाब मशीद ते सेंटर स्ट्रीट पोलीस चौकी (लष्कर), कोहिनूर चौक ते बाबाजान चौक (लष्कर), जेधे प्रासाद रस्ता, सुभानशाह दर्गा, पार्श्वनाथ चौक, शास्त्री चौक ते सोन्या मारुती चौक, गुरुनानक पथ ते हमजेखान चौक (देवजीबाबा चौक, गणेश पेठ)

### वाहतुकीस बंद असणारे रस्ते पुढीलप्रमाणे-

- लक्ष्मी रस्ता (हमजेखान चौक ते टिळक चौक), शिवाजी रस्ता (गाडगीळ पुतळा चौक ते देशभक्त केशवराव जेधे चौक, स्वारगेट), बाजीराव रस्ता (पूरम चौक ते अप्पा बळवंत चौक), टिळक रस्ता (मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ते हिराबाग चौक)

## महिलांवरील अन्यायाविरोधात शांतता मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पश्चिम बंगालमधील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील अत्याचार असो की, बदलापूर येथील चिमुकलीवरील अन्याय असो, महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना कठोर शासन करावे, या मागणीसाठी, महिलांवरील अन्यायाविरोधात जागृती करण्यासाठी सूर्यदत्त विधी महाविद्यालयाच्या (एसएलसी) वतीने बावधन परिसरात शांतता मोर्चा काढण्यात आला. सुर्यदत्त विधी महाविद्यालयापासून एनडीए रोडपर्यंत आणि पुन्हा बवधनमध्ये बॅनर आणि पोस्टर्स हातात घेऊन हा मोर्चा निघाला. महिला सुरक्षा आणि संरक्षणाबद्दलची आपली तीव्र चिंता आणि संवेदनशीलता व्यक्त करण्यासाठी आणि पीडित महिलेप्रती ऐक्य दर्शवण्यासाठी हा मोर्चा होता. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या या शांतता मोर्चामध्ये 'एसएलसी' आणि सूर्यदत्त कॉलेज ऑफ मॅनेजमेंटचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

## Selected

## सीबीएसईद्वारा शाळा तपासणी मोहीम हाती


**पुणे :** राजस्थान आणि दिल्लीतील २७ शाळांमध्ये सीबीएसई ने अचानक तपासणी केली आहे. तपासणी दरम्यान बोर्डाचे नियम पाळत नसल्याचे आढळणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यात येणार आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (सीबीएसई) संलग्न असलेल्या शाळा नियमांचे पालन करत आहेत याची खात्री करण्यासाठी शाळा तपासणीची मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. यात बनावट शाळांसह नियमांचे पालन न करणार् या शाळांचा शोध सुरु करण्यात आला आहे. या तपासणीचा उद्देश बोर्डाशी संलग्न असलेल्या शाळा सीबीएसईने ठरवून दिलेल्या नियमांचे आणि उपनियमांचे काटेकोरपणे पालन करत आहेत की नाही याची खात्री करणे हा आहे. या तपासणीच्या निष्कर्षांचे सर्वसमावेशकपणे पुनरावलोकन केले जाईल आणि त्याचे पालन न झाल्यास शाळेवर योग्य ती कारवाई केली जाणार आहे.

## अजितदादांकडून दुचाकीस्वाराची आपुलकीने विचारपूस

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार मंगळवारी पुणे दौऱ्यावर होते. निवासस्थानाहून सर्किट हाऊसकडे जात असताना त्यांना संचेती हॉस्पिटलच्या पुलाखाली एका दुचाकीस्वराचा अपघात झालेला दिसला.हे पाहून त्यांनी तत्काळ आपला ताफा थांबवून दुचाकीस्वाराला मदतीचा हात दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार दिवसभर पुणे शहर दौऱ्यावर आहेत. तत्पूर्वी, अजित पवार यांना सकाळीच प्रशासकीय आढावा बैठकींना सुरुवात करायची असल्याने ते आपल्या निवासस्थानावरून अगदी सहाच्या ठोक्याला बाहेर पडले. आपल्या शासकीय वाहनातून जात असताना संचेती हॉस्पिटलच्या पुलाखाली एका दुचाकीस्वाराचा अपघात झालेला त्यांना दिसला. त्यांनी त्वरित आपला ताफा थांबवत अपघातग्रस्त व्यक्तीची चौकशी करून त्यांना धीर दिला. कुठे लागले तर नाही ना अशी विचारपूस करत त्यांच्याशी संवाद साधला.अपघात कसा काय झाला? असे अजित पवार यांनी दुचाकीस्वाराला विचारले. त्यावर रिक्षा आडवी आल्याने किरकोळ अपघात झाला. परंतु केवळ हाताला खरचटले असल्याने काळजीचे कारण नाही. मी ठीक आहे, असे दुचाकीस्वाराने अजित पवार यांना सांगितले. अपघातग्रस्तावर 'संचेती' रुग्णालयात प्राथमिक उपचार करा, अशा सूचना अजित पवार यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या व आपल्या पुढील कामासाठी ते रवाना झाले.

## दैनिक भारत डायरीचे संपादक अशोक अग्रवाल यांचे निधन

**पुणे :** दैनिक भारत डायरीचे प्रतिष्ठित संपादक अशोक अग्रवाल यांचे सोमवारी पुण्यात हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झाले. त्यांचे वय सुमारे 60 वर्षे होते. त्यांच्या निधनाने हिंदी पत्रकारितेची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे. अशोक अग्रवाल निःपक्षपाती, निर्भय आणि सचोटीवर आधारित पत्रकारितेसाठी प्रसिद्ध होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अग्रवाल यांनी आयुष्यभर श्रमिक पत्रकार म्हणून आपला ठसा उमटवला आणि संपूर्ण प्रामाणिक आणि समर्पणाने लढाऊ पत्रकारिता केली. त्यांचे योगदान केवळ पुण्यासाठीच नव्हे तर संपूर्ण हिंदी पत्रकारिता जगतासाठी प्रेरणादायी होते. अशोक अग्रवाल यांनी निःपक्षपाती आणि निर्भय पत्रकारितेचा आदर्श घालून दिला, जो सचोटीने आणि समाजाच्या खऱ्या सेवेने प्रेरित झाला.



## राज्याचा उर्जा संक्रमण आराखडा तयार करण्याच्या सूचना

**पुणे :** दिवसेंदिवस राज्याचा विस्तार होत आहे त्यामुळे मिळणारी वीज कमी पडत आहे. राज्यात सद्यस्थितीत वीजेची मागणी सातत्याने वाढत आहे, अशा वेळी वीजेची मागणी पूर्ण करणे, वाढीव वीजेच्या अनुषंगाने पारेषण व वितरण प्रणालीचे आस्थापन व सबलीकरण करणे, महावितरण कंपनीस स्वस्त दरात वीज उपलब्ध होणे, यासाठी राज्याचा उर्जा संक्रमण आराखडा (ब्लू प्रिंट) तयार करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली असूनया समितीच्या अध्यक्षपदी उर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव यांची नियुक्ती करण्यात आली आहेत.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पालिकेत नोकरी मिळवण्यासाठी वाट्टेल ते

### सात दिव्यांग सर्टिफिकेट बोगस ?

**पुणे :** महापालिकेत मागील वर्षी, तसेच गेल्या काही वर्षांत वेगवेगळ्या विभागांत भरती करण्यात आलेल्या अभियंत्यांमध्ये बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करण्यात आल्याची तक्रार दिव्यांग कल्याण विभागाकडे आली आहे.या तक्रारीत ही बाब गंभीर असून, याप्रकरणी सखोल चौकशी करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे, अशी मागणी तक्रारदाराने दिव्यांग कल्याण आयुक्तांकडे केली आहे. त्यानुसार दिव्यांग कल्याण आयुक्तांनी महापालिकेला पत्र देऊन त्यावर कार्यवाही करावी, असे कळविले होते.

देशभर गाजत असलेल्या माजी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांची चर्चा देशभर सुरू असतानाच पुणे महापालिकेतही नोकरी मिळविण्यासाठी सात जणांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून नोकरी मिळविल्याची तक्रार महापालिकेस प्राप्त झाली आहे.महापालिका प्रशासनाने ही तक्रार गांभीर्याने घेत या प्रकरणांची चौकशी सुरू केली असून, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना सोमवारी दिल्या आहेत. महापालिकेच्या सेवक वर्ग विभागाने या तक्रारींची दखल घेत संबंधित अभियंत्यांच्या चौकशीबाबत आयुक्तांच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला आहे, तर राज्य शासनाकडेही याबाबत तक्रारी आलेल्या असून, शासनाने त्यावर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तत्काळ या अभियंत्यांच्या चौकशीसाठीचा प्रस्ताव महापालिका आयुक्तांच्या मान्यतेसाठी ठेवला आहे.अतिरिक्त आयुक्तांकडूनही याप्रकरणी तत्काळ प्राथमिक अहवाल सादर करण्याच्या सूचना सामान्य प्रशासन विभागास देण्यात आल्या आहेत.



## शांतता मोर्चा

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**पुणे :** महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना कठोर शासन करावे, या मागणीसाठी, महिलांवरील अन्यायाविरोधात जागृती करण्यासाठी सूर्यदत्त विधी महाविद्यालयाच्या (एसएलसी) वतीने बावधन परिसरात शांतता मोर्चा काढण्यात आला.

## घनकचरा विभागाकडून पुढचे पाऊल

# अखेर रस्त्याची सफाई सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मॅकेनिकल स्विपिंग होत नसल्याने शहरातील बहुतांश प्रमुख रस्त्यांच्या कडेला आणि उड्डाणपुलांवर कचरा साठला. तसेच पावसाळ्यात वाहनांच्या टायरमुळे येणाऱ्या मातीचे थर लागल्याने पुलावरून वाहने चालविणेही अवघड झाले होते. यासंदर्भातील वृत्त दोन दिवसांपुर्वी माध्यमांतून प्रसिद्ध झाले. याची दखल घेत घन कचरा विभागाने शहरातील सर्व क्षेत्रिय कार्यालयांना त्यांच्या हद्दीतील प्रमुख रस्ते आणि उड्डाणपुलांची स्वच्छता करण्यास सांगितले होते.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर क्षेत्रिय कार्यालयांच्या माध्यमातून स्वच्छतेचे काम करण्यात आले आहे. मॅकेनिकल स्विपिंगच्या निविदा रद्द करण्यात आल्याने शहरातील बहुतांश भागातील रस्ते आणि उड्डाणपुलांवर कचऱ्याचे साम्राज्य पसरल्याच्या वृत्ताची घनकचरा विभागाने दखल घेतली. मागील दोन दिवसांत क्षेत्रिय कार्यालयांच्या सेवकांमार्फत हे रस्ते आणि उड्डाणपुल स्वच्छ करण्यात आले आहेत, अशी माहिती घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी दिली.

महापालिकेच्या हद्दीतील मोठे रस्ते आणि उड्डाणपुलांची स्वच्छता मॅकेनिकल स्विपिंगद्वारे केली जाते. प्रामुख्याने रात्रीच्यावेळी ही स्वच्छता करण्यात येते. मात्र, हडपसर-वानवडी परिसर वगळता उर्वरीत शहरातील मॅकेनिकल स्विपिंगचे कंत्राट फेब्रुवारी महिन्यांत संपले आहे. प्रशासनाने मॅकेनिकल स्विपिंगसाठी निविदा काढल्या होत्या. परंतू या निविदा ३५ टक्क्यांहून अधिक दराने आल्याने त्या रद्द करून फेरनिविदा काढण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला.

> रामटेकडी, हांडेवाडी परिसरातील कचरा प्रक्रिया प्रकल्पांना नोटीस पाठविल्या आहेत. त्यापैकी दोन प्रकल्प चालकांनी तो ट्रक त्यांच्या प्रकल्पांतून गेला नसल्याचे सांगितले. उर्वरीत प्रकल्पातून लवकरच माहिती मिळेल, अशी अपेक्षा कदम यांनी व्यक्त केली.
> — संदीप कदम

## पर्यावरण तज्ञांचा आरोप

# पूररेषेच्या आत बांधकामास परवानगी दिल्याने पूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही वर्षांत महापालिकेसह पिंपरी-चिंचवड महापालिकेने पूररेषेकडे दुर्लक्ष करून अनेक बांधकामांना परवानगी दिली आहे. अशा इमारतींना परवानगी मिळविण्यासाठी शर्यत लागली आहे. त्यामुळे नदीतून जाणाऱ्या पाण्याचा प्रवाह विस्कळीत झाला आहे.महापालिकेने शहरातील पूरस्थितीचे नेमके कारण शोधण्यासाठी समिती नेमली असून आठ दिवसांची मुदत संपल्यावरही त्यांनी अहवाल सादर केलेला नाही. पूरस्थितीला पुणे महापालिकाच जबाबदार असल्याने त्यांच्या अहवालातून सत्य कधीही बाहेर येणार नाही, असा आरोप पर्यावरण तज्ज्ञांनी पत्रकारांशी बोलताना केला आहे. नदीपात्रातील निळ्या पूररेषेच्या आता बांधकामास परवानगी दिल्याने पूर येत असल्याचा दावाही त्यांनी केला.

महापालिकेलाच जबाबदार धरले आहे. पालिकेच्या समितीमध्ये पथ बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता साहेबराव दांडगे, कार्यकारी अभियंता बिपीन शिंदे, ड्रेनेज विभागाचे दिनकर गोजारे आणि आमंत्रित सदस्य म्हणून जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सुनंदा जगताप यांचा समावेश केला आहे. समितीने अहवाल तयार करण्यासाठी महिनाभराचा कालावधी घेतला आहे. परंतु अद्याप अहवाल सादर झाला नाही. काही अधिकाऱ्यांनी अहवाल सादर केला आहे, पण आयुक्तांना मिळाला नसल्याचे सांगितले. त्यामुळे हा अहवाल जनतेसाठी खुला होणार की नेहमीप्रमाणे तो गुलदस्तातच राहणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

जलसंपदा विभागाने २०११ मध्ये मुठा नदीची पूररेषा तयार केली होती. गेल्या काही वर्षांत पूररेषेच्या आत भराव टाकण्यासह अनधिकृत बांधकामांमुळे नदीचे पात्र अरुंद झाले आहे. महापालिकेने २०१३ ते २०१७ मध्ये तयार केलेल्या शहर विकास आराखड्यात नदीची पूररेषा बदलल्याचा आरोप पर्यावरण तज्ज्ञांनी केला आहे. तसेच २०१६ पासून शहरात खोट्या पूररेषा चिन्हांकित करून अनेक बांधकामांना परवानगी देण्यात आली आहे. नदी सुधार प्रकल्प आणि मेट्रो प्रकल्पाच्या माध्यमातून नदी लहान करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप पर्यावरणतज्ज्ञ सारंग यादवाडकर यांनी केला आहे.

> महापालिकेवर नदीपात्राची संरक्षित करण्याची जबाबदारी होती. मात्र त्यात महापालिकेला अपयश आले आहे. नदीपात्र अरुंद होत असल्याने पाण्याचा फुगवटा होत असल्याने पूर परिस्थिती निर्माण होत आहे, असेही त्यांनी सांगितले. याबाबत महापालिकेच्या बांधकाम विभागाशी संपर्क साधला असात कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.
> — सारंग यादवाडकर

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची स्व. विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाला भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे महानगरपालिकेच्या हडपसर येथील राजर्षी शाहू महाराज संकुलामधील स्व. विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाला सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. यावेळी नाट्यगृहाचे सौंदर्य अबाधित राहील यादृष्टीने स्वच्छता, नियमित देखभाल दुरुस्ती याकडे विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

यावेळी आमदार चेतन तुपे, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, माजी महापौर वैशाली बनकर, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, उपायुक्त (सांस्कृतिक) सुनील बल्लाळ, मुख्य अभियंता (भवन) युवराज देशमुख, हडपसर क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त बाळासाहेब ढवळे पाटील, माजी स्थायी समिती अध्यक्ष बाबुराव चांदेरे, माजी नगरसेवक सुनील बनकर आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. पवार म्हणाले, पुणेकरांना मुळातच नाटकाची आवड आहे. त्यामुळे येरवडा, वडगाव शेरी, पिंपरी- चिंचवड आदी भागांसह हडपसर येथे अद्ययावत नाट्यगृह असण्याची गरज होती. हडपसर येथे स्व. विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाचे काम झाल्यामुळे येथील नाट्यप्रेमी, कलाप्रेमींना लाभ होणार आहे.

यावेळी आयुक्त डॉ. भोसले यांच्याशी चर्चा करताना ज्या इमारती अगदी थोड्या निधीअभावी अपूर्ण आहेत त्या पूर्ण कराव्यात असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. यानुसार २२ अपूर्ण इमारतींना प्राधान्याने निधीची तरतूद करुन पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे डॉ. भोसले यांनी सांगितले.

नाट्यगृहाचे भाडे १० हजार रुपये ठेवण्याचे नियोजन करण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले. त्यावर नाट्यनिर्माते, दिग्दर्शकांशी बैठक घेऊन महानगरपालिकेलाही परवडेल आणि नाट्यनिर्मात्यांनाही परवडेल असे भाडे निश्चित केल्यास अधिकाधिक नाटकांचे खेळ होऊन महापालिकेला नाट्यगृहाच्या देखभालीसाठी उत्पन्न मिळू शकेल.

### अलंकारांनी सजून पारंपरिक वेशभूषेत श्रींची आरती

# दगडूशेठ'च्या दर्शनाला 'मंगलमुखी' तृतीयपंथी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सामान्य स्त्री-पुरुषांप्रमाणेच समाजातील महत्त्वाचा मात्र बाजूला असलेला घटक म्हणजे तृतीयपंथी. गणपती बाप्पाच्या भेटीची ओढ जशी सामान्य भक्ताला असते, तशी या तृतीयपंथींच्या मनातील बाप्पाच्या भेटीची ओढ आज दगडूशेठ गणपतीसमोर पहायला मिळाली. विविधांगी अलंकारांनी सजून आपल्या पारंपरिक वेशभूषेत तृतीयपंथीयांनी दगडूशेठ गणपतीचे मनोभावे दर्शन घेत आरतीही केली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे १३२ व्या वर्षी आयोजित गणेशोत्सवात गणेश पेठेतील मंगलमुखी किन्नर चॅरिटेबल ट्रस्ट मधील तृतीयपंथीयांनी गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### असाच मान मिळो : किन्नर परिवार

- दरवर्षीप्रमाणे यंदाही किन्नर परिवार दगडूशेठ गणपतीच्या दर्शनाला आला आहे. भारतामध्ये महिला व मुलींच्या सुरक्षेच्या प्रश्न मोठा आहे. त्यामुळे याकरिता आम्ही बाप्पा चरणी प्रार्थना केली आहे की बाप्पाने त्यांना संरक्षण कवच द्यावे. दरवर्षी आम्हाला आरतीचा मान मिळतो आहे, तो दरवर्षी मिळत रहावा, अशी इच्छा किन्नर परिवारातर्फे व्यक्त करण्यात आली.

#रा

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतले 'दगडूशेठ' गणपतीचे दर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणरायाने सर्वांना सुखी ठेवावे, असे साकडे घालत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गणरायाची आरती देखील केली.



ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सहचिटणीस अमोल केदारी यांसह ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सन्मानचिन्ह व महावस्त्र देऊन अजित पवार यांचा ट्रस्टतर्फे सन्मान करण्यात आला.

## अमोल बालवडकर संतापजन्य प्रतिक्रिया

# पालिका परिसरात केले धुरीकरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरात डेंगू, चिकनगुनिया, झिका आणि मलेरियाची साथ सुरू आहे. कोथरूड भागामध्ये या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र पुणे पालिकेकडून या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी योग्य प्रकारे

## » कॉलम हेडिंग

काळजी घेत घेतली जात नसल्यामुळे 'झोपेचे सोंग' घेणाऱ्या प्रशासनाला जागे करण्यासाठी माजी नगरसेवक अमोल बालवडकर सोमवारी चक्क महापालिकेत धुरीकरण मशीन घेऊन आले. महापालिका परिसरात धुरीकरण करून त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. आता तरी प्रशासन जागे होऊन नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेईल अशा संतापजनक भावना अमोल बालवडकर यांनी यावेळी व्यक्त केल्या.





"कोथरूड परिसरामध्ये प्रचंड प्रमाणात डेंगू, मलेरिया, झीका, चिकनगुनिया यांसारख्या कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. अनेक रुग्ण उपचार मिळत नसल्यामुळे तक्रारी करतात. यासाठी स्वखर्चाने गेल्या पंधरा दिवसापासून कोथरूड परिसरातील अनेक सोसायटी, बैठी घरे, व्यावसायिक आस्थापना यांच्या परिसरात धुरीकरण सुरू केले आहे. दिवसभरात अनेकांचे कॉल या धुरीकरणासाठी येतात. रुग्णांची संख्या, त्यांना मिळत नसलेले उपचार त्यामुळे होणारी नागरिकांची फरपट प्रशासनाने गांभीर्याने घेतली पाहिजे."

— अमोल बालवडकर माजी नगरसेवक

कोथरूड परिसरात डेंगू, मलेरिया, झिका, चिकनगुनिया यासारख्या कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव गेल्या महिन्याभरापासून वाढला आहे. याबाबत पालिकेकडून योग्य उपाय योजना केल्या जात नसल्यामुळे डॉ. नीना बोऱ्हाडे यांची अमोल बालवडकर यांनी भेट घेतली.

महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून तपासणी मोहीम हाती घेतली जाते. मात्र त्यानंतर या आजारांना आळा घालण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही. यामुळे सोसायटी, बैठी घरे, गृहसंकुल यामध्ये या रोगांचा प्रादुर्भाव प्रचंड प्रमाणात वाढला आहे. तपासणी मोहीम करणे, नागरिकांना नोटिसा बजावणे. एवढेच सोपस्कार महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून पार पाडले जातात. मात्र त्यानंतर या नागरिकांना आरोग्य उपचार वेळेत मिळतात का ? याबद्दल कोणतीही उपाययोजना महापालिकेकडे नाही.

# मुख्यमंत्रीपदाबाबत शहांसोबत चर्चा केली नाही : अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मी मुख्यमंत्रीपदाबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत चर्चा केली नाही, असा खुलासा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केला.



महाराष्ट्र भाजपच्या नेत्यांनी 25 जागांवर मैत्रीपूर्ण लढत व्हावी, अशी मागणी केल्याची चर्चाही पवार यांनी फेटाळून लावली. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात बिहार पॅटर्न राबवला जावा आणि मला मुख्यमंत्री द्यावं, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्याची कुजबुज सुरू आहे. पण, यामध्ये काहीही तथ्य नसून मी अमित शहा यांच्याकडे काहीही मागणी केली नसल्याचे अजित पवार यांनी सांगितले. मी अमित शहा यांच्या सोबत कापूस, सोयाबीन आणि कांदा उत्पादकांसह इतर प्रश्नांवर चर्चा केली. यापुढे कांद्याची निर्यातबंदी होऊ नये, तर, आपण एफआरपीचे दर वाढवितो. मात्र, एमएसपीमध्ये वाढ झालेली नाही. ती वाढ करावी, अशा अनेक मागण्या अमित शहा यांच्याकडे केल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

महायुतीमध्ये 150 जागा भाजप लढविणार असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, जागावाटपाचा फॉर्म्युला अद्यापही ठरला नसल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. ज्यावेळी जागावाटप ठरणार, त्यावेळी माहिती देण्यात येणार आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE

### मिटसॉगच्या २० व्या तुकडीचा शुभारंभ १३ सप्टेंबर रोजी

**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्यावतीने आयोजित 'मास्टर्स इन पॉलिटिकल लिडरशीप अँड गव्हर्नमेंट' (एमपीजी) २० व्या तुकडीचा शुभारंभ १३ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वा. कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयूच्या संत ज्ञानेश्वर हॉल येथे संपन्न होणार आहे. पंजाब विधानसभेचे सभापती कुलतार सिंह संधवान, राजस्थान विधानसभेचे माजी सभापती डॉ. सी.पी.जोशी व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांच्या हस्ते एमपीजी बॅचच्या २० व्या तुकडीचा शुभारंभ होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड असतील.

एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष, एनएलसी भारत आणि बीसीएसचे संस्थापक राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, एमआयटी मिटसॉगचे संचालक डॉ. के. गिरीसन व श्रीधर पब्बीशेट्टी हे उपस्थित राहणार आहेत. सुशिक्षित युवकांनी राजकारणात यावे या उद्देशाने राहुल विश्वनाथ कराड यांनी २००५ साली राजकारणाचे प्रशिक्षण देणारी पहिली संस्था म्हणजेच एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्मेंट स्थापन करण्यात आली. २० वर्षात शेकडो विद्यार्थी बाहेर पडून देशातील विविध राजकीय पक्षांमध्ये उच्च पदस्थ आहेत. तसेच अनेक सामाजिक संस्थांमध्ये सुद्धा कार्यरत आहेत. अशी माहिती मिटसॉगचे प्रा. डॉ. परिमल माया सुधाकर यांनी दिली आहे.

# श्री गणेश विसर्जनाकरिता पालिकेच्या वतीने जय्यत तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महानगरपालिकेच्या वतीने श्री गणेश विसर्जनाकरिता सर्व स्तरांवरुन जय्यत तयारी करण्यात आलेली असून याकरिता मनपाचे विविध विभाग, क्षेत्रिय कार्यालयांनी आपल्या स्तरावरही जय्यत तयारी केलेली आहे.


नदीकिनार परिसरातील विसर्जन घाटांवरील दुरुस्ती, रंगरंगोटी, लोखंडी टाक्या, निर्माल्य कलश, विसर्जन हौद, विसर्जन घाटावरील विद्युत व्यवस्था, कचरा वाहतूक व्यवस्थेचे नियोजन या स्वरुपाच्या कामाबरोबरच सार्वजनिक स्वच्छता, मिरवणूक मार्गावर स्वच्छता व औषधोपचाराची व्यवस्था, ग्रुप स्विपींग, कंटेनर, निर्माल्य कलश, किटकनाशक फवारणी, विसर्जन घाटांवर अग्निशमनदल कर्मचारी व्यवस्थापन, घाटांवर औषध फवारणी, नदी किनारच्या विसर्जन घाटांवर तसेच ज्या भागात नदी, तलाव, विहीरी नाहीत अशा परिसरातून विसर्जन हौद, लोखंडी टाक्यांची सोय करण्यात आलेली आहे. त्याच बरोबर जीवरक्षकांच्या नियुक्त्या, दोन पाळ्यांतून अधिकारी, कर्मचारी यांच्या नियुक्त्या, सुरक्षा यंत्रणा, विद्युत जनित्र, ध्वनिक्षेपक यंत्रणा, जलवाहिनी व मलवाहिन्या यांचे गळती ठिकाणी त्वरीत दुरुस्ती कामे करणेकरिता स्वतंत्र कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणेत आलेल्या आहेत. ध्वनीक्षेपनाची व प्रकाशाची व्यवस्था करणेत आलेली आहे. सार्वजनिक स्वच्छता गृहे, शौचालयांची स्वच्छता, फिरती शौचालये, सुचना फलक आदी स्तरावरुन तयारी करणेत आलेली आहे.

गणेश विसर्जन कोणत्याही नदी किवा तलावात (नैसर्गिक जलस्त्रोतात)करू नये. जमा झालेले निर्माल्य कोठेही न टाकता महानगरपालिकेच्या यंत्रणेकडे सुपूर्त करावे किवा निर्माल्य कलशामध्ये टाकावे. तसेच दैनंदिन येणाऱ्या कचरा वेचकांमार्फत सुद्धा घरातील निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. गणेश मूर्ती विसर्जनाऐवजी मूर्तीदान हि संकल्पना महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत असून जास्तीत जास्त नागरिकांनी मूर्ती दान करावी.

दीड दिवसांचे गणेश विसर्जन मोठ्या उत्साहात व शांततेने पार पडले. १५ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत बांधलेल्या हौदात २७२२ मूर्तींचे विसर्जन झाले, लोखंडी टाक्यांमध्ये ७६२७ मूर्तींचे विसर्जन झाले, संकलित केलेल्या १०९७ मूर्ती होत्या. अशा रीतीने एकूण ११४४६ गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. तसेच अंदाजे १३३७५.७५ किलो निर्माल्य जमा झाले.

## प्रमुख विसर्जन घाट खालीलप्रमाणे

- संगम घाट
- ओंकारेश्वर
- वृध्देश्वर घाट / सिध्देश्वर घाट
- पुलाची वाडी, नटराज सिनेमा मागे
- अष्टभुजा मंदिर (नारायण पेठ)
- खंडोजी बाब चौक
- बापूघाट (नारायण पेठ)
- गरवारे कॉलेजची मागील बाजू
- विठ्ठल मंदिर (अलका चौक)
- दत्तवाडी घाट
- ठोसरपागा घाट
- औंधगाव घाट
- राजाराम पूल घाट, सिध्देश्वर मंदिर
- बंडगार्डन घाट
- चिमा उद्यान येरवडा
- पांचाळेश्वर घाट
- वारजे कर्वेनगर, गल्ली क्र.१ नदीकिनार



### महात्मा गांधी विद्यालयात मुलींना स्वसंरक्षण व आरोग्याचे धडे



**पुणे :** खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे महात्मा गांधी विद्यालयात मुलींना स्वसंरक्षणार्थ व आरोग्याच्या समस्यांबाबत डॉ.दिपाली कोलते यांनी मार्गदर्शन केले.व विद्यार्थिनींना आपल्या कोणत्याही व्यक्तींनी स्पर्श केला तर तो कशा प्रकारचा आहे हे समजणे गरजेचे आहे व त्याविषयी आपल्या पालकांशी,शिक्षकांशी न घाबरतात न लाजता सांगणे गरजेचे आहे याविषयी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मुलींना समजावून सांगितले. तरुण मुलींमध्ये हार्मोन्स असंतुलनाची कारणे व त्यावरील उपाययोजना याविषयी चर्चा करण्यात आली.आहार,व्यायाम आणि जीवन पद्धतीबाबत मार्गदर्शन केले.विद्यालयाचे प्राचार्य सुभाष देशमुख यांनी डॉ.दिपाली कोलते यांचे स्वागत केले. प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक शशिकांत जाधव यांनी केले. सूत्रसंचालन नूतन ओतुरकर यांनी केले.याप्रसंगी विद्यालयाचे प्रथम विद्यार्थी रघुनाथ यादव,साधना यादव,ज्येष्ठ शिक्षक ज्योत्स्ना गुरव,कीर्ती जाधव,मीरा कदम, सारीका तापकीर,शीतल सुकाळे,सुजाता भोसले,अपर्णा आढाव,मानसी मोरे,शीतल करंजे, ग्रंथपाल उज्वला शिंदे,सुजाता दौलताबाद आदी उपस्थित होते. यावेळी मुलींनी आपल्या मनातील शंकासमाधान डॉक्टर कोलते यांनी केले.मीरा कदम यांनी महिला तक्रार निवारण समितीच्या कार्याची माहिती दिली.मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# ध्वनिप्रदूषणाच्या कमाल मर्यादा पातळीचा सर्वत्र भंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** गणेशोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांत शहरात सर्वच ठिकाणी आवाजाच्या पातळीने ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा ओलांडल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मोजण्यात आलेल्या ध्वनिपातळीतून हे स्पष्ट झाले आहे. यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित लवादाने दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजली जात आहे. हे काम एका खासगी संस्थेला देण्यात आले आहे. या संस्थेने राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांच्या साह्याने ध्वनिप्रदूषण पातळी मोजण्यास सुरुवात केली आहे. दररोज सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही पातळी मोजली जाते. ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा पातळी दिवसा ७५ डेसिबल आणि रात्री ७० डेसिबलपर्यंत आहे. शहरात सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी ७५ ते ८५ डेसिबलदरम्यान नोंदविण्यात आली आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात शहरभर ध्वनिप्रदूषण होत असल्याची बाब उघडकीस आली आहे.गणेशोत्सवातील वाढत्या ध्वनिप्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत असल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कल्याणी मांडके यांनी लवादाकडे याचिका दाखल केली होती. यात राज्य सरकार, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे महापालिका आणि पुणे पोलिसांना प्रतिवादी करण्यात आले होते. पुण्यात गणेशोत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. यावर महाराष्ट्र प्रदूषण मंडळासह पुणे पोलिसांना ध्वनिप्रदूषण कमी करण्याचा आदेश देण्यात आला आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

# मानकर यांना विधान परिषदेवर घ्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहर अध्यक्ष दीपक मानकर यांना विधान परिषदेवरील राज्यपाल नियुक्त कोट्यातून आमदार करण्यात यावे, या मागणीसाठी आज पुण्यातील कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. रुपाली ठोंबरे पाटील आणि रुपाली चाकणकर आमने सामने असताना आता मानकर समर्थकांनी फील्डिंग लावल्याचे बोलले जात आहे. मानकर शहराध्यक्ष झाल्यापासून त्यांनी शहरभर कार्यकर्त्यांची नवी फळी निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांचा आमदारकीसाठी विचार करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



दीपक मानकर यांना राज्यपाल नियुक्त आमदार करा, यासाठी पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी अजित पवार यांची भेट घेतली. दरम्यान, कार्यकर्त्यांनी ही मागणी केलेली आहे त्यामुळे कार्यकर्त्यांच्या भावनांचा मी आदर करतो, असे मानकर यांनी सांगितले.

विधानपरिषद आदारकीसाठी दीपक मानकर इच्छुक होते. तशी इच्छा त्यांनी बोलून दाखवली होती, पण राजेश विटेकर यांना आमदारकी मिळाल्याने मानकर यांची संधी हुकली होती. मी गेल्या २० वर्षांपासून पक्षात सक्रिय काम करत असल्याने दादा मला न्याय देतील, असं दीपक मानकर यांनी सूचक वक्तव्य केलं होतं. या पार्श्वभूमीवर आज पुन्हा दीपक मानकर यांचे कार्यकर्ते अजित पवार यांना भेटले. त्यामुळे अजित पवार काय निर्णय घेणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### मंडई परिसरातून महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्राची चोरी

**पुणे :** गणेशोत्सवात शहरात चोख बंदोबस्त ठेवलेला असताना खडकी भागात महिलांच्या गळ्यातील दागिने चोरुन नेल्याच्या घटना उघडकीस आल्या.कर्वेनगर भागातील भाजी मंडई चौकाजवळ एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील एक लाख पाच हजार रुपयांचे मंगळसूत्र चोरून नेण्यात आल्याची घटना घडली. याबाबत एका महिलेने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला सोमवारी सायंकाळी सहाच्या सुमारास भाजी मंडई परिसरातून निघाल्या होत्या. त्यावेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरून नेले. सहायक पोलीस निरीक्षक मोहिते तपास करत आहेत.गणेशोत्सवात शहर परिसरात बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. साडेपाच हजार पोलीस बंदोबस्तावर असून, गुन्हे शाखेच्या पथकाने पायी गस्त घालण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरात बंदोबस्त तैनात असताना दागिने चोरीच्या घटना घडल्या.

# 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी'च्या दारी मान्यवरांची मांदीयाळी









**बाप्पाचे दर्शन :** केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सहकुटुंब तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, भारतीय जनता पक्षाच्या प्रवक्त्या चित्रा वाघ यांनी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट येथे भेट देऊन श्रींचे दर्शन घेऊन बाप्पांची आरती केली. यावेळी प्रसिद्ध उद्योजक पुनित बालन यांनी मान्यवरांचा यथोचित सन्मान केला.

# आवश्यक कानटोचणी

केवळ आरोपांच्या आधारे एखाद्या व्यक्तीला अनेक महिने तुरुंगात ठेवले आणि शेवटी तो निर्दोष ठरला, तर त्याने तुरुंगाच्या कोठडीत घालवलेल्या दिवसांना कोणत्या शिक्षेमध्ये गणले पाहिजे, याबाबतची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. आता सुप्रीम कोर्टाने या मुद्द्यावर पुन्हा एकदा भूमिका स्पष्ट केली आहे की, दोषी ठरवण्यापूर्वी आरोपीला जास्त काळ कोठडीत ठेवणे ही शिक्षा होऊ देऊ नये.तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव आणि बीआरएस नेते के कविता यांची मुलगी कविता या मार्चपासून तुरुंगात होत्या. दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाशी संबंधित कथित भ्रष्टाचार आणि मनी लाँड्रिंगच्या प्रकरणात तिचा सहभाग असल्याचा सीबीआय आणि अंमलबजावणी संचालनालयाचा दावा आहे. तथापि, तिला जामीन मंजूर करताना, न्यायालयाने असेही म्हटले आहे की मनी लाँडरिंग कायद्यांद्वारे लादलेल्या निर्बंधांच्या तुलनेत स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार श्रेष्ठ आहे. खरे तर सर्वोच्च न्यायालयाने या विषयावर आपली भूमिका स्पष्ट करण्याची ही पहिलीच वेळ नाही. दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना जामीन मंजूर करताना, न्यायालयाने हे मान्य केले होते की, त्यांच्या खटल्यातील सुनावणीला विलंब होत आहे आणि त्यांना 'अमर्यादित काळासाठी' तुरुंगात ठेवता येणार नाही. कारण हे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. के. कविता यांना जामीन मंजूर करताना पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाने तिला जास्त काळ तुरुंगात ठेवणे आणि सुनावणीला उशीर केल्याबाबत मत व्यक्त केले आहे. एखाद्या तपास संस्थेने एखाद्या गंभीर गुन्ह्याच्या आरोपाखाली एखाद्याला अटक केली, तर प्रथम संकेत मिळतो की या यंत्रणेकडे आरोपीविरुद्ध ठोस पुरावे असतील. परंतु अशी प्रकरणे अनेकदा उघडकीस येतात, ज्यामध्ये विविध कारणांमुळे आरोपीविरुद्ध पुरावे सादर करण्याचे किंवा सुनावणीचे प्रकरण सतत पुढे ढकलले जाते आणि आरोप सिद्ध न होता तो बराच काळ तुरुंगात राहतो. काही वेळा तर पुरेशा पुराव्याअभावी सदर आरोपी निर्दोषही सुटतात. एकप्रकारे हा तपास यंत्रणांच्या कार्यशैलीवर तसेच कायदेशीर स्थितीवर प्रश्न आहे, आरोप, तपास, खटला आणि शिक्षेचे कोणते निकष आहेत, ज्याच्या अंतर्गत एखाद्याला दोषी न ठरवता अनेक महिने तुरुंगात ठेवता येते. अशा मुद्द्यांवर सीबीआय आणि ईडीसारख्या तपास यंत्रणांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याची संधी न्यायालयालाच मिळाली, तर त्याकडे कसे पाहिले जाईल? गेल्या काही वर्षांपासून अंमलबजावणी संचालनालय, प्राप्तिकर विभाग आणि केंद्रीय अन्वेषण ब्युरो भ्रष्टाचाराविरोधातील मुसक्या आवळण्याच्या नावाखाली सत्ताधारी पक्षाच्या इशाऱ्यावर काम करत असल्याचा आरोप होत आहे.या तपास यंत्रणांच्या कार्यशैलीवर न्यायालयांनीही अनेकदा प्रश्न उपस्थित केले आहेत. सुप्रीम कोर्टाने 'जामीन हा नियम आहे, तुरुंग हा अपवाद आहे' या प्रस्थापित तत्त्वाचा पुनरुच्चार केला आहे आणि हे मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याला लागू आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे हे निरीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे की, स्वातंत्र्यापासून वंचित राहणे केवळ वैध आणि वाजवी असलेल्या स्थापित कायदेशीर प्रक्रियेद्वारेच केले जाऊ शकते. २०२२ मध्येही एका खटल्यातील जामिनाच्या मुद्यावरून लोकशाहीमध्ये पोलीस राजला स्थान नाही, असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट शब्दात सुनावले होते. भारतात गुन्हा सिद्ध होण्याचा दर खूपच कमी आहे. देशातील तुरुंगात कच्च्या कैद्यांची गर्दी आहे. जवळपास दोन तृतीयांश कैदी हे कच्चे कैदी असल्याचे असल्याचे सुप्रीम कोर्टाने सांगितले. स्वातंत्र्यपूर्व काळातील कायद्यात बदल आवश्यक असून जामिनाबाबत नवीन कायद्यावर केंद्र सरकारने विचार करावा असे कोर्टाने म्हटले होते. खंडपीठाने म्हटले होते की, स्वातंत्र्य कायद्यात निहित आहे. यामध्ये स्वातंत्र्याचे संरक्षण करायला हवे. देशातील तुरुंगात कच्च्या कैद्यांची संख्या वाढत आहे. आमच्यासमोर आलेल्या आकडेवारीनुसार तुरुंगात दोन तृतीयांशाहून अधिक कच्चे कैदी आहेत. त्यातील दखलपात्र गुन्हे असलेले कैदी सोडता बहुतांशी कैद्यांना अटक करण्याचीही आवश्यकता भासत नसल्याकडे म्हटले होते. नकारात्मक अर्थाने जामीन अर्जांवर निर्णय देताना कोर्टाच्या विवेकावर परिणाम करतो. दोष सिद्ध होण्याची शक्यता अधिक असताना जामीन अर्जावर कायद्या तत्वांच्या विपरित निर्णय घ्यावा लागेल. सतत अटक केल्यानंतर त्यांची निर्दोष म्हणून सुटका करणे हा त्यांच्यावर घोर अन्याय करणारा असल्याची टिप्पणीही न्यायालयाने केली होती. तेव्हाही जामीन हा नियम असून तुरुंग अपवाद असल्याचे कोर्टाच्या अनेक निर्णयातून समोर आले आहे. संविधानातील अनुच्छेद २१ नुसार ही बाब समोर आली आहे. दोष सिद्ध होईपर्यंत संबंधिताला निर्दोष समजले जाते हे कायद्याचे तत्व लक्षात घेतले पाहिजे असे सांगताना सुप्रीम कोर्टाने तपास यंत्रणांनादेखील सुनावले होते. तात्पर्य, तपास यंत्रणांनी आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणणे गरजेचे असून राजकारण निरपेक्ष, स्वायत्त भूमिका घ्यायला हव्यात. काँग्रेस पक्षाच्या काळात या यंत्रणांचा गैरवापर केल्याचे आरोप झाले होते. सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयवर कडक शब्दांत ताशेरे ओढले होते, ही वस्तुस्थिती आहे. पण हा इतिहास झाला. तो किती काळ उगाळायचा याला मर्यादा असायला हवी. तसेच मागील सरकारांनी केले तेच आताचे सरकारही करणार असेल तर जनतेला सत्ताबदलाने साधले काय असा प्रश्न पडल्यावाचून राहणार नाही. आज ईडीसारख्या संस्थेची धाड एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्यावर पडल्यानंतर विरोधकांकडूनच नव्हे तर समाजातून उमटणाऱ्या प्रतिक्रिया ऐकल्यास आपल्या यंत्रणांची विश्वासार्हता किती पराकोटीची लयाला गेली आहे, याचा प्रत्यय येईल. तशातच सर्वोच्च न्यायालयही आता त्याबाबत काही प्रश्न उपस्थित करत असेल तर त्याबाबत गांभीर्याने विचार करावाच लागेल.

**चांद्रयान-३ ला चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरविणे हा भारतासाठी गौरवाचा क्षण होता. या ऐतिहासिक कामगिरीला नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. या दिवसाला आता राष्ट्रीय अवकाश दिवस म्हणून जाहीर करण्यात आले आहे. इस्रोने अलिकडेच सुरू केलेली गगनयान मोहीम महत्त्वकांक्षी आणि महत्त्वाची मानली जात आहे. त्याचा प्रमुख उद्देश भारतीय अंतराळवीरांना अवकाशात पाठविणे. हा कार्यक्रम भारताच्या अवकाश संशोधनातील मैलाचा दगड ठरू शकतो. यासारख्या मोहिमांच्या माध्यमातून भारत अवकाश यान आणि अन्य आवश्यक उपकरणांना स्वदेश रुपातून विकसित करण्यात सक्षम राहिल.**

# अंतराळविश्वात यशाचा कदमताल

अवकाश संशोधनातून मिळणारे ज्ञान आपल्याला पृथ्वीवर निर्माण होणाऱ्या नैसर्गिक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महत्त्वाचे ठरू शकते. हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती आणि खाद्यान्न सुरक्षा यासारख्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी अवकाश संशोधन काळाची गरज ठरत आहे.

चांद्रयान-३ ला चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरविणे हा भारतासाठी गौरवाचा क्षण होता. या यशासह भारत अवकाश संशोधन कार्यक्रमात मातब्बर देश म्हणून जगात नावारुपास आला. त्या दिवसाला आता राष्ट्रीय अवकाश दिवस म्हणून जाहीर करण्यात आले आहे. एकप्रकारे अवकाश संशोधनाने अनेक नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाचा विकास करण्याची संधी आणि सुविधा उपलब्ध करून दिली आहे. उपग्रह दळणवळण, जीपीएस, हवामानाचा अंदाज यासारख्या सुविधा अवकाश संशोधनाची देणगी आहे. अवकाश संशोधनातून मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग आपल्या पृथ्वीवर निर्माण होणाऱ्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी होऊ शकतो. अवकाश संशोधनात विविध देश सामूहिकरित्या काम करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना आणि जागतिक समस्यांवर उत्तर शेधण्यास मदत मिळते.

गेल्या काही दशकांत भारताने अवकाश संशोधन क्षेत्रात असामान्य कामगिरी केली आहे. भारताचे अवकाश संशोधन १९६२ मध्ये सुरू झाले. थोर शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या पुढाकारातून भारतीय राष्ट्रीय अवकाश संशोधन समितीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १५ ऑगस्ट १९६९ मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) ची स्थापना करण्यात आली. 'इस्रो'ने भारताच्या अवकाश संशोधन क्षेत्रात व्यापक भूमिका बजावली आहे आणि अवकाश तंत्रज्ञानाला चालना देण्याचे काम केले. १९७२ मध्ये अवकाश विभागाची स्थापना करण्यात आली आणि 'इस्रो'ला या विभागाशी जोडण्यात आले. प्रारंभीच्या काळात इस्रोने लहान उपग्रह सोडण्यात आणि रॉकेट तंत्रज्ञान विकसित करण्यावर लक्ष केंद्रीत केले. कालांतराने इस्रोच्या क्षमतेचा विकास आणि विस्तार झाला आणि कठीण मोहिमा देखील यशस्वीरित्या पार पाडल्या. चंद्राच्या पृष्ठभागावर भारताची पहिली मोहीम चांद्रयान होती. २०२३ मध्ये चांद्रयान-३ च्या माध्यमातून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा जगातील चौथा आणि चंद्राच्या दक्षिण धुव्रीय भागात उतरणारा पहिला देश ठरला.

मंगळयान मोहिम देखील भारताचे मोठे यश मानले जाते. अत्यंत कमी बजेटमध्ये मंगळ ग्रहाच्या कक्षेत प्रवेश करून भारतीय शास्त्रज्ञांनी इतिहास घडविला. इस्रोने आता सुर्याबाबत महत्त्वाची माहिती गोळा करण्याचा निर्धार केला असून यानुसार आकाशगंगेला अधिक चांगल्या रितीने समजून घेणे महत्त्वाचे राहिल. शिवाय इस्रोने भारतीय प्रादेशिक शिपिंग उपग्रह प्रणाली (आयआरएनएसएस) विकसित केली असून या माध्यमातून भारत आणि परिसरातील भागांचे अचूक नेव्हिगेशन सेवा मिळत राहते. इस्रोने अनेक प्रकारच्या उपग्रहांचे यशस्वीरित्या लॉचिंग केले आहे. यात दळणवळण उपग्रह, पृथ्वी अवलोकनउपग्रह, जलमार्ग दाखविणारे उपग्रह, प्रायोगिक उपग्रह याचा समावेश आहे. 'इस्रो'ने एकाचवेळी अनेक उपग्रह प्रक्षेपित करण्याची क्षमता



श्रीनिवास औंधकर
खगोलशास्त्र अभ्यासक

विकसित केली आहे. या कामगिरीमुळे भारताच्या केवळ प्रक्षेपण खर्चातच कपात झाली नसून भारताच्या अवकाश तंत्रज्ञानाला नवीन बुस्टही मिळाला आहे.

इस्रोने बहुतांशवेळा तंत्रज्ञान स्वदेश रुपातूनच विकसित केले आहे. त्यामुळे देशाची आत्मनिर्भरता वाढली आहे. पीएसएलव्ही रॉकेट अनेक प्रकारचे उपग्रह अवकाशात सोडण्याचे काम अतिशय चोखपणे पार पाडते. जीएसएलव्ही मार्क-३ हे उपग्रहांना अवकाशात सोडण्यासाठी सक्षम मानले जाते. क्रायोजेनिक तंत्रज्ञानात प्राविण्य मिळवत भारताने मोठे यश मिळवले आहे. क्रायोजेनिक तंत्रज्ञानात अत्यंत कमी तापमानात द्रवरुप इंधनाचा वापर केला जातो. रॉकेटच्या क्रायोजेनिक इंजिनमध्ये द्रव हायड्रोजन अणि द्रव ऑक्सिजनसारख्या अत्यंत थंड इंधनाचा वापर केला जातो. क्रायोजेनिक इंजिनच्या माध्यमातून रॉकेटला अधिक शक्ती मिळते आणि त्यामुळे तो वजनदार उपग्रहांना पृथ्वीच्या कक्षेत सहजपणे स्थापन करू शकतो. परिणामी भारताच्या अवकाश संशोधन क्षमतेत वाढ झाली आहे. आता भारत स्वदेश रुपातून वजनदार आणि एकाचवेळी अनेक उपग्रह सोडण्यास सोडण्यास सक्षम झाला आहे. स्वदेश तंत्रज्ञानाने भारताला अवकाश संशोधन कार्यात आत्मनिर्भरता आली आहे आणि शास्त्रज्ञांची प्रतिष्ठा वाढली आहे. भविष्यात इस्रो आणि अधिक उच्च प्रतीचे तंत्रज्ञान विकसित करेल आणि या आधारे भारत जगातील प्रमुख अवकाश शक्ती होईल.

इस्रोने अलिकडेच सुरू केलेली गगनयान मोहीम महत्त्वकांक्षी आणि महत्त्वाची मानली जात आहे. त्याचा प्रमुख उद्देश भारतीय अंतराळवीरांना अवकाशात पाठविणे. हा कार्यक्रम भारताच्या अवकाश संशोधनातील मैलाचा दगड ठरू शकतो. यासारख्या मोहिमांच्या माध्यमातून भारत अवकाश यान आणि अन्य आवश्यक उपकरणांना स्वदेश रुपातून विकसित करण्यात सक्षम राहिल. भारत मानवी अवकाश मोहिमा अंमलात आणू शकतो हे सांगण्याचे काम गगनयान मोहीम करेल. ही मोहिम अवकाशाचे ज्ञान आणि माहिती गोळा करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे भारताला अन्य आंतरराष्ट्रीय अवकाश संस्थांशी सहकार्य करार करण्याची संधी मिळेल. अर्थात मानवासह अवकाश मोहीम ही तंत्रज्ञानाच्या पातळीवर खूपच किचकट काम आहे. यात अनेक आव्हाने असतात. उदा. अवकाश यानाची रचना, लाइफ सपोर्ट सिस्टिम, सुरक्षा प्रणाली. ही अत्यंत महागडी मोहीम असते आणि त्यात व्यापक प्रमाणात गुंतवणूक करणे गरजेचे असते. या मोहिमेसाठी कुशल शास्त्रज्ञ, इंजिनिअर, अंतराळवीरांची गरज भासते. इस्रो ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सातत्याने काम करत आहे आणि गगनयान मोहीम ही भारतासाठी गौरवशाली ठरणार असून ती देशाला अवकाश क्षेत्रातील शक्तीशाली देशांच्या पंक्तीत नेऊन बसविणारी ठरू शकते.

गगनयान मोहिमेच्या यशानंतर इस्रोचे दुसरे ध्येय चंद्रावर मानवी मोहीम राबविण्याची आहे. ही मोहिम चंद्राबाबत आणखी माहिती जाणून घेण्यास महत्त्वाची ठरणार आहे आणि भविष्यात अन्य ग्रहांवरच्या मोहिमेसाठी एक आधार म्हणून सिद्ध होईल. त्याचवेळी इस्रो भारताचे स्वतःचे अवकाश स्थानक तयार करण्याच्या दिशेने काम करत आहे. यानुसार २०३५ पर्यंत अवकाश स्थान स्थापन होईल. या स्थानकात एकूण पाच मॉड्यूल असतील आणि पहिले मॉड्यूल २०२८ पासून सुरू होण्याची अपेक्षा आहे. या स्थानकात एकाचवेळी अनेक अंतराळीवर राहू शकतील आण विविध प्रकारचे शास्त्रीय प्रयोग करू शकतील. या स्थानकाच्या माध्यमातून भारत अवकाशात अंतराळवीरांना दीर्घकाळपर्यंत राहण्याची आणि काम करण्याची क्षमता प्राप्त करेल. याशिवाय अवकाश विज्ञान आणि तंज्ञाना क्षेत्रात भारताची स्थिती आणखी सक्षम करेल. अवकाश स्थानक विज्ञानाच्या विविध बाजूंवर सखोल अभ्यास करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून सिद्ध होईल. भविष्यात या स्थानकाचा वापर अंतराळवीरांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि चंद्र असो मंगळसारख्या मोहिमा आखण्यासाठी करता येईल.

इस्रोने भविष्यात निश्चित केलेले ध्येय हे अत्यंत महत्त्वकांक्षी आणि देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहेत. इस्रोचे यश केवळ भारताला अवकाश संशोधन क्षेत्रातच आघाडी मिळवून देणारर नाही तर त्याचबरोबर देशातील तरुणांना या क्षेत्राकडे आकर्षित करण्याबरोबरच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करियर करण्यासाठी प्रोत्साहित करेल. एकुणातच आगामी काळात भारत अवकाश संशोधन क्षेत्रात अधिक उल्लेखनीय यश मिळवेल, यात तिळमात्र शंका नाही.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग** **बुधवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२४, भाद्रपद शु.८, बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू दुर्गाष्टमी, ज्येष्ठागौरी पूजन. महर्षी दधींची जयंती नक्षत्र : ज्येष्ठा, योग : प्रीति, करण : विष्टि सूर्योदय : स.०६.०२ सूर्यास्त : सायं.०६.१८ वा. राहू काळ : दुपारी : १२:०० ते १:३०**

**दिनविशेष** *१५२२ : निसर्गवैज्ञानिक आणि प्राणीजीवनाचे अभ्यासक इटालियन शास्त्रज्ञ उलिसे आल्ड्री दांदी यांचा जन्म. *१७०० : रुल ब्रिटानिया आणि लिबर्टी यांसारख्या कविता लिहिणाऱ्या पहिल्या टॉमसन जेम्स या स्कॉटीश कवीचा जन्म. *१७२१ : फुलात बीजधारणा होण्यासाठी परागकणांची आवश्यकता असते हे सिद्ध करून त्यावरून वनस्पतींमध्येही लिंगभेद असतो, हे १६९४ मध्ये सिद्ध करणारा जर्मन वनस्पतीशास्त्रज्ञ रुडॉल्फ याकोन कॅमरेअरिस याचे निधन. *१८९३ : सर्वधर्म परिषदेत गाजलेले शिकागो येथील स्वामी विवेकानंदांचे भाषण या दिवशी झाले. *१८९५: आचार्य विनोबा भावे यांचा जन्मदिन *१९०१ : ज्येष्ठ कवी अ. रा. देशपांडे उर्फ अनिल यांचा जन्म *१९०५ : मुंबईत प्रथमच बॉम्बे इलेक्ट्रीकल सप्लाय अँड ट्रॅमवेज या कंपनीकडून वीजेचे दिवे लागते. *१९४० : लंडनवर प्रथमच दिवसा बॉम्ब हल्ले झाले. *१९४८ : पाकिस्तानचे जनक, पहिले गव्हर्नर जनरल बॅ. महम्मद अली जीना यांचे निधन.

**राशीभविष्य** * **मेष** : उसनवारी घेऊ नका. ***वृषभ** : मित्रांचा सल्ला ऐका. ***मिथुन** : चिडचिड कमी करा. ***कर्क** : आमिषांना भुलू नका. ***सिंह** : निर्णयावर ठाम रहा. ***कन्या** : प्रकृतीत फरक जाणवेल. ***तुळ** : छंदांना व्यावसायिक मार्गदर्शन द्या. ***वृश्चिक** : संततीच्या यशाने आनंदी व्हाल. ***धनु** : अध्यात्मिक उन्नतीचा काळ. ***मकर** :भविष्याची चिंता सोडा. ***कुंभ** : प्रत्यक्ष कृतीवर भर द्या ***मीन** : सामंजस्याचे कौतूक होईल.

**मेसेज आया**
आयुष्यात खूप काहीर हवं असतं,
हवं असतं ते
मिळत नाही,
हवं ते मिळालं तर ते खूप कमी
असतं,
कारण चांदण्यांनी भरूनसुध्दा..
आकाश नेहमी रिकामं असतं....




**व्यक्तीविशेष**

## आचार्य विनोबा भावे

गांधीजींचे सच्चे अनुयायी असलेले आचार्य विनोबा भावे यांचा जन्म ११ सप्टेंबर १८९५ रोजी कुलाबा जिल्ह्यातील गागोडा नावाच्या छोट्याशा गावात झाला. त्यांचे पाळण्यातील नाव विनायक. ७ जून १९१६ रोजी विनोबा गांधीजींना भेटले. या भेटीने विनोबांचे आयुष्यच बदलून गेले. स्वातंत्र चळवळीत त्यांनी १९२३ पासून भाग घेतला. तेव्हापासून त्यांना अनेकवेळा तुरूंगवास सोसावा लागला. गांधीजींच्या विविध आश्रमांची आणि सामाजिक कार्याची धुराही ते सांभाळत होते. १९४० मध्ये गांधीजींनी सुरू केलेल्या वैयक्तिक सतयाग्रही म्हणून विनोबांची निवड केली. १९४२ च्या छोडो भारत आंदोलनातही त्यांनी भाग घेतला होता. मार्च १८४८ मध्ये गांधीजींचे सर्व अनुयायांनी एकत्र येऊन सर्वोदय समाजची स्थापना केली. सर्वोदय चळवळीद्वारे त्यांनी कांचन मुक्ती आणि ऋषी खेती या दोन चळवळी केल्या १८ एप्रिल १९५१ रोजी तेलंगाणात त्यांनी सुरू केलेली भूदान चळवळ देशभरात लोकप्रिय झाली. १९५१ ते १९६४ या चौदा वर्षांच्या काळात विनोबांनी देशात पदयात्रा काढली. १९७६ मध्ये गोहत्याबंदीसाठी त्यांनी उपोषण केले. १५ नोव्हेंबर १९८२ रोजी त्यांनी प्रायोपवेशन करून देहत्याग केला.

**बोधकथा**

## एक डोळा असलेले हरीण

एकदा एका हरणाचा डोळा निकामी झाला मग त्याला आपल्या सुरक्षिततेची काळजी वाटू लागली. मग त्याला एक युक्ती सुचली. त्याने समुद्राच्या काठी चरायला सुरूवात केली. त्याला वाटले. आपल्याला धोका आहे तो जमिनीकडूनच. कारण कोणताही शिकारी समुद्रातून येणारच नाही. एक डोळा जमिनीकडे लावून आपल्याला आपल्या अन्नाची सोय करता येईल. एक शिकारी त्या हरिणाला मारण्यासाठी खूप दिवस प्रयत्न करत होता. पण त्याला काही त्याची शिकार करणे जमेना. जमिनीच्या बाजूने जेव्हा शिकार करण्याची वेळ येईल तेव्हा ते हरीण पळूणन जाई. मग त्याने एक दिवस होडी घेतली. तो समुद्रामध्ये सकाळपासून फिरत राहिला. आणि अचानक सायंकाळच्या वेळी त्या हरणावर गोळी झाडली. मरता मरता हरीण म्हणाले, अरेरे माल ज्या डोळ्यांनी दिसत नव्हते तो समुद्राकडे करून मी चरत राहिलो. पण अखेर समुद्राच्या बाजूनेच माझा घात केला. मला सगळ्यात सुरक्षित समुद्राकडील बाजू वाटत होती. काय माणे दुर्देव. **तात्पर्य: आपल्याला जिकडे सुरक्षितता वाटते तिथूनच काही वेळा धोका निर्माण होतो.**

**भूगोल**

## पृथ्वीवर जीवनसृष्टी सुरूवात डायनासोर

साधारण २४५-६५ दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीवर डायनासोर या रेप्टाईल म्हणजे सरपअणाऱ्या प्राण्यांच्या वर्गातील प्राण्यांचे पृथ्वीवर साम्राज्य होते. साधारण २३० दशलक्ष वर्षांपूर्वी ते पृथ्वीतलावर अस्तित्वात आले. हे प्राणी पृष्ठवंशीय होते आणि इतर जमिनीलगत सरपटणाऱ्या आणि अंडी घालणाऱ्या रेप्टाईल्सपेक्षा ते वेगळे होते. उभे राहण्याची क्षमता हे त्यांचे वेगळेपण होते. यामुळे त्यांना जमिनीवर उभे राहून वावरता येत होते, जे इतर सरपटणाऱ्या प्राण्यांना जमत नव्हते. त्यांच्या मांडीच्या हाडांच्या रचनेनुसार डायनासोरचे दोन गटात वर्गीकरण होते. एक म्हणजे सरड्याच्या शारिरीक रचनेप्रमाणे असलेले डायनासोर. त्यांना सौरिशियन डायनासोर म्हणतात. दुसरा गट आहे तो पक्ष्यांच्या शारिरीक रचनेप्रमाणे असलेले डायनासोर. त्यांना ऑर्निथिशियन असे संबोधले जाते. अनेक डायनासोरची रचना सस्तन प्राण्यांप्रमाणे होती. डायनासोरिया हे पृष्ठवंशीय डायनासोर पृथ्वीवर सर्वाधिक काळ म्हणजे १६५ दशलक्ष वर्षे अस्तित्वात होते. ६५ दशलक्ष वर्षापूर्वी ते नष्ट झाले.

**नवं संशोधन**

## वायुप्रदूषणाचा होतोय थेट मेंदूवर परिणाम

जगात वाढत असलेले औद्योगिकीकरण व वाहनांची प्रचंड संख्या आणि या दोहोंमधून बाहेर पडत असलेला मोठ्या प्रमाणातील धूर हा वायुप्रदूषणास हातभार लावत आहे. या धुरात असलेली विषारी केमिकल्स मानवी मेंदूसाठी घातक ठरु शकतात. नुकत्याच करण्यात आलेल्या एका संशोधनामध्ये हा दावा करण्यात आला आहे. श्वास म्हणून जी हवा आपण घेत असतो, ती आपच्या मेंदूसाठी घातक ठरु शकते. प्रसिद्ध संशोधक, आरोग्य विशेषज्ञ आणि बाल व पर्यावरण संरक्षणासाठी काम करणाऱ्या लोकांची एक समिती आहे. या समितीने हवेतील दूषित पदार्थ आणि मुलांच्या मेंदूचा विकास यावर संशोधन केले. संशोधनांती या समितीने म्हटले की, दूषित हवा, दुषित पाणी आणि काही पदार्थांमध्ये होत असलेल्या केमिकल्सच्या वापरामुळे मुलांमध्ये मेंदूविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. टीईएनडीआर (टारगेटिंग इन्वारमेंटल न्यूरो डेव्हलेपमेंटल रिस्क) या नावाने प्रसिद्ध असलेल्या या समितीने प्रामुख्याने कारखाने आणि इतर ठिकाणी वापरण्यात येत असलेल्या विषारी केमिकल्सवर ताबडतोब बंदी घालण्याची मागणी केली आहे. केमिकल्समुळे मुलांमध्ये शिकण्याची आणि विचार करण्याच्या तसेच व्यवहारसंबंधीच्या क्षमतेवर परिणाम होतो. त्यामुळे रसायनांचा वापर कमी करणे गरजेचे आहे.

**सोडवा सुडोकू** सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४३३**

| | | | |
|---|---|---|---|
| | 3 | | |
| 1 | | 2 | |
| | | 4 | |
| 4 | | | 1 |

**क्रमांक ४३२ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 1 | 3 | 2 |
| 2 | 3 | 4 | 1 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 3 | 2 | 1 | 4 |

**हास्यविनोद** बॉस त्याची नवी कोरी बीएमडब्लू गाडी पार्किंगमधून काढत होता, तेवढ्यात त्याचा ज्युनियर तेथे टपकला आणि म्हणाला, वा,बॉस! काय मस्त गाडी आहे! बॉस म्हणाला तू कठोर मेहनत घेतलीस, कामे वेळेच्या वेळी पार पाडलीस, सुट्टीच्या दिवशीही कामावर आलास, कमीत कमी रजा घेतल्याय तर पुढच्या वर्षी मी यापेक्षा मस्त गाडी घेऊ शकेन!

**महिलायन**

## बनवा 'मसाला गार्डन'

स्वयंपाक करताना कोरडा, वाटलेला किंवा खड्या मसाल्याचा उपयोग अधिक प्रमाणात केला जातो. अशा वेळी आपण हे मसाल्याचे पदार्थ घरीच उगवले तर प्रत्येकवेळी आपल्याला हे ताजे मसाले 'किचन गार्डन'च्या रूपात सहज उपलब्ध होतील. या ताज्या मसाल्यांच्या स्वाद आणि सुगंधामुळे पदार्थही अधिक स्वादिष्ट बनतील. घरच्या घरी आपण कुंड्यांमध्य हे 'मसाला गार्डन' तयार करू शकतो. गच्चीवर, बाल्कनीत किवा अंगण असल्यास तेथे असे कुठेही असे गार्डन बनवू शकतो. जुने माठ, लाकडाचे खोके, कुंड्या इत्यादींचा या लागवडीसाठी वापर करू शकतो. कमी खर्चात सुंदर सुगंध देणारे उपयुक्त असे गार्डन तयार करता येते. ओव्याचे झाड कुंडीमध्ये सहजपणे लावता येवू शकते. तिखट स्वादाचा ओवा गॅसेस, बद्धकोष्ठता यांपासून सहज सुटका करतो. तसेच पदार्थांचा स्वादही वाढवतो. ओव्याची पाने बारीक कापून बेसनाच्या भज्यांमध्ये टाकली किंवा कढी, डाळ, चटणी इत्यादीमध्ये वापरली असता त्याचा स्वाद खूप चांगला बनतो. ही पाने धुवून चावून खाल्ल्यास माऊथफ्रेशनर म्हणून वापरता येतात. पुरी, अरबी बटाटे या भाज्यांमध्ये ओव्याचा वापर करता येऊ शकतो. अशा प्रकारे कोथिंबीरही आपण कुंडीत उगवू शकतो. सुकलेले आख्खे धने हाताने रगडून बारीक करावेत आणि तयार केलेल्या कुंडीत टाकावे. आठ-दहा दिवसांत त्याची पाने येवू लागतात. आपल्या सुविधेनुसार खालून पाने तोडत रहावी. कोथिंबीरीचा उपयोग सर्वच प्रकारच्या स्वयंपाकात होत असतो.

आलेदेखील आपण कुंडीमध्ये उगवू शकतो. आल्याला डोळा असतो. तो भाग कापून कुंडीत मातीमध्ये खोलवर खोवावा. शक्यतो कुंडी पसरट असावी. काही दिवसांनंतर त्याची पाने बाहेर येतात. चहा, सूप, चूस यामध्ये दोन-तीन पान धुवून कापून टाकल्यास सुगंध आणि स्वाद दोन्हीही येतो. आल्याची गाठी मातीत आतल्या आतच पसरु लागतात. त्या बाहेर काढून धुवून उपयोगात आणता येतात. या गाठी सुकवून सुंठ पावडरही बनवता येऊ शकते. अशाच प्रकारे आपण हळदही लावू शकतो. ही दोन्ही झाडे औषधी देखील आहेत. **(पूर्वार्ध)**

**घरगुती औषध**

## कचोरा


यालाच संस्कृतमध्ये शठी असे म्हणतात. शठी म्हणजे कचोरा. ज्वरावर तापावर मोठे औषध आहे. कोणताही ताप आला असता हे देतात. १० ग्रॅम कचोरा ठेचून त्यात अर्धा लिटर पाणी घालून अष्टमांश काढा करावा, तो साऱ्या दिवसांत संपवावा. अजीर्णापासून आलेला ताप कमी होतो. कचोरा भूक वाढवितो. भूक लागत नसल्यास कचोऱ्याचे वस्त्रगाळ चूर्ण दोन चिमट्या भिजेल एवढा मध घालून घ्यावे, भूक लागू लागते. कचोऱ्याने उलटी ओकारी थांबते. पित्त झाले असेल तरीही असेच करावे. पित्त बसते. लहान मुलांचे जंतासाठीसुध्दा याचा उपयोग करतात. याचे अर्धा ग्रॅम चूर्ण मधाबरोबर दिले तर मुलांचे जंत कमी होतात व त्यास भूक लागू लागते. कचोरा वाटून केसास लावल्यास केस भराभर वाढतात

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# प्राण्यांच्या दुधाविषयी...



हत्तिणीचे दूध पिणे माणसासाठी हानिकारक ठरू शकते. या दुधामध्ये असे अनेक घटक असतात जे मानवी शरीरासाठी योग्य ठरत नाहीत. विशेषतः हत्तिणीच्या दुधात कार्बोहायड्रेटचे प्रमाण अत्याधिक असते. त्यामुळे असे दूध पिले, तर माणसाला पोटफुगी, गॅस व डायरिया होऊ शकतो. या दुधाच्या सेवनाने माणूस बेशुद्धही पडू शकतो!

- हिप्पोपोटॅमस म्हणजेच पाणघोड्याचे दूध हे पांढरे नव्हे, तर गुलाबी रंगाचे असते. दोन विशिष्ट अशा आम्लांमुळे या दुधाला असा गुलाबी रंग मिळतो.
- गायीचे दूध मानवी शरीराला अत्यंत पोषक ठरते. शरीर बळकट होण्याबरोबरच मेंदू तीक्ष्ण होण्यासाठीही गायीच्या दुधाचे सेवन लाभदायक ठरते.
- साहिवाल गाय ही गुरांची एक अशी प्रजाती आहे, जी भारतातील सर्वोत्कृष्ट दुभत्या जनावरांपैकी एक आहे. ही गाय पंजाब, हरियाणा, दिल्ली, बिहार आणि मध्य प्रदेशात आढळून येते. या प्रजातीच्या गायीचे दूध सर्वात गोड असल्याचे मानले जाते.
- भारतात गाढवीणीच्या दुधाची सर्वात महाग विक्री होते. या दुधाला मागणीही मोठी आहे. औषध म्हणून या दुधाचे सेवन केले जाते.
- उंटीणीच्या दुधात अनेक जीवनसत्वे आणि खनिजे असतात. त्यामध्ये अँटिबॉडीजही मोठ्या प्रमाणात असतात. या दुधाच्या नियमित सेवनाने मधुमेह, हृदयविकार यांसारखे अनेक आजार दूर ठेवण्यास मदत होऊ शकते.

# डायनासोरही रांगायचे?



बालवयात सगळेच रांगत असतात. रांगणाऱ्या बाळकृष्णाच्या मोहक रूपाचे वर्णन अनेक संतकवींनी केलेले आहे. अशी रांगणारी मुलं अतिशय गोड दिसतात. केवळ माणसाचेच अपत्य रांगते असे नाही. लहान मुले जशी रांगतात तसेच डायनासोरही प्रौढावस्थेत दोन पायांवर चालण्यापूर्वी बालवयात चार हात-पायांवर रांगत होते, असे एका संशोधनात स्पष्ट झाले आहे.

या संशोधनानुसार सिटाकोसॉरस म्हणजे पॅरट डायनासोर हे चार पायांवर अडखळत चालत होते व नंतर ते दोन पायांवर चालू लागले. दहा कोटी वर्षांपूर्वी सध्याच्या चीनमध्ये ते अस्तित्वात होते. डायनासोरची वाढ ही माणसांप्रमाणेच झाली, त्यांनी सुरुवातीला चार पायांवर अडखळत रांगल्यासारखे चालण्यास सुरुवात केली व नंतर ते सरळ उभे राहून चालू लागले. बीजिंग, ब्रिस्टॉल व बॉन येथील जीवाश्म वैज्ञानिकांनी जैवयांत्रिक विश्लेषण व हाडांच्या तपासणीवरून हे डायनासोर चार पायांवरून दोन पायांवर कसे चालू लागले याचे स्पष्टीकरण केले आहे. चीन व पूर्व आशियातील काही भागात क्रॅटॅशियस काळात ज्या एक हजार प्रजाती अस्तित्वात होत्या, त्यात सिटाकोसॉरस म्हणजे पॅरट डायनासोरचा समावेश होता. ब्रिस्टॉल विद्यापीठातील क्रि झाओ यांनी या जीवाश्मातील लहान पिले, बालावस्था व प्रौढावस्था यांचा अभ्यास केला आहे. त्यांनी सांगितले की, सिटाकोसॉरसची काही हाडे केवळ काही मिलिमीटर व्यासाची होती त्यामुळे ती हाताळणे फार नाजूक काम होते. दोन हात व दोन पाय अशी १६ डायनॉसॉरमधील हाडे वर्षभरात गोळा करण्यात आली, त्यातील काही डायनासोर हे एक वर्ष वयापासून ते दहा वर्षे वयापर्यंतचे होते.

यातील एक वर्ष वयाचे डायनासोर आखूड पायाचे व लांब बाहूचे होते, त्यांच्या बाहूंच्या हाडांची वाढ ही एक ते तीन वर्षे वयात जास्त होती. चार ते सहा वयोगटांत ती कमी होती व नंतरच्या काळात पायांच्या हाडांची वाढ वेगात होते. 'नेचर कम्युनिकेशन' या नियतकालिकात हा शोधनिबंध प्रसिद्ध करण्यात आला आहे. या संशोधनातून डायनासोरची उत्क्रांती कशी होत गेली यावर नवीन प्रकाश पडणार आहे, असे ब्रिस्टल विद्यापीठातील प्रा. माईक बेंटन यांनी सांगितले.

# माणसाला येईल चोच....



माकडापासून उत्क्रांती होत आजचा आधुनिक माणूस विकसित झाला, असे डार्विनचा सिद्धांत सांगतो. अर्थात ही उत्क्रांतीची प्रक्रिया अद्याप सुरूच असल्याचेही काही संशोधकांचे म्हणणे असते. याच प्रक्रियेत भविष्यकाळात माणसाला चोचही येऊ शकते, असा दावा एका वैज्ञानिकाने केलेला आहे! आधुनिक आहारशैली, मानवी दातांची सध्याची रचना व वयस्कर लोकांची वाढती संख्या यामुळे आगामी काळातील उत्क्रांती प्रक्रियेत माणसाला चोच असण्याची शक्यता आहे असा हा दावा आहे. हा दावा तसा नवा वाटत असला, तरी 'मोठी चोच सिद्धांत' पूर्वीपासून प्रचलित आहे.

शेफील्ड विद्यापीठातील संशोधकांनी आताच्या समस्यांवर आधारित असलेला उत्क्रांती सिद्धांत मांडलेला असून, त्यांच्या मते या समस्यांवर मात करण्याच्या हेतूने आपोआप काही बदल माणसात घडून येतील. मानवात त्याच्या जीवनकालात त्याला दातांचे दोनच संच उपलब्ध होतात व आता तर आयुष्यमान वाढत चालले आहे त्यामुळे वृद्धांना सध्याचे दात व त्यांची उपलब्धता पुरेशी नाही, आहारातही बदल होत आहेत त्यामुळे दातांऐवजी चोच किंवा इतर काही प्राण्यांप्रमाणे दातांचे दोन पेक्षा जास्त संच हे बदल घडून येण्याची शक्यता आहे. माणसांना दंतरोग तज्ज्ञांना टाळायचे असेल, तर त्यांना चोच सोयीस्कर असेल! पफरफिशमध्ये गेली लाखो वर्षे उत्क्रांती होऊन शेवटी चोच निर्माण झाली. पफरफिश या चोचीचा उपयोग गोगलगायींचे शंख, खेकड्यांना फोडण्यासाठी करू लागले. चोची या अतिशय दणकट व अनुकूल असतात, असा दावा प्रमुख संशोधक गॅरेथ फ्रेझर यांनी केलेला आहे.

आणखी एका सिद्धांतानुसार आगामी काळात मनुष्यात आपले दात सतत बदलत राहण्याची एक अंगभूत क्षमता निर्माण होईल. शार्क माशाचे दात त्याच्या आयुष्यकाळात सतत पडतात व पुन्हा येतात तसे घडून येईल. या शार्क माशाचे दात हिरड्यात बसवलेले असतात; पण जबडड्याच्या हाडात पक्के केलेले नसतात, ते कन्व्हेयर बेल्टसारख्या पद्धतीने चालतात ते मागच्या बाजूला परिपक्व होऊन हळूहळू पुढे येतात व बाकीचे दात पडतात. ज्या पेशींमुळे नवीन दात विकसित होतात व वाढतात त्याला प्युटेटिव्ह स्टेम सेल (मूलपेशी) म्हणतात त्यांना टूथ फेअरी सेल्स असेही वैज्ञानिक गंमतीने म्हणतात. आगामी पिढ्यांमध्ये या टूथ फेअरी सेल्स नेहमी दात तयार करीत राहतील. शार्क माशांमध्ये सतत दात पुन्हा पुन्हा येत राहतात ती क्षमता माणसात येऊ शकते, असे फ्रेझर यांचे मत आहे. हे सगळे बदल अगदी लगेच घडून येणार नाहीत, वैज्ञानिक सध्या टूथ फेअरी सेल्स व चोचीची उत्क्रांती या दोन्ही विषयांवर संशोधन करीत आहेत.

# आवाज ऐकवून लाखोंची कमाई

आवाजाची जादू ही एक अशी कला आहे, जी लोकांना मंत्रमुग्ध करते. गायकांचा आवाजच लोकांना त्यांचा चाहता बनवतो. आयुष्मान खुरानाच्या ड्रीम गर्ल या चित्रपटाबद्दल तुम्हाला माहिती असेलच. संपूर्ण चित्रपटाची कथा आवाजावर आधारित आहे. आज आपण ज्या व्यक्तीबद्दल बोलणार आहोत ती आजकाल अशाच एका कारणामुळे चर्चेत आली होती. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की ही व्यक्ती मुलींना त्याचा आवाज ऐकवून लाखो रुपये कमावतोय. वास्तविक, लंडनचा रहिवासी असलेला ३८ वर्षीय ॲलेक्स डग्लस आपल्या फावल्या वेळात व्हॉट्सॲपवर मुलींना आकर्षक मेसेज पाठवतो. ॲलेक्स हा व्यवसायाने पर्सनल ट्रेनर आहे. दररोज तो त्याचा आवाज रेकॉर्ड करून मुलींना पाठवतो. अनेकवेळा अशा मागण्या केल्या जातात, ज्या पूर्ण करणे त्याच्यासाठी खूप कठीण होते. ॲलेक्सच्या मनात हा विचार आला जेव्हा तो २०२२ मध्ये




डेटिंग ॲप्स शोधत होता. त्याचा आवाज खूप चांगला आणि आकर्षक असल्याचे अनेक महिलांनी त्याला सांगितले. यानंतर जेव्हा डेटिंग ॲप हिंजने व्हॉइस नोट फीचर आणले तेव्हा त्याने महिलांना व्हॉइस मेसेज पाठवण्यास सुरुवात केली. यानंतर त्याच्या आवाजाची मागणी वाढू लागली. ॲलेक्सला व्हॉट्सॲपवर मेसेज येऊ लागले. त्यानंतर ॲलेक्सने याचा व्यवसाय म्हणून स्वीकारण्याचा विचार केला. तो म्हणाला की मी व्हॉइस नोटच्या प्रत्येक मिनिटासाठी १० पौंड म्हणजेच अंदाजे १ हजार रुपये आकारण्यास सुरुवात केली. लवकरच आवाजाची मागणी आणखी वाढली. ॲलेक्सचे म्हणणे आहे की, मला वाटते की तुमच्या आवाजासाठी कोणी पैसे देत असेल,

# ध्रुव ताऱ्याची छायाचित्रे

संपूर्ण उत्तर गोलार्धातून उत्तर दिशेला दिसणारा अढळ किंवा स्थान न बदलणारा तारा म्हणजे ध्रुव तारा. त्याला इंग्रजीत पोल स्टार किंवा नॉर्थ स्टार असे म्हटले जाते. भूतकाळात दिशा दर्शवण्यासाठी या ताऱ्याने खलाशांपासून ते वाटसरूंपर्यंत अनेकांना मदत केलेली आहे. खगोलशास्त्रज्ञांनाही जुन्या काळापासूनच या ताऱ्याचे कुतूहल वाटत आले आहे. आपल्याकडे तर या ताऱ्याशी संबंधित ध्रुव बाळाची एक पौराणिक कथाही आहे. आता या ताऱ्याचे कॅलिफोर्नियातील माऊंट विल्सनवर असलेल्या चारा अरे नावाच्या दुर्बिणीने छायाचित्रे टिपली आहेत. या ताऱ्याच्या पृष्ठभागाची हाय-रिझोल्युशन प्रतिमा टिपण्याची ही पहिलीच वेळ आहे. जुन्या काळापासूनच हा तारा कवी, चित्रकारांसाठीही आकर्षणाचा विषय राहिलेला आहे. अनेक चित्रकारांनी या ताऱ्याला आपल्या चित्रांमध्ये दर्शवले आहे.

मात्र, वास्तवात हा तारा आहे तरी कसा हे अद्यापही समजलेले



नव्हते, हे विशेष! अर्थात त्याची यापूर्वीही अनेक छायाचित्रे टिपण्यात आली होती; पण ती हाय-रिझोल्युशनची नव्हती. या दुर्बिणीमध्ये काही अशी वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे अंतराळातील एखाद्या प्रकाशाच्या स्रोताची सुस्पष्ट छायाचित्रे टिपता येऊ शकतात. येथील दुर्बिणीचा व्यास ३३० मीटरचा आहे. त्यामुळे तिचे इमेज रिझोल्युशन, विशेषतः अँग्युलर रिझोल्युशन उत्कृष्ट आहे. या दुर्बिणीने २०१६ ते २०२१ या काळात टिपलेली अशी हाय रिझोल्युशन छायाचित्रे तपासून एकत्र करण्यात आली. त्यामधून या ताऱ्याची यापूर्वी अज्ञात असलेली अनेक वैशिष्ट्ये समोर आली. विशेष म्हणजे या ताऱ्याच्या पृष्ठभागावर अनोखे ठिपके दिसून आले. ज्याप्रमाणे सूर्यावर नेहमी वेगवेगळे डाग किंवा सनस्पॉट्स् दिसून येतात तसेच या ताऱ्यावरही दिसले. चारा अरेचे संचालक गेल शेफर यांनी सांगितले की, या ताऱ्यावर चमकदार आणि गडद रंगाचे ठिपके आढळले. हा तारा तुलनेने फार प्राचीन नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तो सेफीड ताऱ्यांच्या प्रकारातील आहे. अशा ताऱ्यांची चमक ठरावीक कालमर्यादेत कमी-जास्त होत असते. ध्रुव ताऱ्याची चमक चार दिवसांच्या चक्रामध्ये कमी-जास्त होते.

# परतला देवमाशाच्या पोटातून

जगातील सर्वात मोठ्या आकाराचा प्राणी म्हणजे ब्ल्यू व्हेल किंवा निळा देवमासा. व्हेल मासे हे अतिशय मोठ्या आकाराचे असतात. अमेरिकेतील एक स्कूबा डायव्हिंग असलेला तरुण अशा व्हेल माशाच्या पोटात फिरून जिवंत बाहेर आला आहे! या तरुणाने मृत्यूला चकवा दिला. व्हेल माशाच्या पोटात काय काय दिसलं याचा थरारक अनुभवदेखील या तरुणाने सांगितला आहे.


मायकेल पॅकार्ड असे या तरुणाचे नाव आहे. मायकेल पॅकार्ड हा अमेरिकेतील रहिवाशी असून, तो एक स्कूबा डायव्हिंग आहे. संयम आणि मन शांत ठेवले, तर मोठ्या संकटातून आपण सुखरूप बाहेर पडू शकतो, हे मायकेल पॅकार्ड याने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. समुद्रात स्कूबा डायव्हिंग करीत असताना मायकेल पॅकार्ड याला एका अवाढव्य व्हेल माशाने गिळले. त्याचा मृत्यू जवळपास अटळ होता. मात्र, तरीहीदेखील त्रस्त न होता डोक शांत ठेवून तो मृत्यूच्या दाढेतून बाहरे आला. मायकेलला व्हेल माशाने गिळले तेव्हा माशाच्या पोटात काय काय दिसले याचा अनुभवदेखील त्याने सांगितले आहे. तो म्हणाला, 'स्कूबा डायव्हिंग करत असताना अचानक एका भुयारात गेल्यासारखे वाटले. काही क्षणातच माझ्या लक्षात आले की, मी व्हेल माशाच्या जबड्यात अडकलो आहे. व्हेल माशाने गिळल्यानंतर मी त्याच्या पोटात गेलो. व्हेल माशाच्या पोटात सगळीकडे मला काळाकुट्ट अंधारच दिसत होता. आतमध्ये प्रचंड वेगाने हालचाली जाणवत होत्या. माझ्यावर पूर्णपणे दबाव आल्यासारखे वाटत होते.' मृत्यूच्या दाढेत अडकलेला मायकेल पॅकार्ड यातून सुखरूप पडला. व्हेलने गिळल्यानंतर भयभीत न होता अगदी धीराने आणि शांत डोक्याने त्याने यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधला. मी व्हेल माशाच्या जबड्याच्या बाजूला जोरात लाथा मारल्या. यामुळे व्हेलने तोंड उघडले. त्या क्षणीच मी व्हेल माशाच्या जबड्यातून बाहेर आलो, असे मायकेलने सांगितले.



# तेरा महिन्यांचे वर्ष

**पृथ्वीवर एक असा देश आहे, जिथे वर्षात १२ नाही तर एकूण १३ महिने असतात. या १३ महिन्यांमुळे हा देश संपूर्ण जगाच्या तुलनेत सात वर्षांनी मागे पडला आहे. इथिओपिया हा तो देश आहे.**

जगात अशा अनेक संस्कृती आहेत, ज्या कालगणनेसाठी वेगवेगळ्या प्रकारचं कॅलेंडर वापरतात. ही सर्व कॅलेंडर्स पाश्चात्य ग्रेगॉरियन कॅलेंडरप्रमाणे नसली, तरी त्यातसुद्धा एका वर्षात १२ महिने असतात.



पण आफ्रिका खंडातल्या इथिओपिया देशामध्ये एका वर्षात एकूण १३ महिने असतात. १३व्या महिन्यात पाच दिवस असतात. एका आठवड्यातदेखील पाच दिवस असतात. ज्या वर्षी लीप वर्ष असतं, त्या वर्षी इथियोपियाच्या कॅलेंडरमधल्या १३व्या महिन्यात सहा दिवस असतात. संपूर्ण जगाने आठ महिन्यांपूर्वीच २०२४ या वर्षाचे स्वागत केले आहे. इथियोपियामध्ये ११ सप्टेंबर रोजी २०२४ या नवीन वर्षाची सुरुवात होणार आहे.

जगातल्या बहुतांश देशांमध्ये पाश्चात्य ग्रेगॉरियन कॅलेंडरला मान्यता आहे. काही देश त्यांच्या प्राचीन कॅलेंडरचे पालन करतात. इथिओपियामध्ये आजही रोमन चर्चने सुधारित केलेलं कॅलेंडर पाळलं जातं. या कारणास्तव इथिओपियामध्ये ११ सप्टेंबर २००७ रोजी नवीन शतकाची सुरुवात झाली आहे. इथिओपिया हा एकमेव आफ्रिकन देश आहे, जो कधीही ब्रिटनचा गुलाम बनला नाही. एके काळी हा देश इटलीच्या ताब्यात होता. सहा वर्षांनी इटलीने हा देश मुक्त केला. ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च अशी महिन्यांची नावं आहेत. इथिओपियन म्हणजेच गीझ कॅलेंडरमधल्या महिन्यांची नावं वेगळी आहेत. पहिल्या महिन्याचं नाव मेस्केरेम आहे. हा महिना ११ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे.

# सायकल चालवल्याचे फायदे...



नेदरलँडस्सारख्या अनेक देशांमध्ये सध्या सायकल चालवणाऱ्या लोकांची संख्या वाढलेली आहे. सायकल चालविण्याचे वा चालण्याच्या पायपिटासनाचे फायदे सर्वज्ञात आहेतच, आता त्या फायद्यांना सूक्ष्म संशोधनाचाही दुजोरा मिळाला आहे. जे भारतीय लोक कामाच्या ठिकाणी चालत किंवा सायकलवर जातात त्यांना हृदयविकाराचा धोका कमी असतो, त्यांच्यामध्ये लठ्ठपणा किंवा वजन वाढण्याची शक्यताही दुरावते. एवढेच नव्हे, तर मधुमेह व उच्च रक्तदाबापासूनही त्यांचा बचाव होतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे.

लोकांनी शारीरिक हालचाली जास्तीत जास्त होतील, अशा प्रकाराची वाहतुकीची साधने वापरली, जोखमीच्या बाबी कमी होऊ शकतात. विशेष म्हणजे येत्या दोन दशकांत भारतातील कमी व मध्यम उत्पन्न गटातील लोकांमध्ये मधुमेह व हृदयविकाराची शक्यता वाढणार आहे



व त्याचा फार मोठा परिणाम लोकांच्या आरोग्यावर होणार आहे, असे इंपिरियल कॉलेज लंडन व पब्लिक हेल्थ फाऊंडेशन या दोन संस्थांच्या संशोधकांनी म्हटले आहे. पीएलओएस मेडिसिन या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या या संशोधनात भारतातील ४००० लोकांच्या आरोग्याची व शारीरिक हालचालींची माहिती घेण्यात आली होती. संशोधकांना मिळालेल्या माहितीनुसार ग्रामीण भागात ६८.३ टक्के लोक सायकल चालवत, तर ११.९ टक्के लोक चालत कामावर जातात. निम्मे लोक खासगी वाहनांनी कामाच्या ठिकाणी जातात. ३८ टक्के लोक सार्वजनिक वाहनांनी कामावर जातात त्यांचे वजन जास्त दिसून आले. सायकलवरून तर कामावर जाणारे किंवा चालत जाणारे कर्मचारी यांचे वजन कमी असल्याचे दिसून आले. सायकलचा वापर करणारे किंवा चालत जाणारे यांच्यात मधुमेह व उच्च रक्तदाबाचे प्रमाण एकदम कमी होते.

## ई- वाहन योजनेस रिक्षाचालकांकडून अल्प प्रतिसाद

# पालिकेच्या इलेक्ट्रिक वाहन धोरणाला खो



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** शहरातील वायू आणि ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक रिक्षांना पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून ३० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र, वारंवार आवाहन करूनही रिक्षाचालक अनुदान घेण्यासाठी पुढे येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महापालिकेचे इलेक्ट्रिक वाहन धोरण खो बसल्याचे दिसून येत आहे. शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा अंगीकार करून इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) धोरणाची अंमलबजावणी महापालिका करीत आहे. शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमध्ये हवेचा दर्जा चांगला राखणे, ध्वनिप्रदूषण नियंत्रण, हरितगृह वायू उत्सर्जनामध्ये घट व ऊर्जा सुरक्षेचा समावेश आहे. देशातील १३१ शहरात वाहनांमुळे सर्वाधिक प्रमाणात वायुप्रदूषण होते. त्यात पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांचाही समावेश आहे. वायुप्रदूषण रोखण्यासाठी शून्य प्रदूषण करणाऱ्या वाहनांचा वापर वाढवण्यासाठी महापालिका प्रयत्न करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून महापालिकेने इलेक्ट्रिक वाहनांसाठी (ईव्ही) धोरण तयार केले आहे.

या धोरणानुसार महापालिका शहरातील तीन चाकी इलेक्ट्रिक रिक्षांना प्रत्येकी ३० हजार रुपयांचे अनुदान देत आहे. पहिल्या १ हजार ५०० रिक्षाचालकांना या अनुदानाचे वितरण केले जाणार आहे. शहरातील २३ जुलै २०२१ नंतरच्या एल फाईव्ह एम या क्षेणीतील प्रवासी इलेक्ट्रिक रिक्षांना हे अनुदान मिळणार आहे. त्यासाठी जुलै २०२३ पासून ऑनलाईन अर्ज भरून घेण्यास सुरुवात केली आहे. एक वर्ष झाले तरी, अद्याप रिक्षाचालक या योजनेकडे पाठ फिरवत आहेत. प्रथम येईल त्याला प्राधान्य या तत्त्वानुसार शहरातील पहिल्या दीड हजार रिक्षाचालकांना प्रत्येकी ३० हजार रुपये अनुदान महापालिका देणार आहे. रिक्षा इलेक्ट्रिक वाहनात रूपांतरित केल्यावरही अनुदान मिळणार आहे. परंतु, त्यालाही रिक्षाचालकांकडून प्रतिसाद मिळत नाही, असे महापालिकेच्या विद्युत विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

> पीपीपी तत्त्वावरील या स्टेशनला ठेकेदाराचा प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. तब्बल तीन वेळा निविदा प्रसिद्ध करूनही ठेकेदार मिळाले नाहीत. त्यामुळे ही योजना अद्याप हवेतच आहे.



### काय आहेत समस्या?

इलेक्ट्रिक रिक्षाची किंमत साधारण २ लाख २० हजार ते ३ लाख ५० हजार इतकी आहे. इतर रिक्षांच्या तुलनेत ही किंमत जास्त आहे. राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात रिक्षा परमिटचे वितरण केले आहे. पेट्रोलवरील रिक्षा अनेकांनी सीएनजीमध्ये रूपांतरित करून घेतल्या आहेत. सीएनजी परवडत असल्याने अनेकांनी रिक्षा मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या आहेत. त्याला महापालिकेनेही अनुदान दिले होते. मात्र, शहरात इलेक्ट्रिक रिक्षांचे चार्जिंग करण्यासाठी महापालिकेचे चार्जिंग स्टेशन नाहीत. शहरात या चार्जिंग स्टेशनची संख्या मर्यादित आहे. इंधन संपल्याने चार्जिंगची शहरात पुरेशी व्यवस्था नाही. रिक्षाचालकांना बँक कर्ज देत नाहीत. तसेच, इलेक्ट्रिक वाहनांना अचानक आग लागून जळण्याच्या घटना घडत आहेत. परिणामी, इलेक्ट्रिक रिक्षा घेण्यास पसंती दिली जात नसल्याचे चित्र आहे.

### २२ चार्जिंग स्टेशन कधी?

- महापालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांत इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग उभारण्यात येणार होते. त्यासाठी २२ ठिकाणे निवडण्यात आली. या चार्जिंग स्टेशनसाठी पालिका मुख्य प्रशासकीय इमारतीचे प्रांगण, पिंपरीतील सिट्रस हॉटेलजवळ, दुर्गादेवी टेकडी, वाहतूकनगरी (निगडी), मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडिअम नेहरुनगर, कोकणे चौक पिंपळे सौदागर, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, चिखली, बर्ड व्हॅली संभाजीनगर, कुस्ती संकुल भोसरी, मलनि:सारण केंद्र चिखली, लांडेवाडी भोसरी, भक्ती-शक्ती निगडी, बजाज ऑटोजवळ, संत तुकारामनगर मेट्रो स्थानक, पी. के. चौक, योगा पार्क- पिंपळे सौदागर, राजमाता जिजामाता उद्यान- पिंपळे गुरव, संतनगर उद्यान कासारवाडी, बी. डी. किल्लेदार उद्यान, वल्लभनगर, ऑटो क्लस्टर आणि राजर्षी शाहू उद्यान अशा २२ ठिकाणच्या जागा निश्चित करण्यात आल्या होत्या.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## गणेशोत्सवात विविध कार्यक्रमांची रेलचेल

**जुनी सांगवी :** जुनी सांगवी, दापोडी परिसरातील बहुतांश मंडळांचे महोत्सवी वर्ष असल्याने सुंदर सजावटीसह विविध सामाजिक उपक्रम, मनोरंजनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहावयास मिळत आहे. संगीतमय पाण्याचे कारंजे, पौराणिक, जिवंत देखाव्यांबरोबरच महिला अत्याचार विषयक प्रबोधनात्मक देखावेही मंडळांनी सादर केले आहेत.

महिला अत्याचारांच्या घटनांना आळा घालावा यासाठी काही मंडळांनी सामाजिक संदेश देत मुलगी वाचवा असे प्रबोधनात्मक देखावे साकारले आहेत. फुगेवाडी येथील महाराणा प्रताप मित्र मंडळाने मुलींची सुरक्षा यावर सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारा देखावा साकारला आहे. मंडळाचे यंदाचे ५० वे वर्ष आहे. अध्यक्ष माऊली फुगे, कार्याध्यक्ष प्रथमेश फुगे, दर्शन फंड हे आहेत.

### बालाजी प्रतिष्ठानची लक्षवेधी आरास

- जुनी सांगवी येथील बालाजी प्रतिष्ठानच्या गणपती मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना केलेली आकर्षक मूर्ती व मंदिराला केलेली आरास लक्षवेधी ठरत आहे. मंडळाची स्थापना १९६९ मध्ये करण्यात आली आहे. मंडळाचे आधारस्तंभ मच्छिंद्र ढोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष हर्षल ढोरे, सुनील हातोडे, आशिष ढोरे, ओम ढोरे हे पदाधिकारी काम करत आहेत. बालाजी प्रतिष्ठान व भव्य मिरवणूक असे समीकरण आहे. पंचक्रोशीतून मिरवणूक पाहण्यासाठी नागरिक सांगवीत येत असतात.

### विद्युत रोषणाईचे संगीत कारंजे

- मधुबन मित्र मंडळ ट्रस्ट संचलित मधुबन सोसायटी मंडळाने यावर्षी विद्युत रोषणाईतील संगीत कारंजे हा देखावा साकारला आहे. बाळगोपाळांसह नागरिक सहकुटुंब तो पाहण्यासाठी गर्दी करत आहेत. मंडळाने यावर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा चित्रकला, खेळ व सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.



## वृक्षारोपण...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** तळेगाव शहरातील उद्योजक बी एम के उद्योग समूहाचे सर्वेसर्वा रो. विक्रम काकडे यांच्या सहकार्याने महर्षी कर्वे विद्यालय, कामशेत या ठिकाणी फळझाडांचे वृक्षारोपण करुन ट्रि गार्ड दिले.

## तळेगांव दाभाडेत रोटरी क्लबकडून वृक्षारोपण

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**तळेगाव दाभाडे :** रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडे सिटी व बी एम के उद्योग समूह यांच्या वतीने महर्षी कर्वे शिक्षण संस्था कामशेत येथे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण जपणे व पर्यावरणाची हानी होऊ न देण्यासाठी कार्य करणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे असे प्रतिपादन रोटरी सिटीचे अध्यक्ष रो किरण ओसवाल यांनी केले.



तळेगाव शहरातील उद्योजक बी एम के उद्योग समूहाचे सर्वेसर्वा रो. विक्रम काकडे यांच्या सहकार्याने महर्षी कर्वे विद्यालय, कामशेत या ठिकाणी फळझाडांचे वृक्षारोपण करुन ट्रि गार्ड दिले. याप्रसंगी रोटरी सिटीचे अध्यक्ष किरण ओसवाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच ६०० विद्यार्थ्यांसाठी सुग्रास भोजनाची व्यवस्था केली. "माझे झाड ! माझी जबाबदारी" या ब्रीद वाक्य नुसार प्रत्येक वर्गाला पाच झाडांची जबाबदारी दिली व रोटरी सिटी करत असलेल्या कार्याची माहिती अध्यक्ष रो. किरण ओसवाल यांनी दिली.

रो. तानाजी मराठे व रो. संतोष लोणकर याप्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मयुर भेगडे सूत्रसंचालन रो. प्रदिप टेकवडे यांनी केले. प्रास्ताविक गोरख काकडे यांनी केले तर आभार धनंजय वाडेकर यांनी मानले.

## शहरात सीएनजीच्या दरात वाढ

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** पिपरीं-चिंचवडसह आजूबाजूच्या परिसरात सीएनजीच्या दरात रविवारी मध्यरात्रीपासून वाढ झाली असून यामुळे सीएनजी दर आता प्रतिकिलो ८५.९० झाला आहे. दरम्यान, पाईप्ड नॅचरल गॅसच्या (पीएनजी) दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडकडून (एमएनजीएल) पुणे, पिंपरी-चिंचवडसह चाकण, तळेगाव हिंजवडमध्ये सीएनजीचा पुरवठा केला जातो. कंपनीने रविवारी मध्यरात्रीपासून सीएनजीच्या दरात प्रतिकिलो ९० पैसे वाढ केली आहे. यामुळे सीएनजीचा दर प्रतिकिलो ८५.९० रुपयांवर गेला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात नैसर्गिक वायूचा दर वाढल्याने त्याची आयात महागली आहे. यामुळे कंपनीने सीएनजीच्या दरात वाढ करण्याचे पाऊल उचलले आहे.

कंपनीने म्हटले आहे की, सीएनजीची मागणी वाढत असून, आंतरराष्ट्रीय बाजारात किंमतही वाढत आहे. यामुळे सीएनजीच्या दरात स्थानिक पातळीवर वाढ झाली असून, ही वाढ नाममात्र ९० पैसे प्रतिकिलो आहे. सीएनजीचा दर आता प्रतिकिलो ८५.९० रुपये झाला असला तरी त्यातून पुण्यातील मोटारचालकांची पेट्रोलच्या तुलनेत ४९ टक्के आणि डिझेलच्या तुलनेत २७ टक्के बचत होत असून रिक्षाचालकांची २९ टक्के बचत होत आहे.

याआधी जुलै महिन्यात सीएनजीचे दर वाढले होते. सध्या इंधनाचे दर वाढले असून पेट्रोल आणि डिझेल महागल्याने वाहनचालक पर्यावरणपूरक सीएनजीला पसंती देत आहेत. मात्र,आता सीएनजीचे दरही वाढू लागले आहेत त्यामुळे वाहनाचालकांना याचा फटका बसत आहे.

| प्रतिकिलो | प्रतिकिलो |
|---|---|
| ९० पैसे वाढ | ८५.९० रुपये |




## जनजागृती मोहिमेस अवघे काहीच दिवस बाकी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'अंदाज-पत्रकात नागरिकांचा सहभाग' जनजागृती मोहिमेला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभतो आहे. या मोहिमेत १८ ते ७० वयोगटातील नागरिकांच्या सुमारे २ हजारपर्यंत सूचना महापालिकेस प्राप्त झाल्या असून नागरिकांना आपल्या परिसरातील विकासकामे सुचवण्यासाठी ही संधी महापालिकेने उपलब्ध करून दिली आहे. नागरिकांमध्ये या मोहिमे-बाबत जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या वतीने एलईडी व्हॅन, सोशल मीडिया तसेच रेडिओच्या माध्यमातून आवाहन करण्यात येत असून मोहिमेची माहितीही देण्यात येत आहे.

ज्या नागरिकांना सूचना, कल्पना, मते नोंदवायची आहेत त्यांनी 15 सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन फॉर्मद्वारे आपली मते नोंदवावीत आणि शहराच्या विकासात आपले योगदान द्यावे.

अधिक माहितीसाठी पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप डाऊनलोड करून ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## » Selected



## कलापिनी महिलामंचचा द्वितीय वर्धापनदिन उत्साहात

**पिंपरी :** बरोबर दोन वर्षांपूर्वी कलापिनी ह्या संस्थेच्या काही सख्यांनी एकत्र येऊन अंजली सहस्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली, महिलामंच पुनरुज्जीवित केला आणि बघता बघता दोन वर्ष पूर्ण सुद्धा झाली. या दोन वर्षात महिलामंचने अनेक उपक्रम केले त्या सगळ्याचच "सार" असा हा वर्धापनदिन होता.

यावेळी संगीत शारदा ह्यातील एक नाट्यप्रवेश सादर करण्यात आला. नाट्य प्रवेशाचे दिग्दर्शन केले होते ऋचा पोंक्षे यांनी तर लेखन अरुंधती देशपांडे व ऋचा पोंक्षे यांचे होते. मेधा रानडे, अरुंधती देशपांडे, संगीता देशप्रभू, कृपा नागपाल, सोनाली पडळकर, शांभवी जाधव, ओवी पाचलग आणि स्वरा पन्हाळे ह्यांचा नाट्यप्रवेशांत सहभाग होता. औपचारिक कार्यक्रमामध्ये कलापिनीच्याच सख्यांनी बनवलेले अतिशय सुरेख कागदी पुष्पगुच्छ देऊन मान्यवर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. ज्या सख्यांनी पुष्पगुच्छ तयार केले होते त्यांचा गौरव करण्यात आला.

## श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या प्रमुख विश्वस्तपदी ॲड.राजेंद्र उमाप

**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी विश्वस्त कमिटीची माहे ऑगस्ट २०२४ या महिन्याची मासिक सभा दिनांक १ ऑगस्ट रोजी संस्थांच्या पुणे कार्यालयात संपन्न झाली.या सभेत १ ऑगस्ट २०२४ पासून सन २०२४- २०२५ या वर्षासाठी ॲड.राजेंद्र उमाप विश्वस्त यांची श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे प्रमुख विश्वस्त म्हणून सर्वानुमते फेर निवड करण्यात आली.



यावेळी मा योगी निरंजननाथ गुरू शांतीनाथ विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख, डॉ.भावार्थ देखणे विश्वस्त हे उपस्थित होते.ॲड राजेंद्र उमाप हे पुण्यातील प्रथितयश विधीज्ञ असून महाराष्ट्र – गोवा – बार कौन्सिलचे विद्यमान अध्यक्ष आणि चिंचवड देवस्थान ट्रस्ट,चिंचवड,(थेऊर,मोरगांव, सिद्धटेक, अष्टविनायक) या देवस्थानचे विद्यमान विश्वस्त आहेत.तसेच जिजामाता महिला सहकारी बँक लि. च्या व्यवस्थापन मंडळावर चेअरमन म्हणून काम पाहत आहे.याशिवाय त्यांनी सन २०१३ मध्ये पुणे बार असोशिएशनचे अध्यक्ष पद भूषवले आहे.

## अटक करण्याची धमकी देत एक कोटी रुपयांची फसवणूक

**चिंचवड :** फ्रॉड केसमध्ये अटक करण्याची भिती दाखवत एका ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी आठ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना चापेकर चौक, चिंचवड येथे 4 ते 9 सप्टेंबर 2024 रोजी घडली.याबाबत 60 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने सोमवारी (दि. 9) चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीशी एसबीआय कस्टमर सर्व्हिसमधील अंकित यादव, मुंबई पोलीस ड्रेस घालून फिर्यादीशी व्हिडीओद्वारे बोलणारे पोलीस, सीबीआय मधील नवज्योत सिम्मी यांनी फिर्यादीची आर्थिक फसवणूक करण्याचे उद्देशाने पोलीस, सीबीआय अधिकारी व बँक कर्मचारी असल्याची तोतयागिरी केली. सुरेश अनुराग याने अडीच कोटी रुपयांच्या फ्रॉड केसमध्ये अटक करण्याची भिती दाखविली. फिर्यादीचे बँक खात्यातील रक्कम डिजीटल करन्सी चेक करुन ती व्हेरिफाय करुन परत करतो, असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. फिर्यादी यांच्याकडून एक कोटी आठ लाख रुपये घेऊन आर्थिक फसवणूक केली आहे. चिंचवड पोलीस तपास करीत आहेत.

## एमआयडीसी कार्यालयात चोरी

**चिंचवड :** एमआयडीसी कार्यालयाचा कोयंडा तोडून चोरट्याने आतील लॅपटॉप चोरून नेला. ही घटना रविवारी सकाळी चिंचवड स्टेशन येथे उघडकीस आली.नितीन किसन चव्हाण (वय ३३, रा. इंदिरानगर, चिंचवड स्टेशन) यांनी याबाबत रविवारी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिंचवड स्टेशन येथे एमआयडीसीचे कार्यालय आहे. फिर्यादी हे ठेकेदार आहेत. शनिवारी (दि. ७) सायंकाळी पाच ते रविवारी सकाळी पावणे दहा वाजताच्या सुमारास एमआयडीसीचे कार्यालय बंद होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने एमआयडीसी कार्यालयाच्या दरवाजाचा कोयंडा उचकटून आतील लॅपटॉप चोरून नेला. पिंपरी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## गणेश विसर्जन मिरवणुकांमुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी

# पिंपरी-चिंचवडमधील वाहतुकीत बदल

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गणेश विसर्जन मिरवणुकांमुळे वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी आज (११ सप्टेंबर) वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत. भोसरी, सांगवी, हिंजवडी परिसरातील वाहतूक मार्गात बदल करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त बापू बंगर यांनी दिले आहेत.

फुगेवाडी दापोडी उड्डाणपूल मार्गे शितळादेवी चौकाकडून पुण्याकडे जाणारा मार्ग बंद राहणार असून या मार्गावरील वाहतूक शितळादेवी चौकातून उजवीकडे वळून सांगवी मार्गे फुगेवाडी चौकातून हॅरीस पुलाच्या भुयारी मार्गामधून बोपोडीकडे जाईल.



कृष्णा चौकाकडून फेमस चौकाकडे जाणारा मार्ग बंद राहील. या मार्गावरील वाहतूक पाण्याची टाकी जुनी सांगवी मार्गे सांगवी महात्मा फुले पुलामार्गे वळविण्यात येईल. माहेश्वरी चौकाकडून जुनी सांगवीकडे जाणारा मार्ग बंद राहणार असून ही वाहतूक बँक ऑफ महाराष्ट्र, जुनी सांगवी मार्गे औंध किंवा पाण्याची टाकी जुनी सांगवी मार्गे सांगवी महात्मा फुले पुलामार्गे वळवली जाईल. कृष्णा चौकाकडून साई चौक ते माहेश्वरी चौक तसेच फेमस चौकाकडील मार्ग बंद राहणार आहे. या मार्गावरील वाहतूक काटेपूरम चौकातून डावीकडे वळून वाहने मयूरनगरी-एमके हॉटेल उजवीकडे वळून ढोरे फार्म-बा. रा. घोलप महाविद्यालय महात्मा फुले पुलामार्गे जातील.

टाटा टी जंक्शन चौकाकडून जॉमेट्रिकल सर्कल व छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाण्यास बंदी असून वाहने टाटा टी जंक्शन चौकाकडून लक्ष्मी चौक मार्गे जातील. जॉमेट्रिकल सर्कल चौकाकडून मेझा नऊ चौकाकडे जाण्यास वाहनांना बंदी राहणार आहे. ही वाहने टाटा टी जंक्शन चौक-लक्ष्मी चौक मार्गे जातील. छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून हिंजवडी गावठाणाकडे जाण्यास बंदी असून छत्रपती शिवाजी महाराज चौक, विप्रो सर्कल, फेज एक चौक-जॉमेट्रिकल सर्कल, टाटा टी जंक्शन मार्गे पुढे जाता येईल. कस्तुरी चौकाकडून छत्रपती शिवाजी महाराज चौक, हिंजवडी, मारुंजी वाय जंक्शन, इंडियन ऑईल चौक,कस्तुरी चौकाकडून हिंजवडीकडे जाण्यास बंदी असेल.

> हिंजवडी विभागातील वाहतुकीत १३ ते १७ सप्टेंबर दरम्यान दुपारी चार ते रात्री बारा वाजेपर्यंत बदल राहील.

> भोसरी विभागात ११, १३ आणि १७ सप्टेंबर रोजी दुपारी दोन ते रात्री अकरा वाजेपर्यंत वाहतूक मार्गात बदल असणार आहे.

> सांगवी विभागातील वाहतुकीत १३ सप्टेंबर रोजी दुपारी चार ते रात्री बारा वाजेपर्यंत बदल राहील.

#रा

# ११ ठेकेदार एक वर्षासाठी काळ्या यादीत

## निकृष्ठ कामे करणाऱ्या ठेकेदारांना पालिकेचा दणका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**‘हे’ ठेकेदार एक वर्षासाठी काळ्या यादीत...**

- **अजय घनश्याम खेमचंदानी, अनिकेत एंटरप्रायजेस, चैताली सप्लायर्स, कविता एंटरप्रायजेस, काव्या असोसिएटस,मोटवानी अँण्ड सन्स, नामदे एंटरप्रायजेस, आर.जी. मंगळवेढेकर, रामचंद्र एंटरप्रायजेस, सनसारा कन्स्ट्रक्शन, सोहम एंटरप्रायजेस**
- या ११ ठेकेदारांना एक वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. त्यामुळे या ठेकेदारांना महापालिकेच्या कोणत्याही निविदेप्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही.

BLACKLISTED

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागाची कामे घेण्यासाठी तब्बल 40 ते 45 टक्के कमी दराने निविदा भरून निकृष्ट कामे करणा-या ११ ठेकेदारांना महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी चांगलाच दणका दिला आहे. ११ ठेकेदारांना एक वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात आले असून निकृष्ट झालेल्या कामाचे दुप्पट पैसे वसूल करण्याचा निर्णयही आयुक्तांनी घेतला आहे.

शहरात महापालिकेच्या वतीने विविध विकास कामे केली जातात. मात्र, स्थापत्य विभागातील रस्ते दुरूस्ती, पेव्हींग ब्लॉक, मातीचे जॉगिंग ट्रॅक यासारखी कामे घेताना ११ ठेकेदारांनी १४ विकास कामात तब्बल ४० ते ४५ टक्के कमी दराने निविदा भरल्या होत्या. मात्र, एवढ्या कमी दरात कामे घेतल्यानंतर त्याचा दर्जा, गुणवत्ता चांगली राहिल का? याची आयुक्त सिंह यांना खात्री नव्हती. त्यामुळे सिंह यांनी अशा ११ कंत्राटदाराच्या १४ कामाचा दर्जा तपासण्याचे आदेश महापालिका दक्षता विभागाला सप्टेंबर २०२२ मध्ये दिले होते.

दक्षता विभागाने पुण्यातील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सीओईपीचा) कडून कामांच्या दर्जाची तपासणी करून घेतली. सीओईपीने केलेल्या तपासणीत पेंव्हीग ब्लॉकच्या कामात ब्लॉक खचलेले, ज्याठिकाणी दुरूस्ती आवश्यक अशा ठिकाणी दुरूस्तीच केली नाही, महापालिका मानांकनानुसार काम नाही, रस्ते दुरूस्ती केल्यानंतर त्वरित खड्डे पडणे, कॉंक्रिट थराची जाडी कमी असणे, जॉगिंग ट्रॅकवर कमी माती टाकणे, निविदेनुसार काम न करणे अशा विविध धक्कादायक बाबी समोर आल्या. या तपासणीचा अहवाल काही महिन्यांपूर्वी आयुक्तांना सादर करण्यात आला होता.



या अहवालानंतर महापालिकेने निकृष्ट कामे करणा-या ११ ठेकेदारांना कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा सादर करण्याचा आदेश दिला होता. मात्र, एकाही ठेकेदाराने समाधानकारक खुलासा सादर केला नाही. यानंतर आयुक्त सिंह यांनी सर्व ठेकेदारांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार शहर अभियंता मकरंद निकम यांनी ११ ठेकेदारांना एका वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्याचा आदेश काढला आहे. तसेच ठेकेदारांकडून निकृष्ट झालेल्या कामाचा दुप्पट खर्च वसूल करण्याचाही निर्णय घेतला आहे. त्यामुळे महापालिका ठेकेदारांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# चऱ्होलीकरांच्या पाणी प्रश्नावर निघणार तोडगा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चऱ्होली परिसर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. गावठाणाबरोबरच येथे अनेक गृहनिर्माण संस्था उभारण्यात आल्या असून, साधारण २० हजार नागरिक या परिसरात वास्तव्याला आहेत. हा परिसर वेगाने विकसित होत असताना येथे सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी कोणतेही नियोजन व्यवस्थापन करण्यात आलेले नाही हेच या परिसरातील पाणीटंचाईचे कारण आहे. पाणीटंचाईपासून येथील नागरिकांना मुक्त करण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. त्यासाठी सक्षम उपायोजना केल्या जातील असा विश्वास स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी दिला.

चऱ्होली तसेच गावठाण परिसरामध्ये अजित गव्हाणे यांनी भेट देत नागरिकांशी चर्चा केली. यावेळी अनेक गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या भेटी घेत ‘बाप्पांच्या’ आरतीलाही ते उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप आबा तापकीर, दत्ताभाऊ बुर्डे, कुणाल तापकीर, सागर तापकीर, सुनील पठारे, हरिभाऊ तापकीर, सचिन तात्या तापकीर, संदीप तापकीर, प्रशांत तापकीर, गणेश ताजने, सोमनाथ तापकीर, चेतन तापकीर, शुभम तापकीर राजुशेठ वाखारे, संतोष तापकीर, विक्रम गिलबिले, श्रेयस चिखले आदी उपस्थित होते.



यावेळी नागरिक, पदाधिकारी यांनी अजित गव्हाणे यांच्यासमोर परिसरातील समस्यांबाबत चर्चा केली.

## कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश

# राज्यस्तरीय वधू-वर मेळावा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मोशी :** रविवार दि. 1 सप्टेंबर 2024 रोजी साधुराम मंगल कार्यालय मोशी येथे राज्यस्तरीय वधू वर मेळावा, जनगणना अभियान मोबाईल अँपचे उदघाटन व वधू वरासाठी कुंभार मंगलम या वेबसाईटचे उदघाटन करण्यात आले दिपप्रज्वलन मा. प्रजापती बीमला राठोड यांचे हस्ते आणि मान्यवरांच्या हस्ते करून संत शिरोमणी श्री गोरोबाकाकांच्या प्रतिमेचे पूजन आणि अभिवादन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात श्री. ज्ञानेश्वर सोमवंशी अध्यक्ष पुणे जिल्हा यांनी वधू वर मेळावाबाबत, जनगणना अभियान आणि कुंभार मंगलम याबाबत उद्देश सांगून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.



मेळाव्यासाठी 200 पेक्षा जास्त वधू-वर नोंदणी

श्री. रमाकांत क्षीरसागर प्रदेश कार्याध्यक्ष यांनी अध्यक्षस्थान भुषवले, श्री हेमंत खटावकर यांनी स्वागत करून आलेल्या इच्छुक वधू वरांना शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची माहिती दिली. सन्माननीय श्री सतीश दादा दरेकर अध्यक्ष यांनी महाराष्ट्रातून आलेल्या मान्यवरांचे सत्कार करून आपली भूमिका विषद केली, वधू वर मेळाव्याबाबत मुलामुलांच्या अडचणी सोडवणे, त्याकरिता वेळ वाचावा. म्हणून कुंभार मंगलम या वेबसाईट बाबत माहिती दिली तसेच जनगणना अभियान बाबत अडचणी होत्या त्या मोबाईल अँप द्वारे सोडून महाराष्ट्रातील सर्व समाज बांधवांचे जनगणना पूर्ण होण्यास मदत होणार आहे

जनगणना मोबाईल अँपचे उदघाटन मा. प्रजापती बीमला राठोड आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कुंभार मंगलम या वेबसाईटचे उदघाटन डॉ. श्री. सदानंद जाधव साहेब अतिरिक्त जिल्हाधीकारी आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## थेरगाव खून प्रकरणी गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** पेविंग ब्लॉकने मारून व्यक्तीचा खून केल्याची घटना सोमवारी (दि. ९) सकाळी धनगर बाबा मंदिरा जवळ थेरगाव येथे उघडकीस आली. याप्रकरणी अज्ञाताच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अली अन्सारी (वय ३५) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी श्वेता घोरपडे/ शिंदे यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, काळेवाडी फाटा ते तापकीर चौक बीआरटी रोड धनगर बाबा मंदिरा जवळ सोमवारी सकाळी अली अन्सारी याचा मृतदेह आढळून आला. अज्ञात व्यक्तीने पेवींग ब्लॉकने मारहाण करून खून केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

# आयटी पार्कमध्ये इलेक्ट्रिक बसने घेतला पेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हिंजवडी :** हिंजवडी विप्रो सर्कलजवळ पीएमपीच्या इलेक्ट्रिक बसने अचानक पेट घेतला. स्थानिक नागरिकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आग आटोक्यात आली. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी, आगीत बसचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, गेल्या महिन्यातच पीएमपी प्रशासनाने इलेक्ट्रिक बस ठेकेदारांना या वाहनांची काळजी घेण्याबाबत सूचना दिली होती. प्रवाशांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर याबाबत नाराजीही व्यक्त करण्यात आली होती.

आयटी परिसर म्हणून प्रसिद्ध असलेल्या हिंजवडी परिसरात सकाळपासून वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. शनिवारी सायंकाळी सव्वा आठच्या सुमारास पीएमपीएलची इलेक्ट्रिक बस हिंजवडीकडून फेज तीनच्या दिशेने निघाली होती. विप्रो सर्कलजवळ येताच बसच्या छताकडील बाजूने धूर येऊन बसने अचानक पेट घेतला. यावेळी बसमध्ये मोठ्या संख्येने प्रवासी होते. स्थानिक नागरिकांच्या मदतीने बसमधील प्रवाशांना तत्काळ बाहेर काढले. नागरिकांनी धाडस दाखवत शिडी लावून बसच्या टपावर जाऊन पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली.

दरम्यान, सार्वजनिक वाहतुकीचा प्रमुख आधार असलेल्या पीएमपीने पेट घेतल्याने बसमध्ये प्रवास करत असलेले प्रवासी घाबरले होते.

पान १ वरून

## महाराष्ट्रात सत्तापालट?

शकते. येथे शेतकरी, अनुसूचित जाती-जमातींचा संताप सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जाऊ शकतो. दुसरा झोन उत्तर महाराष्ट्र (खान्देश) असून तिथे राज्यातील विधानसभेच्या ४७ जागा आहेत. तिथे दोन्ही आघाड्यांना समसमान जागा म्हणजेच महायुतीला व महाआघाडीला २० ते २५ जागा मिळण्याची आशा आहे. येथेही कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या रोषाचा सामना सत्ताधाऱ्यांना करावा लागू शकता. तिसरा झोन म्हणजे, ठाणे-कोकण. या भागात विधानसभेच्या ३९ जागा आहेत. तिथे महायुती चमकदार कामगिरी करत असून तेथे त्यांना २५ ते ३० जागा मिळू शकतात तर महाआघाडीकडे केवळ ५ ते १० जागा जाण्याची शक्यता आहे. येथे शेकाप व उद्धव ठाकरेंचा पक्षही ढेपाळताना दिसत आहे. चौथा झोन मुंबई आहे. या भागांत विधानसभेच्या ३६ जागा आहेत. सत्ताधारी महायुतीला मुंबईत फटका बसू शकतो. त्यांना केवळ १० ते १५ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर महाविकास आघाडीला २० ते २५ आणि इतरांना शून्य ते एक जागा मिळू शकते. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्त्वाखालील शिवसेनेकडे मुंबईतील सर्व मराठी मतं जाण्याची शक्यता आहे तर कॉंग्रेसला मुस्लिम वोट बँकचा फायदा मिळेल. पाचवा झोन पश्चिम महाराष्ट्र आहे, ज्यामध्ये ५८ जागा असून येथे महाविकास आघाडी मुसंडी मारू शकते. येथे त्यांना ३० ते ३५ तर महायुतीला २० ते २५ जागा मिळण्याची शक्यता आहे. शेवटचा आणि सहावा झोन मराठवाडा असून येथील शेतकरीही सरकारवर नाराज असल्याचे दिसत आहे. या भागात ४६जागा असून महायुतीला १५ ते २० आणि महाविकास आघाडीला २५ते३० जागा मिळू शकतात. अपक्ष ० ते २ जागांवर निवडून येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राचा जनादेश सध्या महाविकास आघाडीच्या बाजूनं झुकल्याचं पाहायला मिळत आहे. सरकारची लाडकी बहीण योजना सरकारला इतकी फायद्याची ठरत नसल्याचे दिसून येत आहे.

## भाजपाध्यक्षांच्या पुत्राचा 'कार'नामा

अडवली. यावेळी कारमधील संकेत बावनकुळे याच्यासह कारमधील तिघेजण पळून गेले. 'कारचा चालक अर्जुन हावरे आणि आणखी एक व्यक्ती, रोनित चित्तमवार यांना पोलो कारमधून प्रवास करणाऱ्या लोकांनी त्यांचा पाठलाग करून पकडले व त्यांना पोलिस ठाण्यात नेण्यात आले, तेथून पुढील तपासासाठी त्यांना सिताबर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. अधिकाऱ्याने सांगितले की, ऑडी कारमधून प्रवास करणारे लोक धरमपेठेतील एका बिअर बारमधून परतत असताना ही घटना घडली. मात्र, यापैकी कोणी मद्यधुंद अवस्थेत होते की नाही, याची माहिती त्यांनी दिली नाही. सीताबर्डी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याने सांगितले की, 'सोनकांबळे यांच्या तक्रारीवरून बेदरकारपणे वाहन चालवणे आणि इतर आरोपांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हावरे आणि चित्तमवार यांची जामिनावर सुटका करण्यात आली. पुढील तपास सुरू आहे. हिट अँड रन प्रकरणाच्या तपासात आमच्यावर कोणताही राजकीय दबाव नाही. अर्जुन हा बावनकुळे यांच्याकडे चालक म्हणून नाही तर मित्र म्हणून पार्टीसाठी गाडीतून गेला होता असेही पोलीस म्हणाले. अपघातानंतर तिघेही गाडीने पळून जायच्या तयारीत होते. पण नागरिकांनी गाडी अडवली आणि दोघांना मारहाण केली. लाहोरी हॉटेलमध्ये तिघांनी जेवण केल्याची माहिती दिली आहे.

## नगरच्या रुग्णालयातील मोठ्या रॅकेटचा...

अहमदनगर जिल्हा रुग्णालयातील अज्ञात कर्मचाऱ्यांना हाताशी धरून कोणतीही वैद्यकीय तपासणी न करता, रुग्णालयात नोंद न करता ऑनलाईन पोर्टलवार माहिती भरली. त्याद्वारे कर्णबधीर असल्याचे बनावट अपंग प्रमाणपत्र मिळवल्याचा धक्कादायक प्रकार जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या चौकशीतून समोर आला आहे. याप्रकरणी जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, पाथर्डी तालुक्यातील चौघांवर तर दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

जिल्हा सरकारी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी (वर्ग एक) डॉ. साहेबराव डवरे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. विशेष म्हणजे या बनवेगिरीच्या साखळीमध्ये जिल्हा सरकारी रुग्णालयातीलच काही कर्मचारी सहभागी असल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रसाद संजय बडे (पाथर्डी), सुदर्शन शंकर बडे (पाथर्डी), सागर भानुदास केकाण (रा. पागोरी पिंपळगाव, पाथर्डी), गणेश रघुनाथ पाखरे (माणिकदौंडी, पाथर्डी) योगेश बनकर (जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी) गणेश गोत्राळ (जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी) या सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जरांगे पाटलांनी ...

सप्टेंबरऐवजी 17 सप्टेंबर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनापासूनच उपोषणाला बसणार आहेत. मध्यरात्री बारावाजेपासून उपोषणाला सुरुवात होणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. 17 सप्टेंबरपासून अमरण उपोषण करणार हे उपोषण कठोर असणार असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावं या आपल्या मागणीवर अजूनही मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. मात्र दुसरीकडे त्यांच्या या मागणीला ओबीसी समाजातून मोठा विरोध होत आहे. जरांगे पाटील यांनी सरकारला आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी 29 ऑगस्टची डेडलाईन दिली होती, मात्र आरक्षणाचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही, त्यांनी 29 ऑगस्टलाच आपण पुन्हा एकदा 29 सप्टेंबरपासून उपोषण करणार असल्याची घोषणा केली होती. मात्र आता त्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. आता जरांगे पाटील हे 17 सप्टेंबरपासूनच उपोषण करणार आहेत.

## पूर्वपरीक्षा तारखा लवकर जाहीर करा

परीक्षेची तारीख जाहीर न झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे संपूर्ण नियोजन कोलमडले आहे.काही उमेदवारांना आयोगाच्या अशा दिरंगाईविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे, तर काही उमेदवारांनी सोमवारी ‘ट्विटर’वर मोहीम राबवत आयोगाने तारीख जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात आमदार बच्चू कडू यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून आयोगाचे लक्ष वेधले आहे. आयोगाने पूर्वपरीक्षेची तारीख तात्काळ घोषित करून उमेदवारांना आश्वासित करावे.आर्थिक व अभ्यासाचे नियोजन करताना उमेदवारांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे, तसेच संयुक्त पूर्वपरीक्षा गट ‘ब’ व गट ‘क’ ची जाहिरात देखील मागील आठ महिन्यांपासून प्रसिद्ध झालेली नाही. त्यामुळे उमेदवार चिंतेत आहेत. त्यामुळे ही जाहिरात देखील लवकर प्रसिद्ध करावी, अशी मागणीही कडू यांनी केली आहे.

## टीईटी राज्यपरीक्षा...

अर्ज भरणे, शुल्क या बाबतची माहिती परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेला तात्पुरता प्रवेश देऊन निकाल घोषित केला जाईल. परीक्षेच्या निकालानंतर शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रांची पडताळणी प्रमाणपत्र वितरणावेळी करण्यात येईल. प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी कागदपत्रे अपूर्ण असल्यास किंवा उमेदवार प्रमाणपत्रे सादर करू न शकल्यास परीक्षेची उमेदवारी रद्द करण्यात येईल. ऑनलाइन अर्जातील माहिती आणि मूळ कागदपत्रांत तफावत आढळल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. टीईटी २०१८ आणि २०१९मधील गैरप्रकारात समाविष्ट असलेल्या उमेदवारांची यादी परीक्षा परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रत्येक उमेदवाराने आपले नाव या यादीत आहे किंवा नाही, याबाबत तपासणी करून वस्तुनिष्ठ माहिती अर्जात भरावी. भरलेली माहिती चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही स्तरावर संपादणूक रद्द करण्याचा अधिकार परीक्षा परिषदेकडे राहील. २०१८, २०१९च्या गैरप्रकार केलेल्या उमेदवारांच्या यादीत नाव असूनही खोटी माहिची भरून परीक्षा दिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे.

## योग्य प्रतिनिधित्व मिळाल्यास ...

रामदास आठवले यांनी मंगळवार १० सप्टेंबर रोजी पुण्यातील व्हीआयपी विश्रामगृहात एक पत्रकार परिषद घेतली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, राज्य संघटक परशुराम वाडेकर, सूर्यकांत वाघमारे, गौतम सोनवणे, शैलेश चव्हाण, अशोक शिरोळे, श्याम सदाफुले, मोहन जगताप, महिपाल वाघमारे, वसंत बनसोडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. आठवले पुढे म्हणाले की, सध्या पुण्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गणेशोत्सव हा सर्व धर्मीयांच्या एकतेचे आज प्रतीक बनला आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार देशातील नागरिकांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. मोदी सरकारच्या धोरणांमुळे आज देशातील २५ कोटी लोकांना आम्ही गरीबीच्या बाहेर आणू शकलो. शेतकऱ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून आम्ही १३ हजार कोटी रुपये आजवर दिलेले आहेत. दहा लाख लोकांना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये एसी-एसटीच्या उमेदवारांना योग्य ते प्रतिनिधित्व मिळालेले आहे. आठवले यांनी सांगितले की, गेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित जागा प्राप्त झाल्या नाहीत. संविधान बदलाचा मुद्दा विरोधकांनी जोरदारपणे लावून धरल्यामुळे जनतेत एक वेगळा संदेश गेला. तसेच मराठा आंदोलनाचाही फटका महायुतीला बसला होता. परंतु आगामी विधानसभा निवडणुकीत मात्र चित्र उलटे दिसून येईल. राज्यातील महायुती सरकारने जनतेसाठी अनेक चांगल्या योजना राबवल्या आहेत. लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची एक मोठी उपलब्धी आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगल्या जागा मिळतील, असा विश्वास आठवले यांनी व्यक्त केला. दरम्यान, इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मारक पूर्ण करण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने साडेतीन हजार कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. हे भव्य स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मी व्यक्तीशः प्रयत्नशील आहे. येत्या दोन वर्षांमध्ये हे स्मारक पूर्ण झालेले सर्वांना दिसून येईल. सध्या महाराष्ट्रात मराठा आरक्षणावरून मोठे रणकंदन होते आहे. परंतु मराठा समाजाला आरक्षण प्राप्त व्हावे, ही केंद्र व राज्य सरकारची खूप इच्छा आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांनी उठसूठ आंदोलनाची धमकी देण्याऐवजी त्यांनी सरकारला योग्य ते सहकार्य करावे. त्यातून मराठा समाजाच्याच समस्या सुटतील. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रिपाइंच्या वतीने महायुतीतील पक्षांकडे १२ जागांची मागणी केली आहे. ही मागणी त्यांनी पूर्ण करावी, त्याचे कारण हे की, रिपाइंमुळे महायुतीतील तीनही प्रमुख पक्षांना चांगला फायदा होणार आहे. त्यामुळे या सर्व पक्षांनी आपापल्या कोट्यातील चार-चार जागा आम्हाला द्याव्या, अशी मागणीही त्यांनी या वेळी केली.

## तब्बल 13 कोटी 50 लाख रुपये मोजावे लागणार

हे दोन्ही ठेकेदार २०२२च्या टेंडरही पात्र ठरले होते. भूमी ग्रीन एनर्जी कंपनीने सर्वांत कमी ९७९ रुपये प्रतिटन दर देऊन यंदाही टेंडर मिळवण्याची तयारी केली आहे. पण हा दर महापालिकेच्या दरापेक्षा प्रतिटन १३५ रुपयांनी जास्त आहे. बाजारभावापेक्षा हा दर खूप जास्त आहे. अव्वाच्या सव्वा दर लावल्याने पुणे महापालिका प्रशासनाने त्यावर हरकत घेतली आहे. हा खर्च महापालिकेला परवडणारा नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. टेंडरमधील दराचे पृथःकरण सादर करावे आणि दर कमी करण्याबाबत सात दिवसांत कळवावे, असे पत्र महापालिकेने दिले आहे. भूमी ग्रीन कंपनीचा सांगली येथे वीज निर्मिती प्रकल्प असून, त्यामध्ये इंधन म्हणून आरडीएफचा वापर करून विल्हेवाट लावली जाणार आहे.

## » Selected



### चिखली येथे शिक्षकदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**चिखली :** चिखलीतील जीआयएस आणि सिनियर सेकंडरी विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी शैलेश कोथमिरे, अर्चना कोथमिरे, अशोक बोकसे उपस्थित होते. जीआयएस प्ले स्कूलच्या -प्री प्रायमरीच्या शुभांगी माळी, दीपाली देशपांडे, प्रायमरी विभागातून स्मिता बोखरे, सेकंडरी विभाग दीपक शिंदे, सिद्धी कॉलेज ऑफ फार्मसीच्या डिप्लोमा मधून कविता सानेर, श्रद्धा गायकवाड, लॅब असिस्टंट पल्लवी गाडे यांना सन्मानचिन्ह देऊन आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्ष एस.बी.पाटील, विश्वस्त गणेश पाटील, स्नेहल पाटील, आकाश पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रकाश गायकवाड, सहयोगी संचालक सुनील शेवाळे, सिद्धी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. प्रवीण साबळे, सतीश शेळके, दौलत कांबळे, आदि उपस्थित होते.

### यूपीएससी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

**पिंपरी :** सोहम सार्वजनिक ग्रंथालय येथे प्रशासकीय सेवेत व मिल्ट्री सर्व्हिसेसमध्ये एमपीएससी आणि यूपीएससी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा झाला. महापालिका उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते निधी अगरवाल या नेव्ही मध्ये सब लेफ्टनंट म्हणून त्यांची निवड झाली.

यावेळी तिचे आई वडील सुधीर कुमार अगरवाल व निरुपमा अगरवाल यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी निधीचे कौतुक करून तिला शुभेच्छा दिल्या. अगरवाल म्हणाले, “स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांचे ध्येय स्पष्ट असेल, मार्ग निश्चित असेल आणि अथक प्रयत्नांची त्याला जोड असेल, सोहम अभ्यासिकेसारखी उत्कृष्ट व्यवस्था असेल, तर कोणतीही शक्ती तुम्हाला ध्येयापासून रोखू शकत नाही. त्यासाठी सकारात्मक विचारसरणी अंगीकारणे आवश्यक आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

### गणेश मंडळांकडून महिलांसाठी विविध स्पर्धा


**भोसरी :** येथील इंद्रायणीनगरात गणेश मंडळांनी साध्या पद्धतीने देखावे सादर केले आहेत. तसेच मंडळाच्यावतीने लहान मुले-मुली, महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांसह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



इंद्रायणीनगरातील विविध मंडळाद्वारे परिसरातील लहान मुले-मुली आणि महिलांसाठी संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा, मटका फोड, धावणे, लंगडी, तीन पाय उड्या आदींसह विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. काही मंडळांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन केले आहे. भोसरीतील इंद्रायणीनगरातील साम्राज्य प्रतिष्ठानद्वारे राधाकृष्ण महालाची प्रतिकृती सादर केली आहे. हर्षद भालेराव हे मंडळाचे अध्यक्ष आहेत. नवजीवनमित्र मंडळाने पांढऱ्या निळ्या पट्ट्याच्या साहाय्याने आकर्षक सजावट केली आहे. अमित कांबळे मंडळाचे अध्यक्ष आहेत. श्री साई चौक मित्र मंडळाद्वारे आकर्षक सजावटीत गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. माजी नगरसेवक विलास मडिगेरी मंडळाचे अध्यक्ष आहेत. वीर हनुमान मित्र मंडळाने फुलांच्या सजावटीतील आकर्षक महाल तयार केला आहे.

### तळेगाव-चाकण रस्त्यावर अवजड वाहनांना नऊ तास बंदी

**तळेगाव :** वाढते अपघात आणि वाहतूक कोंडीवर उपाययोजना म्हणून तळेगाव-चाकण महामार्गावर जड, अवजड, मध्यम वाहनांना तळेगावातून सकाळी आठ ते दुपारी दोन वाजेपर्यंत आणि सायंकाळी पाच ते सात वाजेपर्यंत अशी एकूण नऊ तास जाण्या-येण्यास बंदी घालण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त बापू बांगर यांनी सदर आदेश काढला.



तळेगाव, म्हाळुंगे आणि चाकण एमआयडीसीमुळे तळेगाव-चाकण रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र-५४८-डी वर मोठ्या प्रमाणावर जड व अवजड वाहनांची वाहतूक होत असते. त्यामुळे, मागचे सर्व आदेश रद्द करुन तळेगाव-चाकण राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ डी वरील वडगाव फाट्यापासून पुढे स्वराज नगरी ते चाकणकडे जाणाऱ्या मार्गावर ही प्रवेश बंदी करण्यात आली आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहने तसेच हलकी, लहान वाहने (एलएमव्ही), प्रवासी बसेस आदी वाहने वगळून इतर सर्व जड, अवजड, मध्यम वाहनांना हा आदेश लागू असेल.

### जुन्नर तालुक्यात झपाट्याने वाढत असलेली

# बिबट्यांची संख्या शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यामध्ये वारे माप वाढणारी बिबट्यांची संख्या जनतेसाठी मोठे डोकेदुखी ठरत आहे. वन खात्याकडून पकडलेले बिबटे माणिकडोह निवारा केंद्रात ठेवतात की त्यांना पुन्हा सोडून देतात? हा एक विषय संशोधनाचा बनला आहे. दरम्यान 31 जुलै रोजी जुन्नर येथील माणिक डोह निवारा केंद्रातील 10 बिबटे गुजरात राज्यामध्ये जामनगर येथे पाठवण्यात आले आहे. बिबट्यांची वारंवार वाढणारी संख्या जुन्नरकरांना मोठे डोकेदुखी ठरत आहे. सध्या जुन्नर येथील माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात 44 बिबटे आहेत. बहुदा आठ दिवसाच्या फरकाने कुठे ना कुठे बिबट्या पकडला जातो. हा पकडलेला बिबट्या माणिक डोह निवारा केंद्रात हालवण्यात आला आहे असे सांगितले जाते. परंतु पकडलेला बिबट्या खरोखरच माणिकडोह निवारा केंद्रात ठेवला जातो की जवळपास सोडून दिला जातो? याबाबत मात्र अधिकारी अधिकृतपणे काही बोलत नाहीत.

» जुन्नर

आम्ही पकडलेला बिबट्या माणिक डोह निवारा केंद्रात ठेवतो असं मात्र आवर्जून सांगतात. प्रश्न शिल्लक राहतो तो म्हणजे एवढे बिबटे पकडतात तर मग माणिक डोह निवारा केंद्रातील बिबट्यांची संख्या तेवढीच कशी राहते? बिबट्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे आता पकडलेल्या बिबट्यांचा दुसरा लॉट पुन्हा गुजरात राज्यात पाठवणार का? किंवा असा काही प्रस्ताव तयार करण्यात आला आहे का ? असे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, सध्या तरी असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. बिबट हा प्राणी मांजर कुळातला. तालुक्यामध्ये बिबट्यांना पोषक वातावरण असल्याने पिल्लांची संख्या झपाट्याने वाढते. वाढणारी बिबट्यांची संख्या रोखायची कशी असा प्रश्न वनखात्याच्या अधिकाऱ्यांच्या समोर आ वासून तयार आहे. बिबट्यांची नसबंदी केली जावी. असा प्रस्ताव राज्य सरकारकडून केंद्र सरकारला गेलेला आहे. प्राथमिक स्वरूपामध्ये काही बिबटे व काही बिबट्यांच्या माद्या यावर नसबंदी सारखा प्रायोगिक स्वरूपाचा अभ्यास केला जाऊ शकतो. परंतु सरसकट बिबट्यांची नसबंदी करण्यास शासन अनुमती देण्यास सध्या तरी अनुकूल दिसत नाही. बिबट्यांच्या बाबत निर्णय घेण्यात शासन अनुकूल नसल्याने आणि बिबट्यांची संख्या अधिकच वाढत चालल्याने शेतकरी वर्गाची चिंता मात्र मोठी वाढत चालली आहे. बिबट्याचे दर्शन झाले नाही असा एकही दिवस शेतकऱ्याला जात नाही.

भर दिवसाही बिबट्याच्या दर्शन कुठे ना कुठे दररोज होत असतेच. बिबट्या हा खूप घाबरट प्राणी असे वनखाते सांगत असते. परंतु सध्या परिस्थिती त्या उलट आहे. बिबटया खूप धट झाला असून माणसांना पहिले तरी बिबटया आता घाबरून पळत नाही. पूर्वी एखादा बिबटया दिसायचा परंतु हल्ली बिबटया कळपाने दिसू लागले आहेत व टोळी करून फिरताना दिसत आहेत. लोक गणपतीच्या कार्यक्रमाना जात असतात. परत घरी परत येताना बिबट्याचा हल्ला होण्याची भीती व्यक्त होत आहेत.


पिंपळवंडीच्या स्मशानभूमीत जवळ पाच दिवसापूर्वी वन खात्याने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या झाला जेरबंद (छाया -सुरेश वाणी )

## पिंपळवंडी येथे बिबट्या जेरबंद

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी च्या स्मशानभूमी जवळ वनविभागाने पाच दिवसांपूर्वी लावलेल्या पिंजऱ्यामध्ये आज (दि. 10l) मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास बिबट्या जेरबंद झाला असल्याची माहिती वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण यांनी दिली. ते म्हणाले की पिंपळवंडी परिसरामध्ये बिबट्याचा वावर असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केल्यानुसार स्मशान भूमी जवळ पाच दिवसांपूर्वी बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावला होता. मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास हा बिबट्या पिंजऱ्यामध्ये जेरबंद झाला असून त्याला माणिक डोळे येथील निवारा केंद्रामध्ये हलवण्यात आले आहे. दरम्यान पिंजऱ्यात जेरबंद झालेला बिबट्या नर असून त्याचे वय सुमारे पाच ते सहा वर्षांची आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून याबाबतची काळजी घेणे अपेक्षित आहे, असे आवाहन वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण यांनी केले.

# हिवरेत कृषी सिंचन प्रकल्पाचे सहकार मंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** हिवरे ता. शिरुर येथील मांदळवाडी सह परिसरात कायमस्वरूपी पाण्याची टंचाई जाणवत असल्याने येथील दानशूर खैरे दाम्पत्याने गावातील पाण्याची टंचाई दूर करण्याचे स्वप्न उराशी बाळगून गावासाठी चक्क एक कोटी रुपयांचा कृषी सिंचन प्रकल्प उभारुन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते या कृषी सिंचन प्रकल्पाचे लोकार्पण केले आहे.


लोकार्पण : हिवरे ता. शिरुर येथील कृषी सिंचन प्रकल्पाचे लोकार्पण करताना मान्यवर व पदाधिकारी.

■ खैरे दांपत्याचे कार्य दिशादर्शक – दिलीप वळसे पाटील

■ खैरे दाम्पत्याने उभारला स्वखर्चाने एक कोटीचा सिंचन प्रकल्प

हिवरे ता. शिरुर हे गाव दुष्काळी समजले जाणारे गाव असल्याने येथे प्रत्येक वर्षी पाण्याचा दुष्काळ जाणवत असताना येथील दिपक खैरे व दिपाली खैरे या दांपत्याने गावच्या पाण्याचा प्रश्न मिटवण्याचा संकल्प केला, दरम्यान गावातील पाहणी करत येथील काशीतळे येथील चासकमान कालव्याच्या कडेला दोन गुंठे जागा विकत घेत येथे विहीर बनवत येथून तब्बल साडेपाच किलोमीटर पाईप लाईन करत मांदळवाडी येथील पाझर तलाव दुरुस्त व खोलीकरण करत येथील तलावात पाणी साठवण करण्यास सुरुवात करण्यात आली, सदर प्रकल्पाने गावातील शेकडो हेक्टर जमिनी पाण्याखाली आली असल्याने शेती हिरवीगार होऊ लागल्याने शेतकऱ्यांचा दुष्काळ आता हटणार आहे, सदर प्रकल्प सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आला, यावेळी माजी आमदार पोपटराव गावडे, बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश पवार, जिल्हा परिषद सदस्या सविता बगाटे, भीमाशंकर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील, पंचायत समितीच्या माजी उपसभापती सविता पऱ्हाड, राष्ट्रवादीचे अध्यक्ष अमोल जगताप, शुभांगी पडवळ, उद्योजक सदाशिव पवार, सामाजिक कार्यकर्ते विकास गायकवाड, गणेश सस्ते, सरपंच दिपाली खैरे, उपसरपंच नयना मांदळे, माजी सरपंच दिपक खैरे, शारदा गायकवाड, माजी उपसरपंच विश्वनाथ शिर्के, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ आढळगे, संध्या गायकवाड, हौसाबाई जगताप, चेअरमन राजेंद्र साळुंके, तंटामुक्ती अध्यक्ष शरद तांबे, उपाध्यक्ष अनिल साळुंके, रेवननाथ जाधव, आनंदा तांबे, संतोष जाधव, फक्कड साळुंके, जालिंदर मांदळे, संतोष गायकवाड यांसह आदी उपस्थित होते. दरम्यान यावेळी बोलताना समाजात अनेकांकडे भरपूर पैसा असतो मात्र समाजासाठी खर्च करण्याचे दातृत्व लागते, खैरे दाम्पत्याचे कार्य समाजासाठी दिशा देणारे आणि शेतकऱ्याच्या हिताचे असल्याचे मत सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश पडवळ यांनी केले तर प्रास्ताविक अमोल जगताप यांनी केले आणि सरपंच दिपाली खैरे यांनी आभार मानले.

» Selected


श्रेष्ठदान... करंदी ता. शिरुर येथील संकल्प फोर्जिंग कंपनीत रक्तदान करताना कामगार.

## गणेशोत्सवानिमित्त तब्बल एकशे पाच कामगारांचे रक्तदान

**शिक्रापूर :** सध्या अनेक रक्तपेढी मध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असून त्यामुळे अनेक रुग्णांचे जीवन धोक्यात येण्याची शक्यता लक्षात घेता नुकतेच करंदी येथील संकल्प फोर्जिंग कंपनीच्या कामगारांनी रक्तदान करत सामाजिक भान जपले आहे.

करंदी ता. शिरुर येथील संकल्प फोर्जिंग कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी सध्याची रक्तपेढ्यां मधील रक्तसाठ्याचा विचार करत नुकतेच गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक जाणीवेतून रक्तदान शिबीर राबवण्याचा संकल्प केला, त्यांनतर कंपनीचे व्यवस्थापक कपिल यादव, धोंडीराम खरात, दत्तात्रय ढमढेरे यांसह आदींच्या पुढाकाराने पुणे येथील पुणे ब्लड बँकेच्या माध्यमातून कंपनीमध्ये रक्तदान शिबीर आयोजित केले, दरम्यान कंपनीच्या कामगारांनी रक्तदान शिबिरातउस्फुर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले असता कंपनीतील तब्बल एकशे पाच रक्तदात्यांनी रक्तदान केले, यावेळी कंपनीचे व्यवस्थापक कपिल यादव यांनी सर्व रक्तदाते कामगारांचे आभार मानले.

# करंदीत उभ्या ट्रकचे चार टायर व बॅटरी चोरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** करंदी ता. शिरुर येथील पेट्रोल पंपमध्ये उभ्या असलेल्या एका ट्रकचे चार टायर व बॅटरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

» शिरुर

करंदी ता. शिरुर येथील ईस्सार पेट्रोल पंप येथे पंपातील साहित्य घेऊन आल्यासाठी आणलेला एम एच ०४ जि सि ३६०९ हा ट्रक उभा करुन ठेवलेला असताना, सकाळच्या सुमारास ट्रकच्या ट्रान्सपोर्टचे कर्मचारी सतीश पऱ्हाड हे ट्रक जवळ गेले असताना त्यांना ट्रकच्या पाठीमागील चार टायर नसल्याचे दिसल्याने त्यांनी ट्रकची पाहणी केली असता ट्रकची बॅटरी आणि चार टायर अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याचे निदर्शनास आले, याबाबत सतीश पांडूरंग पऱ्हाड वय ३४ वर्षे रा. पऱ्हाडवाडी केंदूर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असल्याने शिक्रापूर पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार प्रशांत हे करत आहे.

## निमगाव भोगीच्या इसमाची ट्रकच्या व्यवहारात फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** निमगाव भोगी ता. शिरुर येथील एका इसमाचे दोन ट्रक खरेदी करुन इसमाला व्यवहाराचे पैसे न देता बँकेचे हप्ते देखील रखडवून इसमाची ट्रकच्या व्यवहारात फसवणूक केल्याची घटना घडली असल्याने रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे महेश हरिचंद्र तरटे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निमगाव भोगी ता. शिरुर येथील विठ्ठल पावसे यांना त्याचे एन एल ०१ ए एफ ७२२७ व एन एल ०१ ए एफ ७२३६ हे दोन मोठे ट्रक विक्री करायचे असताना त्यांची ओळख महेश तरटे यांच्याशी झाल्याने दोघांनी दोन्ही ट्रकचा व्यवहार केला, यावेळी तरटे हे पावसे यांना सहा लाख रुपये देऊन उर्वरित बँकेचे हप्ते भरणार होते, मात्र तरटे यांनी पावसे यांना फक्त दोन लाख रुपये देऊन त्याबाबत ऑक्टोबर २०२३ मध्ये करारनामा करुन दोन्ही ट्रक नेले मात्र त्यांनतर पावसे यांना उर्वरित चार लाख रुपये देखील दिले नाही आणि बँकेचे हप्ते देखील भरले नसल्याचे आपली ट्रकच्या व्यवहारात फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने याबाबत विठ्ठल काळूराम पावसे वय ४१ वर्षे रा. निमगाव भोगी ता. शिरुर जि. पुणे यांनी रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

# माथाडीच्या नावाखाली चालकाची फसवणूक

### बनावट पावत्या देणारी टोळी सक्रीय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये वारंवार माथाडीच्या नावाखाली हजारो रुपये उकळण्याची घटना घडत असताना नुकतेच येथे माथाडीच्या नावाखाली बनावट पावत्या देऊन कंटेनर चालकाची फसवणूक केलायची घटना घडली असल्याने एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे चार अनोळखी युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील औद्योगिक वसाहत येथे असलेल्या टाटा स्टील कंपनीमध्ये सुभान अन्सारी हे त्यांच्या ताब्यातील कंटेनर मधून स्टील कंपनीचे मटेरियल घेऊन आलेले असताना त्यांच्याजवळ चार अनोळखी युवक आले, त्यांनी अन्सारी यांना दमदाटी करत तुम्हाला टाटा स्टील कंपनीमध्ये माल खाली करायचा असेल तर माथाडीची पावती फाडावी लागेल, त्यांनतरच माल खाली होईल असे म्हणून अन्सारी यांच्याकडून आठशे रुपये घेत पावती फाडली, त्यांनतर अन्सारी कंपनीमध्ये गेले असता सदर कंपनीमध्ये कोणतीही माथाडी नसल्याचे कंपनी मधील व्यक्तींनी सांगितले, त्यामुळे आपली बनावट माथाडीच्या नावाखाली बनावट पावती देऊन फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने, याबाबत कंटेनर चालक सुभान एनूल अन्सारी वय ३२ वर्षे रा. सुरज बजुर्ग ता. गोलाबाजार जि. गोरखपूर उत्तरप्रदेश यांनी रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी चार अनोळखी युवकांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अविनाश थोरात हे करत आहे.

## विश्वनाथ भुजबळ यांचे दुःखद निधन



**वाल्हे प्रतिनिधी :** पुरंदर तालुक्यातील वाल्हे सावतामाळी चौकातील विश्वनाथ काशिनाथ भुजबळ यांचे सोमवार दि.9 रोजी (वय- 80) यांचे हृदय विकाराच्या धक्याने राहत्या घरी दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जेजुरी येथिल सामाजिक कार्यकर्त्या अलकाताई बनकर यांचे ते वडिल होत.

## पत्नीने केला पतीच्या डोक्यात लोखंडी रॉड घालून खून



**नारायणगाव :** पत्नीने पतीच्या डोक्यात लोखंडी रॉड घालून पतीचा खून केला असल्याची प्राथमिक माहिती मिळत असून मृत झालेल्या इसमाचे नाव देवराम सोमा डुकरे ( वय 54 वर्षे रा.औरंगपूर, ता. जुन्नर जिल्हा पुणे ) असे आहे. या बाबत समजलेली माहिती अशी की देवराम डुकरे व त्याची पत्नी दीपाली डुकरे आपल्या एका विवाहित मुली सोबत औरंगपूर येथील खंडोबामाळ येथे राहत होते. देवराम डुकरे व त्याची पत्नी दीपाली यांच्यात नेहमीच भांडणे होत होती. सोमवार (दि. 9 रोजी रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास देवराम डुकरे दारूच्या नशेत घरी आला. व पत्नी दीपालीशी जोरजोराने भांडू लागला. 'मला दारू प्यायला पैसे दे' असा तगादा लावला व पत्नीला मारहाण करू लागला.

दररोज होणाऱ्या मारहाणीला त्रासलेल्या पत्नी दीपाली हिने पतीच्या डोक्यात लोखंडी रॉड घातला. रॉडचा घाव वर्मी बसल्याने व जोराचा रक्तश्रव सुरु झाल्याने तो जाग्यावरच कोसळला.

खाली निपचित पडलेला पती उठत का नाही? म्हणून त्याला हालवून उठवण्याचा प्रयत्न केला. परंतु तो उठत नसल्याने दीपाली डुकरे हिने गावातील नातेवाईकांना फोन करून कळविले.

पोलिसांना सकाळी सात वाजता खबर देण्यात आल्याने पोलीस घटनास्थळी तातडीने पोहचले व घटनेचा पंचनामा करून नारायणगावच्या ग्रामीण रुग्णालयात मृतदेह शवविच्छदणासाठी पाठविला. नंतर उशीरा औरंगपूर येथे देवराम डुकरे यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सणसवाडीतील जॉन डिअरला शिरुर वनविभागाची नोटीस

# झाडांची कत्तल करुन रस्त्याखाली गाडल्याचे पाहणीत उघड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील प्रसिद्ध जॉन डिअर कंपनीने काही झाडांची कत्तल करुन बारा देशी झाडे येथील रस्त्याखाली गाडल्याचे उघड झाले असल्याने शिरुर वनविभागाने जॉन डिअर कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.



सणसवाडी ता. शिरुर येथील प्रसिद्ध जॉन डिअर कंपनीने त्यांच्या हद्दीतील काही झाले तोडण्याची परवानगी वनविभागाकडे मागितली असता वनविभागाने जून २०२३ मध्ये पंचनामा करत येथील ५१० झाडे तोडण्याची आणि लिंब, फिकस, नारळ यांसारख्या २३६ देशी झाडांचे पुनर्रोपण करण्याबाबत परवानगी देत त्याबाबत बंधपत्र सादर करुन घेतले होते, मात्र कंपनीने काही झाडांचे पुनर्रोपण केले नसल्याचे तसेच काही झाडांवर पक्षांची घरटी, घरट्यामध्ये अंडी असल्याने या कंपनीवर वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात आणल्याने गुन्हा दाखल करण्याची मागणी वनविभागाकडे करण्यात आली असता वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांनी कर्मचाऱ्यांसह कंपनीमध्ये जाऊन पंचनामा करत पाहणी केली असता कंपनीने लिंबाच्या बारा झाडांची कत्तल करुन बारा देशी झाडे येथील रस्त्याखाली गाडल्याचे समोर आले असता कंपनीला वनगुन्हा दाखल का करु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याने शिरुर तालुक्यात खळबळ उडाली आहे. तर याबाबत बोलताना कंपनीला नोटीस बजावून कारण दाखवण्यासाठी हजर राहण्याची वेळ देण्यात आल्यानंतर कंपनीचे नवीनच व्यक्ती हजर झाले होते ज्यांना याबाबत काहीही माहिती नव्हती, त्यामुळे कंपनीला पुन्हा वेळ देऊन ज्यावेळी याबाबत परवानगी दिली त्यावेळी असलेल्या लोकांनी उपस्थित राहण्याबाबत सांगण्यात आले असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांनी सांगितले.

### बचपन बाचाओ समिती संचलित रस्त्यावरील व अनाथ मुलींसाठी

# वंचितांपर्यंत मार्तंड सेवा पुरवणारे एकमेव जेजुरी देवस्थान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** श्री मार्तंड देव संस्थान जेजुरी विश्वस्त न्यासाच्या वतीने पुणे महानगरपालिका अंतर्गत बचपन बाचाओ समिती संचलित रस्त्यावरील व अनाथ मुलींसाठी सुरू असलेल्या घरटं प्रकल्प करिता जेवणाचे मोठे स्टीलचे टेबल भेट म्हणून देण्यात आले. वंचितांसाठी मार्तंड सेवा उपलब्ध करून देणारे जेजुरी देवसंस्थान हे एकमेव संस्थान आहे असे उदगार शिक्षण महर्षी रतन माळी यांनी काढले.


मदतीचा हात! जेजुरी देवसंस्थान च्या वतीने अनाथ मुलींच्या संस्थेला जेवणाचे टेबल्स देताना

बचपन बचाओया या संस्थेमध्ये 50 अनाथ तसेच रस्त्यावर लिंबू व इतर वस्तू विकणाऱ्या मुली आहेत. या मुलींसाठी ही संस्था सेवाभावी वृत्ती मध्ये काम करत असते. संस्थेच्या संचालिका स्मिता वाघ यांनी जेजुरी देवसंस्थानचे डॉ. राजेंद्र खेडेकर यांना मुलींना खाली बसून जेवावं लागते आणि नंतर संपूर्ण साफसफाईसाठी वेळ जातो. त्यासाठी जेवणाचे टेबल्स मिळावेत अशी विनंती केली. यानुसार श्री मार्तंड देव संस्थांनच्या वतीने स्टेनलेस स्टीलचे जेवणाचे टेबल्स संस्थेला श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्टच्या अवयव दान आयकॉन गीतांजली चौधरी यांच्या हस्ते भेट देण्यात आले.

संस्थेच्या कार्याविषयी विषयी माहिती संचालिका स्मिता वाघ यांनी यावेळी दिली. या कार्यक्रम प्रसंगी शिक्षण महर्षी रतन माळी , श्री मार्तंड देवसंस्थान चे विश्वस्त डॉ राजेंद्र खेडेकर, एड. पांडुरंग थोरवे आदी उपस्थित होते.

#रा

## अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ
# सत्र न्यायालय स्थापनेची मागणी

### आमदार अतुल बेनके यांनी घेतली अजितदादा पवार यांची भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

जुन्नर

**नारायणगाव :** येथे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ सत्र न्यायालयाची स्थापना व्हावी अशी मागणी आमदार अतुल बेनके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. पुणे (सर्किट हाऊस) येथे आमदार बेनके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब यांची भेट घेतली. यावेळी जुन्नर तालुक्यातील काही विशेष कामांच्या बाबतीत त्यांनी चर्चा केली. यामध्ये जुन्नर येथे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ सत्र न्यायालयाची स्थापना व्हावी अशी



जुन्नर येथे शेषण कोर्ट सुरु करावे या बाबतचे निवेदन पालकमंत्री अजित पवार यांना देताना आ. अतुल बेनके व बार संघटनेचे पदाधिकारी. (छाया - सुरेश वाणी)

जुन्नर तालुका बार असोसिएशनची अनेक वर्षापासून मागणी आहे. या अनुषंगाने न्यायालय स्थापनेसाठी आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता झाली असून या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याबाबत अर्थमंत्र्यांशी चर्चा करण्यात आली. आ. बेनके यांच्याकडून याबाबतचे पत्र देखील उपमुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे. जुन्नर तालुक्याची भौगोलिक परस्थिती लक्षात घेता तसेच वाढत्या केसेसची संख्या लक्षात घेता व तालुक्यातील पक्षकारांचा विचार करता सदरचे न्यायालय हे स्थापन होणे गरजेचे आहे अशी मागणी जुन्नर बार असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी जुन्नर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत किसनराव भास्कर उपाध्यक्ष ॲड. समिर बाळासाहेब पुरवंत, उपाध्यक्ष ॲड. हेमंत यशवंत हाडवळे, सेक्रेटरी ॲड. आशिष नारायण वानखेडे, ग्रंथपाल ॲड. समकित सुनील नानावटी आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**स्थापना व्हावी...**

● जुन्नर तालुक्याची भौगोलिक परस्थिती लक्षात घेता तसेच वाढत्या केसेसची संख्या लक्षात घेता व तालुक्यातील पक्षकारांचा विचार करता सदरचे न्यायालय हे स्थापन होणे गरजेचे आहे अशी मागणी जुन्नर बार असोसिएशनच्या वतीने करण्यात आली

# युगेंद्र यांच्या स्वाभिमान यात्रेस सुरुवात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती शहरातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यालयात युवा नेते युगेंद्र पवार यांनी आज उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधला. तसेच त्यांच्या समस्या व अडचणी समजून घेतल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड. एस एन बापू जगताप, शहराध्यक्ष संदीप गुजर, तालुका महिला अध्यक्ष वानिताताई बनकर, बारामती महिला शहराध्यक्ष आरतीताई शेंडगे, युवक शहराध्यक्ष श्री. सत्यव्रत काळे, युवती तालुकाध्यक्ष प्रियंका शेंडकर ,युवती शहराध्यक्ष प्रियंका खारतोडे पुणे जिल्हा सोशल मीडिया अध्यक्ष पैगंबर शेख यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. दरम्यान सकाळी श्री क्षेत्र कन्हेरी येथील मारुतीचे दर्शन घेऊन स्वाभिमान यात्रेस सुरुवात केली असून आज माळेगाव व परिसरातील नागरिकांशी ते यात्रेच्या निमित्ताने संवाद साधणार आहेत

# परमपूज्य अण्णा महाराजांचे देहावसान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** शिवदत्त नामच्या माध्यमातून 200 कोटी नामजपाचा यज्ञकुंड पेटवत महाराष्ट्रासह दक्षिण भारतातील अनेक ठिकाणी दत्त संप्रदायाच्या साधनेची ज्योत प्रज्वलित करणारे नारायणपूरचे परमपूज्य अण्णा महाराज यांचे देहावसान झाले. त्यामुळे अखिल भारतीय दत्त संप्रदायासह त्यांच्या शिष्य वर्गात देखील शोक व्यक्त केला जात आहे.

दिनांक 9 रोजी सायंकाळी अण्णा महाराज यांनी आपला देह सोडला. काल दिनांक 10 रोजी सकाळी आठ ते दुपारी दोन वाजेपर्यंत नारायण पुरातील मंदिरात त्यांचे पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी हजारो शिष्यांनी त्यांचे अंतिम दर्शन घेतले.

दुपारी चार वाजता अग्निसंस्कारासाठी त्यांची अखेरची यात्रा सुरू झाली . साधनेकुंडाजवळ अग्निसंस्कार झाले.

अण्णा महाराज हे दत्त सांप्रदायिक साधक म्हणून गेल्या चार दशकांमध्ये नावारूपास आले होते. दत्त महाराजांची सगुण भक्तीची साधना त्यांनी भारतभर दिली. ज्याप्रमाणे चारोधाम आहेत त्याप्रमाणे दत्त संप्रदायाचे चारधाम स्थापन करण्याचा त्यांचा संकल्प होता. तो त्यांनी महतप्रयासाने तडीस नेला. उत्तर प्रदेश पासून कन्याकुमारी पर्यंत अनेक ठिकाणी त्यांनी दत्त महाराजांच्या मंदिरांची स्थापना केली. माणसांमधील दत्ततत्त्व म्हणजे गुरुतत्त्व जागृत ठेवून नैतिक आचरणामध्येच सगुण पूजा बांधावी हा त्यांचा जीवनाचा संदेश होता.

दत्त महाराजांच्या मूर्ती पूजेच्या माध्यमातून त्यांनी हा संप्रदाय जोडला परंतु खऱ्या अर्थाने अंतकरणातील दत्तत्व जागृत ठेवण्याची निर्गुण उपासना त्यांनी या माध्यमातून पुढे चालवली.

**भावपूर्ण श्रद्धांजली.**

● पंढरी संचार परिवारावर परमपूज्य अण्णा महाराजांचे विशेष आशीर्वाद होते. बारा वर्षांपूर्वी पंढरी संचारच्या दीपावली विशेषांकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले होते . त्यांची पहिली विस्तृत चरित्रात्मक मुलाखत पंढरी संचारच्या दीपावली विशेषांकामध्ये प्रकाशित करण्यात आली होती. ज्या ज्या वेळी अण्णा महाराज पंढरपूरला भेट देत असत त्यावेळी ते पंढरी संचारला सदिच्छा भेट देऊन आशीर्वाद देत होते. गेल्या काही वर्षांपासून त्यांची तब्येत खालावली होती. परमपूज्य अण्णा महाराज यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, पंढरी संचारच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.



संपूर्ण भारतभर 200 कोटी शिवतत्त्व नामजप यज्ञकुंड त्यांनी प्रज्वलित केला होता. भारतातील जवळपास सर्वच राज्यभरामध्ये त्यांचे शिष्य होते.

पुणे जिल्ह्यातील नारायणपूर हे त्यांचे मूळ स्थान त्यांनी नावारूपास आणले तेथे स्थापन केलेले दत्त मंदिराला दरवर्षी लाखो भाविक भेट देत आहेत.

## तालुक्यातील दत्त भक्तांवर शोककळा !



**अंतयात्रा:** मोठ्या प्रमाणावर दत्तभक्त व दत्त सेवेकरी यांच्या माध्यमातून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले यात मोफत विवाह सोहळे साजरे केले जात होते. दर गुरुवारी मोफत अन्नछत्र चालू होते नारायण महाराज यांच्या निधनामुळे अवघ्या पुरंदर तालुक्यातील दत्त भक्तांवर शोककळा पसरली आहे

## » Selected



भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सुरज पाचंगे यांना आमदार पंकजा मुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

### सूरज बाबुराव पाचंगे भाजपा युवा मोर्चाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी

**कारेगाव:** ढोकसांगवी,ता.शिरुर येथील युवा उद्योजक सुरज बाबुराव पाचंगे यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. आमदार पंकजा मुंडे यांच्या हस्ते पाचंगे यांना नुकतेच या नियुक्तीचे पत्र देण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, प्रदीप कंद,युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संदीप सातव,प्रदीप सोनवणे,प्रशांत घावटे,संदीप पाचंगे,वैभव सोनवणे,बाळकृष्ण जाधव आदि उपस्थित होते. पक्ष संघटना वाढीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असून, पक्षाचे विचार व ध्येयधोरणे तळागाळातील नागरिकांपर्यंत पोचविणार असल्याचे नूतन उपाध्यक्ष पाचंगे यांनी निवडीनंतर बोलताना सांगितले.-

## गौराई आली... मोत्यांच्या पाऊली...




**ज्येष्ठा गौरी आवाहन:** राज्यात सर्वत्र गौरी गणपती उत्सव सुरु असून मंगळवारी जेजुरी कोथळे ग्रामीण शेतकऱ्यांच्या वाड्यातून ही गौराई महालक्ष्मी चे स्वागत करतानाचे दृश्य

फोटो : विजयकुमार हरिश्चंद्रे




● यात्रा काळामध्ये मंदिर व परिसरात आकर्षक फुलांची सजावट व नेत्रदीपक विद्युत रोषणाई भाविकांसह पुणे नगर महामार्गावरून येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत होती

## भाद्रपद गणेशोत्सवाची काल्याच्या व पाऊल घडीच्या किर्तनाने सांगता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** भाद्रपद गणेशोत्सव काळात अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री महागणपतीच्या मुक्तद्वार दर्शनाचा लाखो भाविकांनी लाभ घेतला असून ह.भ.प. मोरेश्वर बुवा जोशी ( चऱ्होलीकर) यांच्या काल्याच्या व पाऊल घडीच्या किर्तनाने व मानकरी बिदागी वाटप करून भाद्रपद गणेशोत्सवाची मोठ्या भक्तिमय वातावरणात सांगता झाली असल्याचे देवस्थान ट्रस्ट च्या अध्यक्षा . स्वाती पाचुंदकर पाटील यांनी सांगितले. या भाद्रपद गणेशोत्सवासाठी देवस्थान ट्रस्ट च्या अध्यक्षा .स्वाती पाचुंदकर पाटील, मुख्यविश्वस्त ओमकार देव, उपाध्यक्ष संदीप दौंडकर, सचिव तुषार पाचुंदकर पाटील, खजिनदार विजय देव, पुजारी प्रसाद कुलकर्णी व मकरंद कुलकर्णी ,व्यवस्थापक बाळासाहेब गोऱ्हे, पांडुरंग चोरगे, हिशोबणीस संतोष रणपिसे व देवस्थान कर्मचारी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच प्रथा परंपरेने नुसार श्रींना अभिषेक, सहस्रावर्तने, चार द्वारयात्रा, सनई वादन, सांप्रदायी आरत्या, भजनी मंडळाचा कार्यक्रम, भाविकांची दंडवते इत्यादी भाद्रपद गणेशोत्सव काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट यांनी आयोजन केलेले होते. भाविकांसाठी लागणाऱ्या आवश्यक सुविधा त्यामध्ये पिण्याचे पाणी, मोफत महाप्रसाद, सुसज्ज दर्शन रांग, प्राथमिक आरोग्य केंद्र रांजणगाव गणपती यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी इत्यादी सुविधा तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रांजणगाव पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्यूची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबंधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार पोपट भिवा घोलप रा.कारी ता. भोर जि.पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म मृत्यू नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांच बडील के. भिवा कोंडीबा घोलप यांचा मृत्यु मौजे कारी ता. भोर जि. पुणे येथे दि. १३/११/१९८८ रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नौद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म-मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथया मागणी तशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल,

आज दि. २२/०८/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/मृत्यू/एस. आर/१३८/२०२४
दिनांक :-२२/०८/२०२४
ठिकाण :- भोर

सही/-
**डॉ. विकास खरीत**
डॉ. उपविभागीय अधिकारी तथा
दंडाधिकारी भोर उपविभाग भोर

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः पुणे शहर व तालुका मुळशी, गांव हिंजवडी येथील लोकांस आणि **आनंदराव मारुती दांगडेपाटील** यांना या सावधानतेच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. पुणे पैकी, ता. मुळशी पैकी गांव हिंजवडी येथील गट नं. ६/६/२ याचे एकूण क्षेत्र ० हे. ८१ आर. इतके असून यापैकी १) राजश्री रविदास वाघमारे, २) पुनम रविदास वाघमारे, ३) भाग्यश्री सतिश वाघमारे, ४) राहुल रविदास वाघमारे व ५) संजीवनी मुरलीधर शिंदे यांचे हिश्यास वारसा हक्काने आलेली जमीन याचे **क्षेत्र ० हे. १८ आर इतके आहे**. त्याप्रमाणे ७/१२ च्या रेकॉर्ड ऑफ राईट्सला आमचे अशिलांच्या नावाची नोंद झालेली आहे. **यांसी चतुः सिमा** पूर्वेस सर्व्हे नं. ६ चा हिस्सा, दक्षिणेसः सर्व्हे नं. ७ श्री. ज्ञानोबा परशुराव साखरे यांची जमीन व विहिर, पश्चिमेस : सर्व्हे नं. ४/२अ/१ श्री. दत्तु दगडु पारखी यांची जमीन, उत्तरेसः सर्व्हे नं. ६/६अ श्री. मारुती धोंडिबा साखरे यांची जमीन, असे आहे. सदरील जमीनीबाबत आमचे अशिल यांनी आनंदराव मारुती दांगडेपाटील यांना दि. २९-०३-२०२२ रोजी नोटरी अ.क्र. २३६१ ने ॲड. राजगोपाल एस. विडप यांचेसमोर जनरल पॉवर ऑफ अॅटर्नी लिहून व नोंदवून दिलेले आहे. मात्र दि. २९-०३-२०२२ पासून आजतागायत आनंदराव मारुती दांगडेपाटील यांनी सदर कुलमुखत्यारपत्रात नेमुन दिलेली कामे केलेली नाहीत. **तसेच सदर जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी ने मिळालेल्या अखत्यारानुसार आनंदराव मारुती दांगडेपाटील यांनी कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस बेकायदेशीररित्या व आमचे अशिलांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता इसारा** व इतर तत्सम दस्तऐवज लिहून व नोंदवून दिलेले असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आनंदराव मारुती दांगडेपाटील यांचेवर आहे व राहील व त्यास आमचे अशिल हे जबाबदार राहणार नाहीत. त्याप्रमाणे **तसे अनुषंगिक दस्तऐवज व दि. २९-०३-२०२२ रोजी नोटरी अ.क्र. २३६१ ने ॲड. राजगोपाल एस. विडप यांचेसमोर लिहून दिलेल्या नोटरीकृत जनरल पॉवर ऑफ ॲटर्नीमधील सर्व अधिकार या सावधानतेच्या जाहिर नोटीसीने रद्दबातल करण्यात आलेले असून यापुढे** आनंदराव मारुती दांगडेपाटील यांना वर नमुद जमीनीबाबत कोणत्याही प्रकारचे नोटरीकृत दस्तऐवज नोंदविता येणार नाहीत. जर यापुढे आनंदराव मारुती दांगडेपाटील यांनी असे जनरल पॉवर ऑफ अॅटर्नी व्दारे कोणतेही व्यवहार केल्यास ते आमचे अशिलांवर व वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी. आमचे अशिलांनी जहिर अब्बास अब्दुल अजीज शेख यांना रजिस्टर कुलमुखत्यारपत्र लिहून देण्याचे ठरविले आहे.

तरी सदर सावधानतेच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या मिळकती संदर्भात जो आनंदराव मारुती दांगडेपाटील यांचेशी कोणीही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, लिज, बक्षिस, टाच, करार मदार, व इतर नोंटरीकृत दस्तऐवज म्हणजे इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, कब्जापावती, कब्जा करार असे खरेदी विक्रीचे व्यवहार करु नये व सदर मिळकतीबाबत यापुर्वी **नोटरीकृत जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी अन्वये लिहून दिलेले दस्तऐवज** ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **३ (तीन) दिवसाचे** आत सदर मिळकतीत असलेले हक्क दर्शविणारे कागदपत्रे पुराव्यासह खालील नमुद पत्यावर प्रत्यक्ष येऊन शहानिशा करुन घ्यावी. यानंतर सुध्दा जर तसे व्यवहार केल्यास सदरचे व्यवहार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही व तो व्यवहार बेकायदेशीर ठरेल याची नोंद घ्यावी. जर तसे कोणीही व्यवहार केल्यास सदर व्यवहार न्यायप्रविष्ठ बाब होईल याची जाणीव आमचे अशिल या सावधानतेच्या जाहिर नोटीसीव्दारे करुन देत आहेत व दिवाणी व फौजदारी कारवाई करण्याचा अधिकार आमचे अशिलांस आहे व राहील. त्यामुळे कोणाचीही कसलीही फसगत होऊ नये म्हणून सदर सावधानतेची जाहिर नोटीस दिली. ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली ता.०६/०९/२०२४.

**टिप : ॲड. वकीलांचे नांव बोल्ड मध्ये घेणे**

**अशिल**

**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. सलाम मोहम्मदसाब बगलुर**
B.A., LL.B., M.S.W. D.M.C.J. **ॲडव्होकेट**
ऑफीस पत्ता. गाळा नं. १०, पहिला मजला, दारुस्सलाम अपार्टमेंट,
सिध्देश्वर पेठ, सोलापूर

**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि.,**

**प्रधान कार्यालय :** ४१६३ (ब), प्रशासकीय भवन, नवीपेठ, पंढरपूर ४१३३०४ जि. सोलापूर. **फोन.: (०२१८६) २२८४८४, २२३४८४. इमेल: recovery@pandharpurbank.com**

**अचल मालमत्तेचा फेर-जाहीर-लिलावाद्वारे विक्रीची सूचना**

तमाम नागरिकांना कळविण्यात येते कि, आमचे बँकेने महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व अधिनियम चे कलम १५६ व नियम १०७ (११)ई अन्वये खालील तारण व जप्त स्थावर मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री करण्याचे आहे. ह्या जाहीर नोटीसीद्वारे आपणांस कळविण्यात येते कि, मी, वसुली अधिकारी दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर खालील प्रमाणे निर्दिष्ट केलेल्या तारण व मा. जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांनी प्रत्यक्ष ताबा घेवून बँकेस ताबा सुपूर्द केल्याप्रमाणे कर्जदार यांनी बँकेची कर्ज रक्कम मुदतीत भरणा केलेली नसल्यामुळे त्यांच्या मालकीच्या खालील नमूद स्थावर मालमत्तेचे थकीत रकमेच्या वसुलीसाठी जाहीर लिलावाने विक्री करण्यात येत आहे. लिलावासाठी मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर यांचे दि. १०/०५/२०२४ रोजीच्या निश्चित केलेल्या वाजवी किमतीच्या आदेशानुसार नुसार खालील मालमत्तेचे **जशी आहे तशी व जेथे आहे तेथे** ह्या तत्वां अनुसार जाहीर लिलावाने विक्री करण्याचे ठरले आहे. त्यानुसार दि. २०/०६/२०२४ रोजी प्रथम लिलावास कर्जाची थकीत रक्कम होत नसल्यामुळे लिलाव रद्द करण्यात आला आणि खालील वर्णनाची मिळकतीचा फेर लिलाव करण्याचे ठरले आहे.

| विक्रीस ठेवण्यात आलेल्या अचल मालमत्तेचे सविस्तर वर्णन | | राखीव किमंत(चौ.मी.)/अनामत रक्कम |
|---|---|---|
| **कर्जदार : १) मोहन कृष्णाजी टापरे २) अरुणा मोहन टापरे ३) पुष्कर मोहन टापरे ४) तन्वी पुष्कर टापरे ५) एम डी सी लाईफ स्टाईल इंडिया प्रा. लि. कर्जदार व तारणदार मोहन कृष्णाजी टापरे व अरुणा मोहन टापरे व पुष्कर मोहन टापरे व तन्वी पुष्कर टापरे, रा. सदनिका नं ६ पूर्ती अपार्टमेंट, शांतीशीला लेन, लॉ कॉलेज रोड, पुणे ४११००४** यांची मालमत्ता मौजे एरंडवणे पुणे येथील सिटीएस नं. ५१बी/१२७/४० फायनल प्लॉट नं ७५/७६ब (सब प्लॉट नं ४०) शांतीशीला को ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड मधील धनलक्ष्मी अपार्टमेंट पहिल्या मजल्यावरील सदनिका नं ४ यासी क्षेत्र १५४.०० चौ.मी. (कारपेट) दुसऱ्या मजल्यावरील क्षेत्र ५५.४५ चौ.मी. (कारपेट) लगतचे टेरेस क्षेत्र १२.६५ चौ.मी. (पहिल्या मजल्यावरील क्षेत्र ८.८५ चौ मी व दुसऱ्या मजल्यावरील ३.८ चौ मी ) पार्किंग नं १ व ५ क्षेत्र २७.८६ चौ मी. एकूण क्षेत्रफळ २५१.३४ चौ.मी. म्हणजेच २७०५.४ चौ.फु. क्षेत्र चतु:सीमा पूर्वेस - प्लॉट नं ४१, पश्चिमेस - प्लॉट नं ३९, दक्षिणेस - रोड, उत्तरेस - फिल्म आणि टेलीव्हिजन इन्स्टिट्यूट हि मिळकत. | | रु. ३,९५,९०,०००/- (१०% अनामत रक्कम रु. ३९,५९,०००/-) |
| मालमत्ता पाहणी दिनांक | दि : ११/१०/२०२४ | लिलावाची प्रक्रिया : लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी पहावयास मिळतील. विक्रीस काढण्यात आलेली मालमत्तेची मालकी, परिस्थिती किंवा इतर कोणत्याही वस्तुस्थिती साठी बँक जबाबदार राहणार नाही. |
| अनामत रक्कम दाखल करण्याची अंतिम तारीख | दि : १५/१०/२०२४ | |
| लिलावाची तारीख, वेळ | दि : १५/१०/२०२४ वेळ : दुपारी ०२.वा | |
| **१०% अनामत रक्कम :** RTGS द्वारे आमचे बँकेच्या नावे : दि.पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर A/c No. 500150064000000 IFSC code : PUCB0000015 **लिलावाचे ठिकाण :** १२७/१अ, पुण्याई सभागृह मागे, मोरे विद्यालय चौक, पौड रोड, कोथरूड, पुणे ४११०३८ | | |

**स्थळ : पुणे**
**दिनांक : ११/०९/२०२४**

**वसुली अधिकारी**
**दि.पंढरपूर अर्बन को ऑप बँक लि.**

## एचएएलसोबत २६ हजार कोटींचा करार

# सुखोई विमानांची निर्मिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** संरक्षण मंत्रालयाने हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडसोबत (एचएएल) सुखोई लढाऊ विमानांसाठी २६ हजार कोटी रुपयांचा करार केला आहे. आत्मनिर्भर भारत धोरणांतर्गत मोठ्या प्रमाणात चालना देण्याकरिता, संरक्षण मंत्रालयाने सुखोई ३० एमकेआय लढाऊ विमानांच्या २४० एएल-३१ एफपी एअरो इंजिनसाठी एचएएलसोबत २६ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या करारावर स्वाक्षरी केली. संरक्षण सचिव गिरीधर अरमाने आणि हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल व्हीआर चौधरी यांच्या उपस्थितीत राजधानी दिल्लीत संरक्षण मंत्रालय आणि एचएएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या करारावर स्वाक्षरी झाली.

एचएएलच्या कोरापुट विभागाद्वारे ही एअरो इंजिन तयार केली जातील आणि देशाच्या संरक्षण सज्जतेसाठी सुखोई विमान भारतीय हवाई दलाची गरज पूर्ण करेल, अशी अपेक्षा आहे. करारानुसार, एचएएल दरवर्षी ३० इंजिन्सचा पुरवठा करेल. सर्व २४० इंजिनांचा पुरवठा पुढील आठ वर्षांच्या कालावधीत पूर्ण होईल.

निर्मिती दरम्यान, एमएसएमई आणि सार्वजनिक आणि खाजगी उद्योगांचा समावेश असलेल्या देशाच्या संरक्षण उत्पादन परिसंस्थेची मदत घेण्याचा एचएएलचा विचार आहे. वितरण कार्यक्रमाच्या समाप्तीपर्यंत, एचएएल स्वदेशी सामग्री ६३ टक्क्यांपर्यंत वाढवून सरासरी ५४ टक्क्यांपेक्षा जास्त उद्दिष्ट साध्य करेल. यामुळे एअरो -इंजिनांच्या दुरुस्ती आणि देखभाल कामांमधील स्वदेशी सामग्री वाढवण्यात देखील मदत होईल.

कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीने २ सप्टेंबर रोजी या इंजिनांच्या खरेदीला मंजुरी दिली होती. पुढील आठ वर्षांच्या कालावधीत सर्व २४० इंजिनांचा पुरवठा पूर्ण केला जाईल. सुखोई-३० हे भारतीय वायुसेनेच्या सर्वात शक्तिशाली आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण विमानांपैकी एक आहे. भारतीय हवाई दलाकडे सध्या २५९ सुखोई-३० एमकेआय लढाऊ विमाने आहेत. ही विमाने देशाची संरक्षण सज्जता वाढवत आहेत. म्हणूनच ती महत्त्वाची आहेत.

आमच्या मेक इन इंडिया मोहिमेतील हा महत्त्वपूर्ण टप्पा असून, भारतातील एअरो इंजिन निर्मितीला बळकटी मिळेल आणि आत्मनिर्भरतेच्या केंद्र सरकारच्या उद्दिष्टाला गती मिळेल, असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## इस्रायलला भारताची मदत सुरू राहणार

**आंतरराष्ट्रीय**

**गाझासोबतच्या युद्धासाठी** इस्रायलला शस्त्रे आणि लष्करी मदत पुरवण्यापासून भारत आणि भारतीय कंपन्यांना रोखण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रचूड, न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर याचिका दाखल करण्यात आली होती. इस्रायलला लष्करी मदत करण्यापासून रोखण्यात यावे आणि अशा भारतीय कंपन्यांचे परवाने रद्द करण्याचे निर्देश देण्याची विनंती याचिकेत करण्यात आली होती. अशोककुमार शर्मा व इतरांनी प्रशांत भूषण यांच्यातर्फे ही याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली असून, इस्रायलला शस्त्रास्त्रांच्या निर्यातीत गुंतलेल्या भारतीय कंपन्यांनी निर्यात रोखल्यास कराराच्या बंधनांच्या उल्लंघनासाठी खटला भरला जाऊ शकतो, असे न्यायालयाने म्हटले. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालया देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात येऊ शकत नाही, असे म्हटले आहे. हे प्रकरण देशाच्या परराष्ट्र धोरणाची संबंधित असून त्याचे अधिकारक्षेत्र हे केंद्र सरकारचे आहे. त्याचप्रमाणे याचिकाकर्त्यांच्या विनंतीवर सुनावणी करण्यासाठी इस्रायलवरील आरोपांची चौकशी करण्याची गरज आहे. मात्र, इस्रायल हे एक सार्वभौम राष्ट्र असून ते भारतीय न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रात येत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.



## » Selected

### निर्देशांक वधारला

**मुंबई :** मंगळवारी निफ्टी २५,००० च्या वर गेला आणि भारतीय शेअर निर्देशांक मजबूत बंद झाले. निर्देशांक ३६१.७५ अंकांनी वधारून ८१,९२१.२९ वर, तर निफ्टी १०४.७० अंकांनी वधारून २५,०४१.१० वर बंद झाला. सुमारे २,४७३ समभाग वधारले, १.३०० घसरले आणि ९८ स्थिर राहिले. निफ्टीवर डिव्हिस लॅब्स, एलटीआय इंडिया, भारती एअरटेल, विप्रो आणि एचसीएल टेक यांचे समभाग वधारले, तर एचडीएफसी लाइफ, एसबीआय लाइफ इन्शुरन्स, बजाज फिनसर्व्ह, बजाज फायनान्स आणि श्रीराम फायनान्स यांचे समभाग घसरले. तेल आणि वायू वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या रंगात बंद झाले असून टेलिकॉम आणि मीडिया प्रत्येकी २ टक्क्यांनी वधारले, तर कॅपिटल गुड्स, आयटी, हेल्थकेअर, पॉवर प्रत्येकी १ टक्क्यांनी वधारले. बीएसईमिडकॅप निर्देशांक ०.५ टक्के आणि स्मॉलकॅप निर्देशांक १.५ टक्क्यांनी वधारला.

### आयफोन १६ ग्राहकांच्या भेटीला

**नवी दिल्ली :** ॲपलने आयफोन १६ सादर केला असून, हा स्मार्टफोन ए-१८ प्रोसेसरसह येतो. आयफोन १६ आणि आणि १६ प्लस मध्ये




एकसारखेच फीचर्स मिळणार आहेत. दोन्ही स्मार्टफोनमध्ये केवळ बॅटरी आणि डिस्प्लेच्या साईजमध्ये फरक आहे. यात कॅमेऱ्यासाठी एक विशेष बटन देण्यात आले असून, त्याच्या सहाय्याने कॅमेरा वापरता येईल. त्याचवेळी ॲपल इंटेलिजेन्सचा सपोर्ट देण्यात आला आहे. चांगली बॅटरी आणि वेगवान प्रोसेसर दिल्याचा दावा, कंपनीने केला आहे. तसेच यात ॲप इंटेलिजन्स फीचर मिळेल. यासोबतच व्हिज्युअल इंटेलिजेशन फीचरही देण्यात आले आहे.

## युक्रेनविरोधात होतो ड्रोनचा पुरवठा

# रशियाची इराणशी जवळीक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मास्को :** इस्रायल आणि इराणमधील संघर्ष शिगेला पोहोचताना असताना, रशियाची इराणशी जवळीक वाढत चालली आहे. इराण हा रशियाचा महत्त्वाचा भागीदार आहे, असे वक्तव्य रशियाच्या प्रवक्त्याने केले. युक्रेन युद्धासाठी तेहरान आपल्याकडे बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे पाठवत असल्याच्या वृत्ताचेही रशियाने खंडन केलेले नाही.

इराण, रशियाला क्षेपणास्त्रांचा पुरवठा करत असल्याची विश्वसनीय माहिती आपल्याकडे असल्याचे युरोपियन महासंघाने म्हटले होते. फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर, रशिया आणि इराण यांच्यातील जवळीक वाढली आहे. रशिया-युक्रेन युद्धासाठी इराणने शहीद ड्रोनही पुरवले आहेत.



इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ईसच्या वरिष्ठ कमांडरने मात्र हे वृत्त फेटाळून लावले आहे. केंद्रीय मुख्यालयाचे डेप्युटी कमांडर ब्रिगेडियर फजलुल्लाह नोझारी यांनी अल जझीराला सांगितले की, रशियाला कोणतेही क्षेपणास्त्र पाठवण्यात आले नाही आणि हा दावा एक प्रकारचे मानसिक युद्ध आहे. इराण, युक्रेन-रशिया या संघर्षात कोणत्याही बाजूची साथ देत नाहीत. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते नासिर कानानी यांनी सांगितले की, इराणवर असा आरोप करणारे ते आहेत, जे युद्धाच्या एका बाजूला सर्वात मोठे शस्त्रे पुरवत आहेत. इराणने युक्रेनमधील युद्धात सहभागी नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

इराण आमचा महत्त्वाचा भागीदार असून, आम्ही आमचे व्यापार आणि आर्थिक संबंध विकसित करत आहोत. पाश्चिमात्य निर्बंधांमुळे रशियाला युक्रेनशी लढण्यासाठी शस्त्रपुरवठ्यासाठी इराण आणि उत्तर कोरियाकडे वळावे लागले, असेही रशियाने म्हटले आहे.

## हरियाणा मंत्रिमंडळाची बैठक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरयाणा मंत्रिमंडळाने बुधवारी बैठक बोलावली असून, यात हरियाणा विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस केली जाऊ शकते. मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सभागृह बरखास्त करण्याची शिफारस केली जाण्याची शक्यता आहे. दर सहा महिन्यांनी विधानसभेचे अधिवेशन घेणे आवश्यक असून, यंदा निवडणुकांमुळे ते होऊ शकत नाही. हरियाणा विधानसभेचे शेवटचे अधिवेशन १३ मार्च रोजी बोलावण्यात आले होते. त्यामुळे पुढील अधिवेशन १२ सप्टेंबरपर्यंत होणार होते.

हरियाणा विधानसभेसाठी ५ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांनी मंगळवारी लाडवा विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

# ममता बॅनर्जी यांच्यावर जोरदार टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** कोलकात्यातील आरजी कर रुग्णालयात निवासी डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या करण्यात आल्यापासून ममता बॅनर्जी यांचे सरकार वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. पश्चिम बंगालमधील डॉक्टरांनीही तृणमूल सरकारविरोधात आघाडी उघडली आहे. दरम्यान, ममता बॅनर्जी यांनी तेथील जनतेला दुर्गापूजेत सहभागी होण्याचे जे आवाहन केले, त्यावरही टीका होत आहे.

माध्यमांशी बोलताना ममता बॅनर्जी म्हणाल्या होत्या, या घटनेला एक महिना झाला असून, दुर्गापूजेत सहभागी व्हा, असे आवाहन त्यांनी केले. तसेत सीबीआयला लवकरात लवकर न्याय मिळवून देण्याची मागणी आपण केली आहे, असेही त्यांनी म्हटले. तुम्ही रोज रात्री रस्त्यावर उतरून आंदोलन केले तर अनेकांना त्रास होईल, असेही त्या म्हणाल्या.

ममता बॅनर्जी म्हणाल्या की, याचा तपास सीबीआयकडे असून, ज्या महिलेवर अत्याचार झाला, त्या महिलेला न्याय मिळाला पाहिजे. फास्ट ट्रॅक कोर्टाकडून त्याला लवकरात लवकर न्याय देण्यात यावा. बंगालची जगभरात बदनामी होत आहे, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले.

मृत डॉक्टरच्या पालकांनीही असे म्हटले आहे की, आमच्या सणांचे काय? आम्ही आमची मुलगी गमावली आहे. चला आमच्या मुलीला परत आणूया. त्यांच्या कुटुंबात असे झाले असते, तर हे सांगण्याचे धाडस त्यांनी केले असते का? आम्ही आमच्या मुलीसोबत दुर्गापूजा साजरी केली. पण आता आम्ही कोणताही सण साजरा करणार नाही. त्यांचे हे विधान असंवेदनशील आहे, असा आरोप त्यांनी केला.

भाजपचे शुभेंदु अधिकारी म्हणाले की, ममता बॅनर्जी जनतेला कठपुतळी समजतात. दुर्गापूजेला सुरुवात होणार आहे. मात्र, राक्षस अजूनही इकडेतिकडे आहेत. संयम बाळगा, आईची शक्ती जागृत होणार आहे आणि यामुळे बंगालमध्ये बदल घडून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## बांगलादेशाच्या हालचालीमध्ये वाढ

# हसीनांचे प्रत्यार्पण?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणासाठी बांगलादेशाने हालचाली वाढवल्या आहेत. तेथील मोहम्मद युनूस यांच्या हंगामी सरकारने जुलैमधील नरसंहारासाठी शेख हसीना यांच्यावर दाखल केलेल्या खटल्याचे थेट प्रक्षेपण करण्याचा निर्णय घेतला आहे.

बांगलादेशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील आणि बांगलादेशाच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाचे नवनियुक्त मुख्य अभियोजक ताजुल इस्लाम यांनी शेख हसीना यांच्यासह हत्याकांडात सहभागी आरोपींच्या खटल्याच्या प्रगतीबाबत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

माध्यमातील वृत्तानुसार, ताजुल इस्लाम यांनी सांगितले की, देशातील सर्व उपायुक्त, पोलिस अधीक्षक, सिव्हिल सर्जन यांना पत्र पाठवून या हत्याकांडाची माहिती मागितली आहे. न्यायालयीन कामकाज पूर्ण पारदर्शकतेने पूर्ण केले जाईल आणि जे आवश्यक असेल ते केले जाईल.

जुलै मध्ये बांगलादेश हिंसाचारात एक हजारांहून अधिकांना आपला जीव गमवावा लागला. शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्यानंतर, मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले. बांगलादेश सरकारच्या आदेशानुसार, शेख हसीना यांच्याविरोधात नरसंहार, खून, अपहरण अशा कलमांसह १०० हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## हरियाणासाठी आम आदमीची दुसरी यादी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी आम आदमी पार्टी आपल्या उमेदवारांची दुसरी यादी मंगळवारी जाहीर केली. आम आदमी पार्टी आणि काँग्रेस यांच्यातील जागावाटपाची चर्चा यशस्वी न झाल्यामुळे, आम आदमीने २० उमेदवारांची पहिली यादी यापूर्वीच जाहीर केली आहे. 'आप' ९० जागांवर पूर्ण ताकदीनिशी लढणार असून, काँग्रेससाठी आम्ही वाट पाहिली. हरियाणात बेरोजगारी सर्वाधिक असून, येथील जनतेला बदल हवा आहे, असा दावा आम आदमीने केला आहे.

## रखवालदारी

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**रामेन्सकोये :** रशिया-युक्रेन संघर्षाच्या दरम्यान युक्रेनियन ड्रोन हल्ल्यानंतर, मॉस्कोतील रामेन्सकोये येथे, एका बहुमजली निवासी इमारतीजवळ सुरक्षा यंत्रणांनी पहारा कायम ठेवला.

# शिमला येथे मुस्लिम लोकसंख्येत वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हिमाचल प्रदेशातील शिमला येथे कट्टरपंथींच्या लोकसंख्येत वाढ झाली आहे. बेकायदेशीर वाढत्या बांधकामांवर कारवाई करण्याची मागणी तेथील जनतेने केली आहे. अशा अवैध बांधकामामुळे हिमाचल प्रदेशातील मशिदी आणि मदरशांच्या संख्येतही वाढ झाली आहे. अनेक ठिकाणी बेकायदेशीर बांधकाम असून, यामध्ये वक्फ बोर्डाचीही सहभाग असल्याचे म्हटले जाते. गेल्या ३-४ वर्षांमध्ये राज्यातील लोकसंख्या बदलण्याचे प्रयत्न वाढले असल्याची चर्चा आहे.

शिमला येथे बेकायदेशीर बांधलेली संजौली मशीद पाडण्याची मागणी सध्या जोर धरून आहे. याविरोधात आता हिमाचल प्रदेशातील हिंदू रस्त्यावर उतरले असून, राज्यातील अतिक्रमण केलेल्या बांधकामांवर कारवाई करण्याची मागणी करत आहेत. तसेच येथील स्थानिक लोकसंख्येत वाढ झाल्याने घुसखोरी होत असल्याचा अंदाज स्थानिकांनाही आहे.याठिकाणी अवैध घुसखोरी असल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे.

लोकसंख्या वाढीमुळे मशीद आणि मदरशांच्या लोकसंख्येत वाढ होऊ लागली आहे. अनेक ठिकाणी बेकायदेशीर बांधकाम झाली. अशाचप्रकारे हिमाचल प्रदेशही हा एक हिंदूबहुसंख्य असलेले राज्य आहे. येथील ९० टक्के लोकसंख्या हिंदू धार्मिक अनुयायी आहेत.

हिमाचल प्रदेशात जनगणनेनुसार पाहिल्यास २००१ ते २०११ वर्षादरम्यान, राज्यातील कट्टरपंथी लोकसंख्या २५ टक्के दराने वाढली आहे.

# शुभेच्छा संदेश हटवला...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मुस्लिम मुख्याध्यापकाने शाळेच्या सोशल मीडियावरील व्हॉट्सॲप ग्रुपवर गणेश चतुर्थीच्या शुभेच्छा दिल्या आणि तो संदेश पुन्हा हटवला. यामुळे कोटा जिल्ह्यात तणाव निर्माण झाला. हिंदू शिक्षकांनी आणि पालकांनी मुख्याध्यापकाने केलेल्या कृतीविरोधात जाहीर निषेध केला. यावेळी उपस्थितांनी निदर्शन केले. तसेच याप्रकरणात त्याला अटक करण्यात आली. ही घटना ७ सप्टेंबर रोजी शुक्रवारी घडली होती.

मोहम्मद शफीक असे त्याचे नाव असून, त्याच्या कृत्याने सामाजिक सलोखा बिघडल्याने हा धक्कादायक प्रकार घडला, असा आरोप केला जात आहे. यामुळे त्याला अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली. हे प्रकरण कोटा जिल्ह्यातील लातुरी येथे घडले. पालकांनी गणेश चतुर्थीच्या शुभेच्छा दिल्या होत्या. त्यावेळी हा प्रकार घडला.

## भारतीय बनावटीचे तेजस विमान चालवले

# तिन्ही दलांचे उपप्रमुख एकत्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताच्या तिन्ही सैन्यदलांचे उपप्रमुख पहिल्यांदाच एकत्र आले. जोधपूरमध्ये झालेल्या हवाई सरावादरम्यान तिन्ही सैन्यदलांच्या उपप्रमुखांनी भारतीय बनावटीचे तेजस या विमानात बसण्याचा आनंद घेतला. हे दुर्मिळ दृश्य संपूर्ण जगाने पाहिले.

हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल ए.पी. सिंग, उपलष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल एनएस सिंग, राजा सुब्रमणी आणि नौदलाचे उपप्रमुख व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी तेजसची अनुभूती घेतली.

हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडने विकसित केलेले तेजस हे हवाई लढाऊ आणि आक्रमक मोहिमांसाठी एक शक्तिशाली विमान आहे. एखाद्या ठिकाणाची लष्करी तपासणी आणि जहाजविरोधी कारवाईसाठी देखील याचा वापर केला जाऊ शकतो.

तरंग शक्ती सरावात तिन्ही दलांच्या उपप्रमुखांच्या सहभागामुळे आंतरप्रादेशिक सहकार्यावर वाढता भर दिसून आला. लष्कर, नौदल आणि हवाई दल आधुनिक काळातील आव्हानांचा सामना करण्यासाठी एकत्र काम करत आहेत.

तिन्ही दलांच्या उपप्रमुखांनी एकत्र उड्डाण करण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे त्यांनी सांगितले. एकात्मिक संरक्षण क्षमता, स्वावलंबनासाठी भारताच्या वाढत्या बांधिलकीचा हा भक्कम पुरावा आहे आणि तिन्ही सशस्त्र दलांच्या अखंड एकात्मिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे, असे सांगण्यात आले.

तेजस हे विमान येत्या काळात भारतीय हवाई दलाचा मुख्य आधार ठरणार आहे. १ जुलै २०१६ रोजी हवाई दलाला पहिली दोन तेजस विमाने मिळाली होती. येत्या काळात ही विमाने भारतीय हवाई दलाचा भार वाहतील.

## कानपूर ते अजमेरपर्यंत अपघात घडवण्याचे प्रयत्न

# घातपातांच्या प्रयत्नांमुळे रेल्वेकडून दक्षता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशमधील कानपूर ते राजस्थानातील अजमेरपर्यंत रेल्वे रुळांवर सिलिंडर आणि सिमेंटब्लॉक लावण्याच्या घटना घडल्या आहेत. गेल्या आठवडाभरात अशा ४ घटना घडल्या आहेत, ज्या ट्रेन उलटण्याचा कट असल्याचे दिसत आहे. या प्रकरणांमुळे रेल्वे सतर्क झाली असून, असे प्रकार रोखण्यासाठी पूर्ण दक्षता घेतली जात आहे.

उत्तर प्रदेशपासून राजस्थानपर्यंत दहशतवादविरोधी पथक आणि स्थानिक पोलिसही सक्रिय झाले आहेत. अशा घटना चिंताजनक असून, कडक नजर ठेवली जात असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. रविवारी संध्याकाळी सिलिंडर रुळावर ठेवल्यानंतरही कानपूरमध्ये सुदैवाने कोणताही अपघात झाला नाही, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. चालकाने वेळीच इमर्जन्सी ब्रेक दाबल्याने, हा अनर्थ टळला. कानपूरमध्ये घटनास्थळावरून पेट्रोल आणि माचिस जप्त करण्यात आली आहे. यामुळे यामागे दहशतवादी कट असण्याची शक्यता बळावली आहे. नुकताच पाकिस्तानस्थित दहशतवादी फरहतुल्ला घोरी याने एक व्हिडिओ जारी केला होता. यामध्ये त्याने दहशतवाद्यांना रेल्वे गाड्यांना लक्ष्य करण्याबरोबरच, पुरवठा साखळीला विस्कळीत करण्यास सांगितले होते.




भारताच्या पायाभूत सुविधांचे नुकसान होईल, यासाठी प्रयत्न करण्यास त्याने सांगितले होते.

गेल्या वर्षी जूनपासून रेल्वे रुळांवर लाकडाचे ओंडके, दगड, सिलिंडर आदी ठेवल्याच्या १७ घटना घडल्या आहेत. त्याशिवाय सिग्नलशी छेडछाड करण्याचाही प्रयत्न झाला. याशिवाय अनेक सोशल मीडिया इन्फ्लुएंसर्सने ट्रॅकचा बेकायदा वापर केल्याच्या बातम्याही समोर आल्या आहेत. आरपीएफने या सर्व प्रकरणात गुन्हे दाखल केले असून तपास सुरू आहे. याशिवाय संवेदनशील भागात ट्रॅकची संपूर्ण देखरेख केली जात आहे. भारतात रेल्वेचे अवाढव्य जाळे असल्याने, रुळांची सखोल तपासणी करणे शक्य नसले, तरी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

या प्रकरणांमध्ये दहशतवादी कट असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे रेल्वे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळेच कानपूरमध्ये ही घटना उघडकीस येताच, दहशतवादविरोधी पथकही घटनास्थळी दाखल झाले. अशीच एक घटना सोलापुरात उघडकीस आली आहे, जेव्हा रेल्वे रुळावर स्लॅब टाकण्यात आला होता. येथेही चालकाच्या दक्षतेमुळे अपघात टळला. दोन गाड्यांवर दगडफेक करण्यात आली होती.

#रा



## पंत कसोटी क्रिकेटमधील महान फलंदाज होऊ शकतो: गांगुली

**ऋषभ पंत कसोटी क्रिकेटमध्ये महान फलंदाज बनू शकतो, , 'पंत कसोटी क्रिकेटमध्ये मोठा फलंदाज बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, पण त्याला छोट्या फॉरमॅटमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे."**



### भारतीय पॅरालिम्पिक: पदकविजेत्यांवर

# रोख बक्षिसांचा वर्षाव

- पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या खेळाडूला ७५ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.
- तर रौप्यपदक विजेत्याला ५० लाख रुपये आणि कांस्यपदक विजेत्याला ३० लाख रुपये देण्यात येणार आहेत.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पॅरालिम्पिक पदक विजेत्यांसाठी रोख पुरस्कार: पॅरिसमध्ये खेळले गेलेले पॅरालिम्पिक 8 ऑगस्ट रोजी संपले. यावेळी भारताने इतिहास रचला असून 7 सुवर्णांसह एकूण 29 पदके जिंकली आहेत. आता त्याला क्रीडा मंत्रालयाकडून याचे बक्षीस मिळाले आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी पॅरालिम्पिकमध्ये पदक जिंकणाऱ्या खेळाडूंना बंपर रकमेची बक्षीस रक्कम जाहीर केली आहे.

सर्व पॅरालिम्पिक पदक विजेत्यांना सन्मानित करण्यासाठी एका समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, त्यादरम्यान क्रीडामंत्र्यांनी या पुरस्काराची घोषणा केली. पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या खेळाडूला ७५ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



तर रौप्यपदक विजेत्याला 50 लाख रुपये आणि कांस्यपदक विजेत्याला 30 लाख रुपये देण्यात येणार आहेत. मिश्र सांघिक स्पर्धेत चांगली कामगिरी करणाऱ्या तिरंदाज शीतल देवीला 22.5 लाख रुपये अतिरिक्त दिले जाणार आहेत. 2028 पॅरालिम्पिकमध्ये आणखी पदके जिंकतील

2028 च्या पॅरालिम्पिकमध्ये भारत आणखी पदके जिंकेल, असे क्रीडामंत्र्यांनी सांगितले. ते म्हणाले, 'पॅरालिम्पिक आणि पॅरा गेम्समध्ये भारताची सातत्याने प्रगती होत आहे. 2016 मध्ये चार पदके जिंकली, त्यानंतर टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने 19 पदके जिंकली. आता तो पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये 29 पदके जिंकून 18व्या स्थानावर आहे. आम्ही आमच्या खेळाडूंना अधिक सुविधा देऊ, जेणेकरून ते लॉस एंजेलिस 2028 पॅरालिम्पिक गेम्समध्ये अधिक पदके जिंकू शकतील.

## चहल इंग्लंडमध्ये चमकतोय

**निम्मा संघ एकट्यानंच धाडला पॅव्हेलियनमध्ये**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नॉर्थम्प्टन :** भारताचा अनुभवी फिरकीपटू युजवेंद्र चहल सध्या इंग्लंडमध्ये आहे. तो नॉर्थहॅम्प्टनशायर क्लबकडून काऊंटी क्रिकेट खेळत आहे. त्याची कामगिरीही चांगली होत आहे. नुकतेच त्याने डर्बीशायरविरुद्ध खेळताना पाच विकेट्स घेण्याची कामगिरी केली.


या सामन्यात त्याने डर्बीशायरच्या पहिल्या डावात १६.३ षटके गोलंदाजी करताना ४५ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. त्याला नॉर्थहॅम्प्टनशायरचा आणखी एक फिरकीपटू रॉब केफचीही चांगली साथ मिळाली. त्यानेही ३ विकेट्स घेतल्या. त्यामुळे डर्बीशायरचा डाव ६१.३ षटकात १६५ धावांवर उरकला.



## Art Corner



**माझा बाप्पा किती गोड दिसतो...**



Name : **Raabhya Alok Ashtekar**
Age : 6 years
Class II
**Sinhgad Spring Dale Public School, Vadgaon (bk), Pune**

## अद्विक अग्रवालला यूथ बुद्धिबळ स्पर्धेत पदक





**पुणे :** नऊवर्षीय अद्विक अग्रवाल याने श्रीलंकेतील कलुतारा येथे झालेल्या कॉमनवेल्थ यूथ चेस चॅम्पियनशिपमध्ये १० वर्षांखालील गटात तीन पदके जिंकून भारताचा गौरव केला आहे. अद्विक याने रॅपिडमध्ये रौप्यपदक, ब्लिट्झमध्ये रौप्यपदक, तर क्लासिकलमध्ये कांस्यपदक पटकाविले. याव्यतिरिक्त अद्विकने १०/११ गुणांसह राष्ट्रीय अंडर-९ चॅम्पियनशिप २०२३ जिंकली आहे. अल्माटी, आशियाई कझाकस्तानमध्ये युवा बुद्धिबळ चॅम्पियनशिप २०२४ मध्ये रौप्यपदक मिळवले आहे.अद्विक अग्रवाल हा एसडब्ल्यू चेस अ‍ॅकॅडमी, वाघोलीत प्रशिक्षण घेत असून, त्याला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सत्यम वरुडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

## भारत-बांगलादेश मालिकेत 5 अप्रतिम विक्रम होणार!

**पुणे :** भारत आणि बांगलादेश यांच्यातील 2 सामन्यांच्या कसोटी मालिकेला 19 सप्टेंबरपासून सुरुवात होत आहे. पहिला कसोटी सामना चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर, तर दुसरा कसोटी सामना 27 सप्टेंबरपासून कानपूरच्या ग्रीन पार्कमध्ये खेळवला जाईल. कसोटी क्रिकेटमध्ये आत्तापर्यंत भारत आणि बांगलादेश यांच्यातील सामन्यांमध्ये भारतीय संघाचा वरचष्मा राहिला आहे. दोन्ही देशांदरम्यान एकूण 13 कसोटी सामने खेळले गेले आहेत, ज्यात भारताने 11 जिंकले आहेत. तर दोन सामने अनिर्णित राहिले.

- **सचिन-द्रविड-गावस्कर यांच्या क्लबमध्ये विराटची एन्ट्री!**
- **हिटमॅन'च्या निशाण्यावर सेहवागचा विक्रम**
- **विराट कोहली ब्रॅडमनलाही मागे टाकू शकतो**
- **अश्विनला झहीरचा विक्रम मोडण्याची संधी आहे**
- **विराट या बाबतीत पुजारा-द्रविडला मात दे**

### पीडीएफएच्या द्वितीय श्रेणी गटाच्या फुटबॉल स्पर्धेत

# पीडीएफए फुटबॉल स्पर्धा, शैलेंद्रचा निर्णायक गोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटना (पीडीएफए) आयोजित पीडीएफएच्या द्वितीय श्रेणी गटाच्या फुटबॉल स्पर्धेत राम स्पोर्टिंगने पीसीएच लायन्स संघावर विजय मिळविला.

बावधन येथील गंगा लिजेंड्सच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत शैलेंद्र आंदेने खेळाच्या चौदाव्या मिनिटास केलेल्या निर्णायक गोलच्या जोरावर राम स्पोर्टिंगने पीसीएच लायन्स संघावर विजय मिळविला या सामन्यात पीसीएच लायन्स संघाच्या खेळाडूंनी अखेरच्या काही मिनिटात सुरेख चाली रचल्या परंतु ते गोल करण्यात मात्र अपयशी ठरले.



पुणेरी वॉरिअर्स आणि न्यू यांनी दे इंडिया सॉकर यांच्यातील लढत २-२ अशी बरोबरीत सुटली. या लढतीत वॉरियर्सच्या यश चव्हाण बाराव्या मिनिटास गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. तर न्यू इंडिया सॉकरकडून हृषिकेश घुलेने २५ वे मिनिटास गोल करून १-१ अशी पनि बरोबरी साधली तर ओम साळुंखेने ५२ वे मिनिटास गोल करून संघाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली पुणेरी वॉरियर्सच्या विकास तळेकरीने ६० व्या मिनिटास दुसरा गोल करून सामना २-२ असा बरोबरीत सोडविण्यात यश मिळविले.

## ग्लोबल इंडियन नॅशनल स्कूल, ब्लॉसम पब्लिक, सेंट मेरीज, उंड्रीच्या द बिशप्स, द कल्याणी स्कूल टीम पुढच्या फेरीत

**पुणे :** शिक्षण विभाग (पुणे मनपा) आणि जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या वतीने आयोजित शालेय फुटबॉल स्पर्धेत सतरा वर्षांखालील मुलींच्या गटात ग्लोबल इंडियन नॅशनल स्कूल, ब्लॉसम पब्लिक, सेंट मेरीज, उंड्रीच्या द बिशप्स, द कल्याणी स्कूलने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली.

स. प. कॉलेजच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत बालेवाडीच्या ग्लोबल इंडियन नॅशनल स्कूलने शिवणे येथील वॉलनट स्कूलवर टायब्रेकमध्ये ३-२ असा विजय मिळवला. या सामन्यात दोन्ही संघातील खेळाडूंनी जोरदार खेळ केला. परंतु निर्धारित वेळेत ही लढत गोलशून्य बरोबरीत सुटल्याने घेण्यात आलेल्या टायब्रेकमध्ये 'ग्लोबल स्कूल'कडून शोएना मोहन, सारा चिकलकर वगळता अंकिता कुरूळकर, आराध्या बॅनर्जी, कौशही विश्वास यांनी गोल केले तर 'वॉलनट' संघाकडून सई कदम, गार्गी अष्टेकर यांनाच गोल करता आले. त्यांचे काव्या मुसळे, तनिष्का कमानपुरकर, सई देशमुख गोल करू शकल्या नाहीत. नन्हे येथील ब्लॉसम पब्लिक स्कूलने पाषाणच्या सेंट जोसेफ हायस्कूलवर मात केली या लढतीत खेळाच्या २७ व्या मिनिटाला मधुरा कलशेट्टीने केलेला गोल निर्णायक ठरला.

द कल्याणी स्कूलने ट्रिनिटी इंटरनॅशनल स्कूलवर ३-१ने विजय मिळवला. त्यात महत्त्वाचा वाटा जागृती तेजवाणीने (७, व १८ वे मिनिट) केलेल्या दोन गोलचा होता तिला अन्वी पराशरने (२४ वे मिनिट) एक गोल करून सुरेख साथ दिली.



## प्रोडीजी पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची अमेरिकेत निवड



जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्वेसर्वा व संस्थापक अध्यक्ष डॉ. तानाजीराव सावंत साहेब यांच्या प्रेरणेने व विश्वस्थ प्रा. ऋषीराज सावंत सर यांच्या मार्गदर्शनाखाली चालत आलेल्या परंपरेनुसार प्रोडीजी पब्लिक स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवण्यात आला आहे. आमच्या शाळेचा इयत्ता सातवी चा विद्यार्थी अमन महेश माने याची आगामी होणाऱ्या यु.एस. ए ( अमेरिका ) अंडर 13 ( वेस्ट ) पश्चिम विभाग क्रिकेट झोन कॉन्फरन्सचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड करण्यात आली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संकुल प्रमुख माननीय डॉ. सचिन आदमाने सर , प्राचार्य सौ. सुहास तोहगावकर मॅडम , मुख्याध्यापिका सौ. दिपाली काटे मॅडम तसेच शाळा क्रीडा विभाग प्रमुख श्री. विजय घुले सर , धनाजी जाधव सर त्याचबरोबर सर्व क्रियाशील क्रीडा शिक्षकांनी अमनचे विशेष कौतुक केले.

### जिजाई प्रतिष्ठान व महामुक्ती कॅरम अकादमी जिल्हास्तरीय

# कॅरम स्पर्धेत मेधा मठकरीला जेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दापोडी येथील जिजाई प्रतिष्ठान व महामुक्ती कॅरम अकादमीच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत महिला गटाचे विजेतेपद मेधा मठकरीने पटकाविले.

दापोडी येथील अग्रसेन भवन रेल्वे स्टेशनमागील येथे कॅरम संघटना ऑफ पुणेच्या मान्यतेने झालेल्या या स्पर्धेत तिसरे मानांकन असलेल्या मेधा मठकरीने अंतिम सामन्यात दुसऱ्या मानांकित श्रुती वेळेकरवर २०-९, १७-४



असा सहज विजय मिळविला. त्याआधी झालेल्या उपांत्य फेरीत श्रुती वेळेकरने बिगर मानांकित पूजा मेश्रामचा २५-४, २५-१ असा तर मेधा मठकरीने चौथे मानांकन असलेल्या तनया पाटीलला २५-१, २३-१० असे हरविले होते. विजेत्या मेधा मठकरी आर्युविमा महामंडळात (शिवाजीनगर) सहाय्यक म्हणून काम करीत आहेत. या स्पर्धेच्या बक्षिस समारंभप्रसंग माजी नगरसेविका सीमाताई सावळे कॅरम संघटना ऑफ पुणे सुदाम दाभाडे रावसाहेब कानवडे, सुशील गुजर उपस्थित होते.

### ऑलिम्पिक विजेता स्वप्रिल कुसळेला 'पुनीत बालन ग्रुप'कडून ११ लाखांचे बक्षिस

# खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा 'पुनीत बालन ग्रुप'चा आणखी एक निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'पॅरिस ऑलिम्पिक'मध्ये कांस्य पदक पटकावून भारताची मान उंचावणारा मराठमोळा नेमबाज स्वप्रिल कुसळे याला 'पुनीत बालन ग्रुप'कडून ११ लाखांचे बक्षीस देण्यात आले आहे. 'पुनीत बालन ग्रुप'चे अध्यक्ष आणि युवा उद्योजक पुनीत बालन यांच्या हस्ते कुसळे यास पुण्यात हा बक्षिसाचा धनादेश देण्यात आला.

कोल्हापुरचा सुपुत्र असलेल्या कुसळे याने 'पॅरिस ऑलिम्पिक' गाजवत नेमबाजीत ५० मीटर रायफल स्पर्धेत थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदक पटकावले. १९५२ सालच्या ऑलिम्पिकमध्ये खाशाबा जाधव यांनी कुस्तीत कांस्यपदक जिंकले होते. त्यानंतर ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक जिंकणारा स्वप्नील कुसळे हा महाराष्ट्राचा दुसरा खेळाडू ठरला आहे. त्याच्या या कामगिरीची दखल घेत युवा उद्योजक पुनीत बालन यांनी त्याला ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. सोमवारी हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती'च्या आरतीचा मान कुसळे याला देण्यात आला. यावेळी त्यास ११ लाख रुपयांचा बक्षिसाचा धनादेश पुनीत बालन यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला.

यावेळी बोलताना कुसळे याने 'पुनीत बालन ग्रुप'चे आभार मानले. "मी गणपती बाप्पाचा भक्त आहे. बाप्पाचा आशीर्वाद माझ्या पाठिशी आहे, त्यामुळेच कांस्य पदक मिळाले. श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीची आरती करण्याचा मान मिळाला हे माझे भाग्य समजतो," अशा शब्दांत यावेळी कुसळे याने आपल्या भावना व्यक्त केल्या. यापूर्वीही 'पुनीत बालन ग्रुप'ने अनेक गुणी आणि होतकरु खेळाडूंना आर्थिक छत्र देऊन त्यांच्या पुढील प्रवासात खारीचा वाटा उचलला आहे. त्यांच्या या कार्याचा समाजाच्या सर्वच स्तरातून गौरव करण्यात येत आहे.

#रा

> 'नेमबाजी स्पर्धेत कांस्य पदक मिळवत स्वप्रिलने केवळ महाराष्ट्राचंच नाही तर देशाचं नाव जगात उज्ज्वल केलं. त्याच्यासारखे अनेक प्रतिभावान खेळाडू घडण्याची गरज आहे. त्यादृष्टीने त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'पुनीत बालन ग्रुप' अशा खेळांडूंच्या कायम पाठिशी राहिला आहे. भविष्यात स्वप्रिल निश्चितच भारतासाठी सुवर्णपदक जिंकेल असा विश्वास आहे. त्यासाठी त्याला 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट' आणि सर्व बाप्पाच्या सर्व भक्तांकडून शुभेच्छा."
>
> **—पुनीत बालन,**
> **(युवा उद्योजक व उत्सवप्रमुख, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट**

ऑलिम्पिक विजेता स्वप्रिल कुसळे यास बक्षिसाचा धनादेश देताना युवा उद्योजक पुनीत बालन

